- **इलेक्ट्रॉन व्होल्ट (Electron volt):** एका इलेक्ट्रोन कणाचे १ volt ने विभवांतर वाढवण्यासाठी होणार्या कार्यशक्तीचे मोजमापास १ इलेक्ट्रॉन व्होल्ट असते.

1 eV = 1.6×10^{-19}

२.४.४ उर्जा पट्ट (Energy Band): इलेक्ट्रॉन्सच्या ताब्यात असलेल्या ऊर्जेच्या श्रेणीला उर्जा पट्ट (एनर्जी बँड) म्हणतात. उर्जा पट्ट हे पुढील प्रमाणे तीन प्रकारचे असतात,

१. **संयुज पट्ट (Valence Band):** अणूच्या सर्वात बाहेरील कक्षेतील इलेक्ट्रॉनला संयुजा इलेक्ट्रॉन असे म्हणतात. संयुजा इलेक्ट्रॉनमध्ये सर्वाधिक उर्जा असते. संयुजा इलेक्ट्रॉनच्या ताब्यात असलेल्या ऊर्जेच्या श्रेणीला संयुज पट्ट म्हणतात.

२. **वाहक पट्ट (Conduction Band):** संयुजा पट्ट नंतरचा पुढचा उच्च पट्ट हा वाहक पट्ट असतो. ह्या वाहक पट्ट्यात असणार्या इलेक्ट्रोन ला वाहक इलेक्ट्रोन अथवा मुक्त इलेक्ट्रोन म्हणतात. संयुजा इलेक्ट्रॉन्स न्यूक्लियसशी सैलपणे जोडलेले असतात जेणेकरून ते मुक्त होऊ शकतात, जे विद्युत प्रवाह वाहून नेण्यासाठी जबाबदार असतात. त्यांना वाहक इलेक्ट्रोन असे म्हणतात.
आकृतीत दाखवल्याप्रमाणे उर्जा पट्ट काम करतात.



आकृती: उर्जा पट्ट

३. **निषिद्ध ऊर्जा पट्ट अंतर (forbidden energy band gap) :**संयुज पट्ट आणि वाहक पट्ट यांमध्ये थोडीसी पोकळी असते, त्याला निषिद्ध ऊर्जा पट्ट अंतर असे म्हणतात. कोणताही इलेक्ट्रोन हा निषिद्ध ऊर्जा पट्ट अंतर मधून बाहेर पडू शकत नाही. पदार्थानुसार निषिद्ध ऊर्जा पट्ट अंतर हे शून्य, लहान किंवा मोठे असते.

२.५ अर्धवाहक चे प्रकार : अर्धवाहक चे दोन प्रकार असतात :

१. निज अर्धवाहक Intrinsic Semiconductor

२. निजेतर अर्धवाहक Extrinsic Semiconductor

२.५.१ निज अर्धवाहक : शुद्ध स्वरूपातील अर्धसंवाहकांना आंतरिक (निज) अर्धसंवाहक म्हणतात. निज अर्धवाहक जसे कि ,सिलिकॉन व जर्मेनियम च्या बाहेरच्या कक्षेत ४ इलेक्ट्रोन असतात. जेव्हा अणूच्या बाहेरच्या कक्षेत ८ इलेक्ट्रोन असतात तेव्हा तो अणु स्थिर होतो .



आकृती: सिलिकॉन पदार्थ संरचना

Reference -: https://engineersclass.wordpress.com/2019/04/21/semiconductor/

सिलिकॉन व जर्मेनियम यात ४ इलेक्ट्रोन सामाईक करण्याची क्षमता असते .ज्यामध्ये ते शेजारच्या ४ अणु कडून प्रत्येकी १ इलेक्ट्रोन सामाईक करून स्थिर होतात. निरपेक्ष शून्य तापमानात (0^0K = -273^0C), अर्धवाहक रोधकासारखे वागतात. खोलीच्या तपमानावर, काही इलेक्ट्रॉन-होल जोड्या तयार होतात म्हणजेच ते कंडक्टर म्हणून काम करतात. अर्धवाहकाचे तापमान वाढते, त्याची चालकता वाढते म्हणजेच त्याचा प्रतिकार कमी होतो.

२.५.२ निजेतर अर्धवाहक Extrinsic Semiconductor : शुद्ध अर्धवाहकमध्ये थोड्या प्रमाणात अशुद्धता जोडली जाते त्याला बाह्य (निजेतर) अर्धवाहक म्हणतात. अर्धसंवाहकामध्ये योग्य अशुद्धता कमी प्रमाणात जोडून सेमीकंडक्टरची सध्याची वहन क्षमता बदलली जाऊ शकते. अर्धवाहकमध्ये अशुद्धता जोडण्याची प्रक्रिया प्रलेपण (डोपिंग) म्हणून ओळखली जाते आणि जी अशुद्धता मिसळली जाते त्याला प्रलेपित (डोपंट) म्हणतात. अशुद्धता जोडण्याचा उद्देश एकतर मुक्त इलेक्ट्रॉन्सची संख्या वाढवणे किंवा अर्धसंवाहकातील छिद्रे वाढवणे म्हणजेच सेमीकंडक्टरची चालकता वाढवणे हा आहे.

प्रलेपक दोन प्रकारचे असतात व ते सिलिकॉन व जर्मेनियम मध्ये प्रलेपण म्हणून वापरले जातात.

१. **पंचसंयुजी (पेंटावॅलेंट) अशुद्धता (Pentavalent impurities):** संयुजा (५) आर्सेनिक, अँटिमनी, फॉस्फरस इत्यादि.
२. **त्रिसंयोजक अशुद्धता (Trivalent impurities):** संयुजा (३) गॅलियम, इंडियम, बोरॉन, अॅल्युमिनियम इ.

प्रलेपकच्या प्रकारानुसार निजेतर अर्धवाहक हे दोन प्रकारात वर्गीकृत केले जातात .

१. ऋण प्रकारचे बाह्य अर्धवाहक N-Type Extrinsic Semiconductor

२. धन प्रकारचे बाह्य अर्धवाहक P-Type Extrinsic Semiconductor



आकृती: बाह्य अर्धवाहकचे वर्गीकरण

१. ऋण प्रकारचे बाह्य अर्धवाहक N-Type Extrinsic Semiconductor :शुद्ध सेमीकंडक्टरमध्ये कमी प्रमाणात पंचसंयुजी (पेंटाव्हॅलेंट) अशुद्धता जोडली जाते तेव्हा त्याला ऋण प्रकारचे बाह्य अर्धवाहक कंडक्टर म्हणतात .जर सेमीकंडक्टरमध्ये पंचसंयुजी (पेंटाव्हॅलेंट) अशुद्धता जोडली गेली तर मोठ्या प्रमाणात मुक्त इलेक्ट्रॉन तयार होतात म्हणजेच ते मोठ्या संख्येने इलेक्ट्रॉन प्रदान करते .पंचसंयुजी वाहकतेला एक जास्तीचा इलेक्ट्रोन देतो, म्हणून पंचसंयुजी अशुद्धतेला दात्याची (donor) अशुद्धता म्हणतात.



आकृती: ऋण प्रकारचे बाह्य अर्धवाहक

Reference -: https://www.csfusion.org/faq/why-is-n-type-semiconductor-neutral/

जेव्हा सिलिकॉन व जर्मेनियम मध्ये पंचसंयुजी (पेंटाव्हॅलेंट) अशुद्धता प्रलेपण केली जाते तेव्हा ,पाच पैकी चार इलेक्ट्रोन हे शेजारच्या अणुशि सामाईक होतात व एक इलेक्ट्रोन मुक्त होतो जो प्रवाह वाहून नेतो. म्हणून , पंचसंयुजी अशुद्धता मुक्त इलेक्ट्रॉनची संख्या वाढवते . ऋण प्रकारचे बाह्य अर्धवाहक मध्ये ,इलेक्ट्रॉन बहुसंख्य चार्ज वाहक (majority charge carriers) आहेत आणि छिद्र हे अल्पसंख्याक चार्ज वाहक (minority charge carriers) आहेत .

२. धन प्रकारचे बाह्य अर्धवाहक P-Type Extrinsic Semiconductor : शुद्ध सेमीकंडक्टरमध्ये थोड्या प्रमाणात त्रिसंयोजक अशुद्धता जोडली जाते तेव्हा त्याला धन प्रकारचे बाह्य अर्धवाहक म्हणतात. सेमीकंडक्टरमध्ये त्रिसंयोजक अशुद्धता जोडल्यास मोठ्या प्रमाणात छिद्र (holes) निर्माण होतात म्हणजेच इलेक्ट्रॉनची कमतरता असते .त्रिसंयोजक सभोवताल कडून एक इलेक्ट्रोन ग्रहण करतो ,म्हणून त्रिसंयोजक अशुद्धतेला स्वीकारकर्ता (acceptor) अशुद्धता म्हणतात .



आकृती: धन प्रकारचे बाह्य अर्धवाहक

Reference -: https://www.csfusion.org/faq/why-is-n-type-semiconductor-neutral/

जेव्हा सिलिकॉन व जर्मेनियम मध्ये त्रिसंयोजक अशुद्धता प्रलेपण केली जाते तेव्हा सिलिकॉन सोबत तीन सहसंयुज बंध निर्माण होतात तर चौथा बंध अपूर्ण (incomplete) राहतो आणि तिथे छिद्र निर्माण होते. त्रिसंयोजक अशुद्धता मुक्त इलेक्ट्रॉनची संख्या कमी करते, ज्यामुळे अधिक छिद्रे पडतात जी प्रवाह वाहून नेतात. धन प्रकारचे बाह्य अर्धवाहक मध्ये, छिद्रे बहुसंख्य चार्ज वाहक (majority charge carriers) आहेत आणि इलेक्ट्रोन हे अल्पसंख्याक चार्ज वाहक (minority charge carriers)आहेत.

२.६ धन – ऋण जोड झडप (P-N Junction diode):

P-क्षेत्रात छिद्र बहुसंख्य चार्ज वाहक असतात आणि N-क्षेत्रात इलेक्ट्रॉन बहुसंख्य चार्ज वाहक असतात. जेव्हा P-क्षेत्र आणि N-क्षेत्र असे दोन डोप केलेले क्षेत्र PN जंक्शन डायोड तयार करण्यासाठी एकत्र येतात. P-क्षेत्र आणि N-क्षेत्रामधील अडथळ्यास PN जंक्शन म्हणतात.



डायोडचे प्रतीक:



काही छिद्रांचे P ते N कडे आणि काही इलेक्ट्रॉनचे N ते P कडे स्थलांतर केल्यामुळे क्षीण थर (depletion layer) तयार होतो. ह्या क्षीण थरामुळे तेथे अवरोध विभव (Barrier potential) V_B तयार होते. हे अवरोध विभव छिद्र आणि इलेकट्रॉनचे पुढील स्थलांतर (migration) रोखून ठेवते.



सिलिकॉन (Si) साठी अवरोध विभव (Barrier potential) (V_B) 0.7 V आहे आणि जर्मेनियम (Ge) साठी 0.3 V आहे.

२.६.१ पी-एन जंक्शन - फॉरवर्ड बायस (P-N Junction – Forward Bias):

विद्युत घटाचे धन टोक हे धन क्षेत्राशी (P-Region) जोडलेले असते आणि ऋण टोक ऋण क्षेत्राशी (N-Region) जोडलेले असते, त्याला पी-एन जंक्शन - फॉरवर्ड बायस असे म्हणतात.

P-क्षेत्रातील छिद्रे विद्युत घटाच्या धन टोकापासून दूर जातात, N-क्षेत्रातील इलेक्ट्रॉन्स विद्युत घटाच्या ऋण टोकापासून दूर जातात म्हणजेच चार्ज वाहके जंक्शनच्या दिशेने जातात.



आकृती: पी - एन जंक्शन फॉरवर्ड बायस

त्यामुळे क्षीण थराची (depletion layer) रुंदी कमी होते म्हणजेच डायोडचा रोध कमी होतो. म्हणून, फॉरवर्ड बायसमध्ये, डायोडमधून मोठ्याप्रमाणात विद्युत प्रवाह वाहतो आणि बाह्य विद्युतदाब अवरोध विभवापेक्षा जास्त असतो.

२.६.२ P-N जंक्शन - रिव्हर्स बायस (P-N Junction – Reverse Bias):

विद्युत घटाचे धन टोक हे ऋण क्षेत्राशी (N-Region) जोडलेले असते आणि ऋण टोक हे धन क्षेत्राशी (P-Region) जोडलेले असते, त्याला पी-एन जंक्शन - रिव्हर्स बायस असे म्हणतात.

P-क्षेत्रातील छिद्रे विद्युत घटाच्या ऋण टोकाकडे आकर्षित होतात आणि N-क्षेत्रातील इलेक्ट्रॉन्स विद्युत घटाच्या धन टोकाकडे आकर्षित होतात म्हणजेच चार्ज वाहक जंक्शनपासून दूर जातात.



आकृती: पी - एन जंक्शन-रिव्हर्स बायस

त्यामुळे क्षीण थराची (depletion layer) रुंदी वाढते म्हणजेच डायोडचा रोध वाढतो. म्हणून, रिव्हर्स बायसमध्ये, डायोडमधून विद्युत् प्रवाह वाहत नाही, म्हणजे अनुमत प्रवाह अनिवार्यपणे शून्य होतो.

डायोडची वैशिष्ट्ये (Diode Characteristic): फॉरवर्ड बायस विद्युत प्रवाह – विद्युतदाब (I-V) वैशिष्ट्यांमध्ये, जेव्हा बाह्य विद्युतदाब 0.7 V पेक्षा कमी असतो, तेव्हा डायोडच्या सर्किटमधून फारच कमी विद्युत प्रवाह वाहतो. विद्युत प्रवाह 0.7 V बाह्य फॉरवर्ड बायस्ड विद्युतदाबाच्या पुढे झपाट्याने आणि वेगाने वाढतो. म्हणून 0.7 V ला क्नी (knee) व्होल्टेज (विद्युतदाब) म्हणतात.



आकृती: I-V वैशिष्ट्य फॉरवर्ड आणि रिव्हर्स बायस मध्ये

Reference -: https://lastminuteengineers.com/pn-junction-diode/

रिव्हर्स बायस I-V वैशिष्ट्यांमध्ये, औष्णिकरित्या उत्पादित अल्पसंख्याक चार्ज वाहकांमुळे विद्युत् प्रवाह ब्रेकडाउन व्होल्टेज (विद्युतदाब) V_{BR} पूर्वी प्रवाहित होतो. या विद्युत् प्रवाहाला लीकेज (leakage) करंट (विद्युत् प्रवाह) म्हणतात. क्रिटिकल व्होल्टेज (विद्युतदाब) V_{BR} वर, रिव्हर्स बायस्ड व्होल्टेज (विद्युतदाब) वाढल्यामुळे, डायोडमध्ये उलटा प्रवाह (रिव्हर्स करंट) झपाट्याने वाढतो.

२.६.३ पी-एन जंक्शन डायोडचे उपयोग (Applications):

१. एसी ते डीसी रूपांतरणासाठी रेक्टिफायर सर्किट्समध्ये.

२. ओव्हरव्होल्टेज संरक्षण सर्किट्समध्ये.
३. रडार, संगणक, रेडिओ इत्यादींच्या क्लिपिंग सर्किट्समध्ये वेव्ह शेपर म्हणून.
४. व्होल्टेज रेग्युलेटरमध्ये झेनर डायोड म्हणून.
५. ट्यूनर म्हणून टीव्ही आणि रेडिओ रिसीव्हरमध्ये व्हॅरेक्टर डायोड.
६. ऑप्टिकल कम्युनिकेशन सिस्टममध्ये फोटोडायोड आणि लेसर डायोड वापरले जातात.
७. डिजिटल अंकीय तर्कशास्त्र (लॉजिक) डिझाइनमध्ये स्विच म्हणून वापरले जाते
८. डिटेक्टर सर्किट्समध्ये वापरले जाते (एएम/एफएम रिसीव्हर्समध्ये सिग्नल डिटेक्टर).
९. टीव्ही रिसीव्हर्समध्ये क्लॅम्पिंग सर्किटमध्ये वापरले जाते.
१०. डिस्प्ले पॅनेलमध्ये LEDs म्हणून वापरले जाते.
११. कॅमेरामध्ये सेन्सर म्हणून वापरला जातो.
१२. तापमान सेन्सर म्हणून वापरले जाते.
१३. व्हेरिएबल कॅपेसिटर म्हणून वापरले जाते.
१४. फोटोडायोड ट्रान्सड्यूसर म्हणून काम करतो.
१५. लिमिटर आणि व्होल्टेज डब्लर सर्किट्समध्ये वापरले जाते.
१६. ट्रान्झिस्टर बायस कम्पेनसेसन नेटवर्क्समध्ये.

२.६.४ डायोडचा रोध (Diode Resistance):

फॉरवर्ड बायसमध्ये आदर्श डायोडचा रोध शून्य असतो आणि रिव्हर्स बायसमध्ये अमर्याद असतो.
डायोडच्या रोधाचे खाली दिल्या प्रमाणे दोन प्रकार आहेत:

१. डीसी किंवा स्थिर रोध (DC or Static Resistance)
२. एसी किंवा बदलणारा (डायनॅमिक) रोध (AC or Dynamic Resistance)

१. डीसी किंवा स्थिर रोध (DC or Static Resistance):

इनपुट (input) डीसी असताना डायोडच्या फॉरवर्ड बायस्ड स्थितीतील रोधाला डीसी किंवा स्थिर रोध म्हणतात. डीसी किंवा स्थिर रोध खाली दिलेल्या सूत्राद्वारे निर्धारित केला जातो,

$$R_{stat} = R_{DC} = \frac{V_f}{I_f}$$

ऑपरेटिंग व्होल्टेज जास्त असते, तेव्हा स्थिर रोध कमी असतो म्हणजेच ऑपरेटिंग व्होल्टेज वाढल्यावर, स्थिर रोध कमी होतो.

२. एसी किंवा बदलणारा (डायनॅमिक) रोध (AC or Dynamic Resistance):

इनपुट एसी (AC)असताना डायोडच्या फॉरवर्ड बायस्ड स्थितीतील रोधाला एसी किंवा बदलणारा (डायनॅमिक) रोध असे म्हणतात. एसी किंवा बदलणारा (डायनॅमिक) रोध खाली दिलेल्या सूत्राद्वारे निर्धारित केला जातो,

$$R_{dynamic} = R_{AC} = \frac{\Delta V_f}{\Delta I_f}$$

ऑपरेटिंग व्होल्टेज जास्त असते, तेव्हा बदलणारा (डायनॅमिक) रोध कमी असतो म्हणजेच ऑपरेटिंग व्होल्टेज वाढल्यावर, बदलणारा (डायनॅमिक) रोध कमी होतो.

२.६.५ हाफ वेव्ह रेक्टिफायर (Half wave rectifier):

- **रेक्टिफायर (Rectifier) -:** एक सर्किट जे एसी व्होल्टेजचे डीसी व्होल्टेजमध्ये रूपांतर करते त्याला रेक्टिफायर म्हणतात.

हाफ वेव्ह रेक्टिफायर -: जे सर्किट अर्ध्या चक्राला (cycle) परवानगी देते आणि बाकीचे अर्धे चक्र अवरोधित करते त्याला हाफ वेव्ह रेक्टिफायर म्हणतात.



आकृती: हाफ वेव्ह रेक्टिफायर

Reference -: https://www.physics-and-radio-electronics.com/electronic-devices-and-circuits/rectifier/halfwaverectifier.html

हाफ वेव्ह रेक्टिफायर एसी ते डीसी व्होल्टेजमध्ये रूपांतरित करण्यासाठी वापरला जातो. AC इनपुटच्या प्रत्येक धनप्रभारित अर्ध्या चक्रादरम्यान (पॉझिटिव्ह हाफ सायकल दरम्यान), डायोड फॉरवर्ड बायस्ड होतो म्हणजेच डायोड बंद स्विच (closed switched) म्हणून काम करतो आणि लोडच्या रोधातून जास्त विद्युत प्रवाह वाहतो. त्यामुळे धनप्रभारित अर्ध्या चक्रादरम्यान, डायोड विद्युत सुवाहक होतो आणि लोडच्या रोधाभोवती DC व्होल्टेज तयार होते.

AC इनपुटच्या प्रत्येक ऋणप्रभारित अर्ध्या चक्रादरम्यान (निगेटिव्ह हाफ सायकल दरम्यान), डायोड रिव्हर्स बायस्ड बनतो म्हणजेच डायोड ओपन स्विच (open switch) म्हणून काम करतो आणि लोडच्या रोधातून विद्युत प्रवाह वाहत नाही. त्यामुळे ऋणप्रभारित अर्ध्या चक्रादरम्यान, डायोड विद्युत सुवाहक होत नाही (रोधक बनतो) आणि लोडच्या रोधाभोवती DC व्होल्टेज तयार होत नाही.

सोडवलेली उदाहरणे

१. अणूमधील इलेक्ट्रोन आणि प्रोटोन मधील अंतर 5.8×10^{-11} m इतके आहे. त्यांच्यामधील स्थिर विद्युत बल काढा.

(दिलेले एका इलेक्ट्रॉनवरील भार = e = 1.6 x 10^{-19} C, ε=1)

उत्तर:

$$F = 9 \times 10^9 \times \frac{q_1 q_2}{r^2}$$

$$F = 9 \times 10^9 \times \frac{1.6 \times 10^{-19} \times 1.6 \times 10^{-19}}{(5.8 \times 10^{-11})^2}$$

$$F = 6.84 \times 10^{-8} N$$

२. एका 60 मायक्रो कुलोम्बचा भरीव गोल हवेत ठेवलेला आहे, तर त्या गोलाच्या मध्य बिंदुपासून ३० सेंमी अंतरावरची विद्युत क्षेत्राच्या तीव्रतेची गणना करा.

उत्तर:

$$q = 60\,\mu c = 60x\ 10^{-6}\,c,$$

$$r = 30\,cm = 0.3m,\ \in_r = 1$$

$$\in = 9 \times 10^9 \times \frac{q}{r^2}$$

$$\in = 9 \times 10^9 \times \frac{60 \times 10^{-6}}{(0.3)^2}$$

$$\in = 6 \times 10^6\,N/C$$

३. 300 मायक्रो कुलोम्ब विद्युत भारापासून 10 सेंमी अंतरावर असलेल्या बिंदू वर असलेल्या विभवाची गणना करा.

उत्तर:

$$Q = 300\,\mu c = 30 \times 10^{-6}\,C$$

$$r = 10\,cm = 0.1m,\ \in_r = 1.$$

$$V = 9 \times 10^9 \times \frac{Q}{r}$$

$$= 9 \times 10^9 \times \frac{300x10^{-6}}{0.1}$$

$$= 27 \times 10^4\,v$$

४. एका विद्युत बल्बची शक्ती 100 W आणि विभव 240 V, तर बल्ब सामान्यपणे काम करत असताना बल्ब च्या तारेमधून वाहणाऱ्या विद्युत प्रवाहाची आणि बल्ब च्या तारेच्या रोधाची गणना करा.

उत्तर:

$$I = \frac{P}{V} = \frac{100}{240} = 0.4167 \ A$$

$$R = \frac{P}{I^2} = \frac{100}{(0.4167)^2} = 576.04\ \Omega$$

नमुना MCQ (Sample MCQ

१. विद्युत तीव्रता हि एक .... प्रमाण आहे.

अ.स्केलर ब.वेक्टर क. पूरक ड. बेसिक

२. इलेक्ट्रिक फ्यूज ----यावर आधारित आहे -

अ. विद्युतप्रवाहचा हीटिंग इफेक्ट ब. विद्युतप्रवाहचे चुंबकीय प्रभाव

क. विद्युतप्रवाहचा रासायनिक प्रभाव ड. कोणीतेही नाही

३.जेव्हा रोधांचीची संख्या मालिकेत जोडलेली असते, तेव्हा त्याच्या संयोजनाचा प्रभावी रोध _____

अ. घटतो ब. वाढतो

क. समान ड. शून्य

४. बलांच्या चुंबकीय रेषा................सामग्रीने प्रभावित होत नाहीत.

अ. विद्युत वाहक ब. चुंबकीय पदार्थ

क. चुंबकत्व नसलेली ड. धातू

५ .ऋण प्रभाराचे बाह्य अर्धवाहका मध्ये, _______ हे बहुसंख्य चार्ज वाहक (majority charge carriers) आहेत आणि _______ हे अल्पसंख्याक चार्ज वाहक (minority charge carriers)आहेत.

अ. इलेक्ट्रॉन, इलेक्ट्रॉन ब. छिद्र , इलेक्ट्रॉन

क. छिद्र , छिद्र ड. इलेक्ट्रॉन, छिद्र

उत्तरे: १ ब. २.अ ३ ब. ४ क. ५.ड

Unit-3: Thermometry and Fiber Optics

युनिट -३ :थर्मोमेट्री आणि फायबर ऑप्टीक्स

विषय दर्जा विद्यार्जन निष्पत्ती (Course Level Learning Outcome):

- अभियांत्रिकी समस्या सोडवण्यासाठी औष्मिक शास्त्र (थर्मोमेट्री) आणि तंतू प्रकाश शास्त्राची (फायबर ऑप्टिक्सची) मूलभूत तत्त्वे लागू करा.

सिद्धांत विद्यार्जन निष्पत्ती (Theory Learning Outcome):

- तापमानाला वेगवेगळ्या तापमान मापन श्रेणीमध्ये (स्केलमध्ये) रूपांतरित करा.
- उदाहरणांसह उष्णता स्थानांतरनाच्या विविध पद्धतींची तुलना करा.
- तीन वायू नियमांची वैशिष्ट्ये परस्परसंबंधित करा.
- तीन वायू नियमांची वैशिष्ट्ये परस्परसंबंधित करा.
- प्रकाशवाहक तंतूमधील (ऑप्टिकल फायबरमधील) संपूर्ण अंतर्गत परावर्तन स्पष्ट करा.
- उपयोगांसह प्रकाशवाहक तंतूच्या (ऑप्टिकल फायबरच्या) प्रकारांमध्ये फरक स्पष्ट करा.

परिचय :

अभियांत्रिकी क्षेत्रात उष्णतेची संकल्पना महत्त्वाची भूमिका बजावते जसे मटेरिअलची निवड, मशीनची कार्यक्षमता, गतिशास्त्र. ह्या धड्यात विद्यार्थी तापमान, उष्णता, उष्णतेचे स्थानांतरण, संवहन आणि रेडिएनशनद्वारे वैज्ञानिक संकल्पना जाणून घेतील. तसेच उष्णतेचे सुवाहक आणि दुर्वाहक आणि त्यांचे औद्योगिक अनुप्रयोगांचा अभ्यास केला जाईल. वायूचे नियम दाब, आकारमान आणि तापमान यांच्यातील परस्पर संबंध समजून घेण्यासाठी स्पष्ट केले जातील. हीटिंग आणि कूलिंग सिस्टममध्ये, हवेची उष्णता क्षमता खोलीचे तापमान वाढवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी आवश्यक उर्जेचे प्रमाण निर्धारित करते. हे अभियंत्यांना निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक इमारतींसाठी कार्यक्षम हीटिंग, वेंटिलेशन आणि एअर कंडिशनिंग प्रणाली डिझाइन करण्यात मदत करते. त्याचप्रमाणे विद्यार्थी संपूर्ण अंतर्गत परावर्तन आणि ऑप्टिकल फाइबरचे तत्त्व शिकतील. प्रकाश हा एक ऊर्जेचा प्रकार आहे तो विद्युत चुंबकीय लहरींच्या स्वरूपात प्रवास करतो. प्रकाशाच्या मार्गाला प्रकाश किरण म्हणतात. फायबर ऑप्टिक आधुनिक संप्रेषण पायाभूत सुविधांचा एक आवश्यक भाग आहे. फाइबर ऑप्टिक किंवा ऑप्टिकल फायबर म्हणजे माहिती प्रसारित करणारे एक माध्यम किंवा तंत्रज्ञान आहे.

उष्णता -: उष्णता हे ऊर्जेचे स्वरूप आहे जे उबदारपणाची भावना निर्माण करते किंवा वस्तूच्या सर्व रेणूंच्या ऊर्जेच्या बेरीजला उष्णता म्हणतात.

उष्णतेची एकके -: SI एकक -: ज्यूल (J), MKS एकक -: किलोकॅलरी (kcal), CGS एकक -: कॅलरी (cal)

किलोकॅलरी (kcal.) किंवा एक किलोकॅलरी (1 kcal.) -: एक किलोग्राम (1kg) पाण्याचे तापमान एक अंश सेल्सिअस (1^0C) ने वाढवण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेला किलोकॅलरी (kcal.) किंवा एक किलोकॅलरी (1 kcal.) म्हणतात.

कॅलरी (cal) किंवा एक कॅलरी (1 cal) : एक ग्रॅम (1 ग्रॅम) पाण्याचे तापमान एक अंश सेल्सिअस (1^0C) ने वाढवण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेला कॅलरी (cal) किंवा एक कॅलरी (1 cal) म्हणतात.

1 kcal = 1000 cal = 4184 J & 1 cal = 4.184 J

तापमान -: तापमान हे वस्तूच्या उष्णतेचे किंवा थंडपणाचे मोजमाप आहे किंवा वस्तूतील कणांच्या सरासरी गतीज ऊर्जेच्या मोजमापाला तापमान म्हणतात. तापमानाचे SI एकक केल्विन (^{0}K) आहे.

तापमानाची इतर एकके -: डिग्री सेल्सिअस किंवा डिग्री सेंटीग्रेड (^{0}C), डिग्री फॅरेनहाइट (^{0}F).

उष्णता आणि तापमानातील फरक -:

अ .क्र.	उष्णता	तापमान
1	उष्णता हे ऊर्जेचे स्वरूप आहे जे उबदारपणाची भावना निर्माण करते.	तापमान हे वस्तूच्या उष्णतेचे किंवा थंडपणाचे मोजमाप आहे.
2	उष्णतेचे SI एकक ज्यूल (J)आहे.	तापमानाचे SI एकक केल्विन (^{0}K) आहे.
3	उष्णता हा एक विस्तृत गुणधर्म आहे म्हणजेच 1 कप पाणी उकळण्यासाठी लागणारी उष्णता आणि 5 लिटर पाणी उकळण्यासाठी लागणारी वेगळीवेगळी असते.	तापमान हा एक सखोल गुणधर्म आहे म्हणजे 1 लिटर उकळत्या पाण्याचे आणि 1000 लिटर उकळत्या पाण्याचे समान तापमान असते म्हणजेच 100^0C.
4	उष्णता हे एक कारण आहे.	तापमान हा एक परिणाम आहे.
5	उष्णता जास्त तापमानापासून कमी तापमानाकडे वाहते.	तापमान उष्णतेच्या प्रवाहाची दिशा ठरवते.
6	वस्तूच्या सर्व रेणूंच्या ऊर्जेच्या बेरीजला उष्णता म्हणतात.	वस्तूतील कणांच्या सरासरी गतीज ऊर्जेच्या मोजमापाला तापमान म्हणतात.

उष्णता स्थानांतरणाचे प्रकार-:

उष्णता नेहमीच जास्त तापमान असलेल्या भागावरून कमी तापमान असलेल्या भागाकडे वाहते. उष्णता स्थानांतरणाचे तीन प्रकार आहेत.

1) उष्णता वहन / कंडक्शन (Conduction) -: वस्तूतील कणांच्या वास्तविक हालचालींशिवाय वस्तूच्या जास्त तापमानाच्या भागापासून कमी तापमानाच्या भागाकडे उष्णता प्रवाहित होण्याच्या प्रक्रियेला उष्णता वहन म्हणतात. उष्णता वहन ही प्रक्रिया घन पदार्थांमध्ये होत असते.

उदा. -: धातूचा बार गरम करणे.

2) उष्णता संवहन / कन्वेक्शन (Convection) -: वस्तूतील कणांच्या वास्तविक हालचालींसकट वस्तूच्या जास्त तापमानाच्या भागापासून कमी तापमानाच्या भागाकडे उष्णता प्रवाहित होण्याच्या प्रक्रियेला उष्णता संवहन म्हणतात. उष्णता संवहन ही प्रक्रिया द्रव पदार्थांमध्ये होत असते.

उदा. -: पाणी उकळणे.

3) रेडिएशन (Radiation) -: उष्णता स्थानांतरणाच्या ज्या प्रक्रियामध्ये उष्णता एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी मध्यस्थी न करता म्हणजेच कोणत्याही माध्यमाशिवाय थेट स्थानांतरित होण्याच्या प्रक्रियेला रेडिएशन म्हणतात. रेडिएशन ही प्रक्रिया वायू किंवा व्हॅक्यूममध्ये (निर्वातमध्ये) होत असते.

उदा. -: सूर्याची उष्णता पृथ्वीवर पोहचणे म्हणजेच सौर विकिरणे.

खालील आकृती उष्णता स्थानांतरणाचे तीन प्रकार दर्शवते -:



आकृती -: उष्णता वहन, उष्णता संवहन आणि रेडिएशन

Reference -: https://scienceready.com.au/pages/conduction-convection-and-radiation

1) उष्णता वहनाचे उपयोग (Applications of Conduction) -:

अ) उष्णतेचा सुवाहकामध्ये उष्णता वाहनाचे उपयोग-:

- महागड्या घटकाला जास्त उष्णतेपासून वाचवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक सर्किटमध्ये उष्णतेचा सुवाहक (Good Conductor) उष्णता शोषून (Heat Sink) घेण्यासाठी वापरला जातो.
- डेव्हीचा सुरक्षा दिव्यात उष्णतेचा सुवाहक (Good Conductor) वापरला जातो.
- इलेक्ट्रिक हीटरच्या कॉइलला आच्छादित करण्यासाठी उष्णतेचा सुवाहकापासून बनलेली आवर्त नळी (Spiral Tube) वापरली जाते.
- रेफ्रिजरेटरमधील कंडेन्सर कॉइल तांब्यासारख्या उष्णतेचा सुवाहकापासून बनलेली असते.
- इलेक्ट्रिक मशिन वेगाने थंड करण्यासाठी इलेक्ट्रिक मशिनमध्ये हायड्रोजन वायू भरला जातो.

ब) उष्णतेचा दुर्वाहकामध्ये उष्णता वाहनाचे उपयोग

- बर्फाच्या पेटीत थर्मोकोलसारख्या उष्णतेचा दुर्वाहक (Bad Conductor) वापरला जातो कारण थर्मोकोलमध्ये बर्फ खूप हळूहळू वितळतो.
- रेफ्रिजरेटरमध्ये उष्णतेचा दुर्वाहकाचा (इन्सुलेशनचा) वापर केला जातो.
- कुकरचे हँडल प्लॅस्टिकसारख्या उष्णतेचा दुर्वाहकापासून बनलेले असते.
- थर्मास फ्लास्कच्या दुहेरी भिंतींतील व्हॅक्यूममधून उष्णता वाहून जात नाही कारण व्हॅक्यूम हा उष्णतेचा दुर्वाहक आहे त्यामुळे थर्मास फ्लास्कमधील द्रव्य जास्त काळ गरम राहते.
- भुश्यामध्ये उष्णतेचा चांगला दुर्वाहक गुणधर्म असतो म्हणून भुसा बर्फाच्या ठोकळ्यावर लावला जातो.

2) उष्णता संवहनाचे उपयोग (Applications of Convection) -:

- खोलीचे वायुवीजन (रूम व्हेंटिलेशन)
- वादळी वाऱ्यांची निर्मिती करणे
- सागरी वाऱ्यांची आणि जमिनीवरील वाऱ्यांची निर्मिती करणे
- गॅस भरून कॉइल केलेले विद्युत दिवे (इलेक्ट्रिक लॅम्प्स)
- विद्युत पंखे
- वातानुकूलित यंत्र (एअर कंडिशनर)
- रेफ्रिजरेटर
- ऑटोमोबाईल इंजिन मधील कूलिंग सिस्टम

3) रेडिएशनचे उपयोग (Applications of Radiation) -:

- पांढऱ्या रंगाच्या कपड्याला उन्हाळ्यात प्राधान्य दिले जाते कारण पांढरा रंग कमी उष्णता शोषून घेतो.
- कार आणि मशीनमधील उष्णता रेडिएटर्स (हीट रेडिएटर्स) काळ्या रंगाने रंगवलेले असतात त्यामुळे उष्णता बाहेर पसरली जाते आणि आत थंड वातावरण राहते.
- उष्णतेचे शोषण कमी करण्यासाठी विमाने आणि जहाजे पांढऱ्या रंगाने रंगवले जातात.
- एचआयव्ही विषाणू निष्क्रिय करण्यासाठी रेडिएशनचा वापर केला जातो.
- स्पेस क्राफ्टचा किंवा अवकाशयानाचा पृष्ठभाग पॉलिश केलेला असतो त्यामुळे सूर्यापासून उत्सर्जित होणारी जास्तीत जास्त उष्णता परावर्तित होते.
- टीपॉट्स किंवा चहाच्या भांड्यांचा आणि किटलीचा पृष्ठभाग स्वच्छ आणि चकचकीत चमकणारा असतो.
- स्वयंपाकाच्या भांड्यांचे बूड काळ्या रंगाने रंगवलेले जातात कारण काळा रंग उत्तम उष्णता शोषक असतो त्यामुळे स्वयंपाकाला गती मिळते.
- पाण्याच्या वाफेत अधिक उष्णता शोषून घेण्याची शक्ती असते ही एक नैसर्गिक देणगी आहे.

उष्णतेचे सुवाहक -: ज्या पदार्थातून उष्णता सहज आणि वेगाने वाहून जाते त्याला उष्णतेचे सुवाहक म्हणतात. उष्णतेचे सुवाहकाची उदाहरणे -: तांबे, लोह, ॲल्युमिनियम इ.

आकृती -: उष्णतेचे सुवाहकाची उदाहरणे

Reference -: https://electricitytohitei.blogspot.com/2017/04/good-conductors-of-electricity.html

उष्णतेचे दुर्वाहक / इन्सुलेटर -: ज्या पदार्थातून उष्णता वाहत नाही किंवा प्रवाहित होत नाही त्याला उष्णतेचे दुर्वाहक / इन्सुलेटर म्हणतात. उष्णतेचे दुर्वाहकाची / इन्सुलेटरची उदाहरणे -: लाकूड, लोकर, प्लास्टिक इ.

आकृती -: उष्णतेचे दुर्वाहकाची / इन्सुलेटरची उदाहरणे

Reference -: https://k8schoollessons.com/conductors-and-insulators/

उष्णता वहन, उष्णता संवहन आणि रेडिएशन मधील फरक -:

अ .क्र.	उष्णता वहन / कंडक्शन	उष्णता संवहन / कन्वेक्शन	रेडिएशन
1	वस्तूतील कणांच्या वास्तविक हालचालींशिवाय वस्तूच्या जास्त तापमानाच्या भागापासून कमी तापमानाच्या भागाकडे उष्णता प्रवाहित होण्याच्या प्रक्रियेला उष्णता वहन म्हणतात.	वस्तूतील कणांच्या वास्तविक हालचालींसकट वस्तूच्या जास्त तापमानाच्या भागापासून कमी तापमानाच्या भागाकडे उष्णता प्रवाहित होण्याच्या प्रक्रियेला उष्णता संवहन म्हणतात.	उष्णता स्थानांतरणाच्या ज्या प्रक्रियामध्ये उष्णता एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी मध्यस्थी न करता म्हणजेच कोणत्याही माध्यमाशिवाय थेट स्थानांतरित होण्याच्या प्रक्रियेला रेडिएशन म्हणतात.
2	उष्णता वहन ही प्रक्रिया घन पदार्थांमध्ये होत असते.	उष्णता संवहन ही प्रक्रिया द्रव पदार्थांमध्ये होत असते.	रेडिएशन ही प्रक्रिया वायूमध्ये होत असते.
3	पदार्थाचे माध्यम आवश्यक असते.	पदार्थाचे माध्यम आवश्यक असते.	पदार्थाचे माध्यम आवश्यक नसते.
4	धातूचा बार स्वतः माध्यम म्हणून कार्य करतो.	द्रव्य स्वतः माध्यम म्हणून कार्य करते.	माध्यम असू शकते किंवा कोणतेही माध्यम असू शकत नाही.
5	उदा. -: धातूचा बार गरम करणे.	उदा. -: पाणी उकळणे.	उदा. -: सूर्याची उष्णता पृथ्वीवर पोहचणे

तापमान मापनाच्या श्रेणी (Scales of Temperature) -: तापमान मापनाच्या तीन श्रेणी आहेत.

1) तापमानाचे सेल्सिअस किंवा सेंटीग्रेड स्केल (श्रेणी) -: तापमानाच्या ज्या स्केलमध्ये खालचा स्थिर बिंदू 0^0C (पाण्याचा द्रवणांक) आणि वरचा स्थिर बिंदू 100^0C (पाण्याचा उत्कलणांक) मानला जातो आणि नंतर ह्या स्केलला समान 100 भागांमध्ये विभागुन टाकले जाते. ह्या स्केलच्या प्रत्येक भागाला अंश सेल्सिअस किंवा सेंटीग्रेड (^{0}C) असे म्हणतात. ह्या स्केलला सेल्सिअस किंवा तापमानाचा सेंटीग्रेड स्केल असे म्हणतात.

2) तापमानाचे फॅरेनहाइट स्केल (श्रेणी) -: तापमानाच्या ज्या स्केलमध्ये खालचा स्थिर बिंदू 32^0F (पाण्याचा द्रवणांक) आणि वरचा स्थिर बिंदू 212^0F (पाण्याचा उत्कलणांक) मानला जातो आणि नंतर ह्या स्केलला समान 180 भागांमध्ये विभागुन टाकले जाते. ह्या स्केलच्या प्रत्येक भागाला डिग्री फॅरेनहाइट म्हणजे ^{0}F असे म्हणतात. ह्या स्केलला तापमानाचा फॅरेनहाइट स्केल असे म्हणतात.

3) तापमानाचे केल्विन स्केल (श्रेणी) -: तापमानाच्या ज्या स्केलमध्ये खालचा स्थिर बिंदू 273^0K (पाण्याचा द्रवणांक) आणि वरचा स्थिर बिंदू 373^0K (पाण्याचा उत्कलणांक) मानला जातो आणि नंतर ह्या स्केलला समान 100 भागांमध्ये विभागुन टाकले जाते. ह्या स्केलच्या प्रत्येक भागाला डिग्री केल्विन म्हणजेच ^{0}K असे म्हणतात. ह्या स्केलला तापमानाचा केल्विन स्केल असे म्हणतात.



आकृती (अ) -: सेंटीग्रेड स्केल, फॅरेनहाइट स्केल आणि केल्विन स्केल

^{0}C, ^{0}F, ^{0}K यातील परस्पर संबंध -:

$$C = \frac{F - 32}{1.8} = K - 273$$

C = ^{0}C तापमान (डिग्री सेल्सिअस किंवा सेंटीग्रेड)

F = ^{0}F तापमान (डिग्री फॅरेनहाइट)

K = ^{0}K किंवा ^{0}A तापमान (डिग्री केल्विन)



आकृती (ब) -: सेंटीग्रेड स्केल, फॅरेनहाइट स्केल आणि केल्विन स्केल

Reference -: https://www.shutterstock.com/image-illustration/temperature-scales-showing-differences-between-kelvin-2317878009

औष्णिक वाहकता नियम-:

समजा AB हा एक धातूचा बार आहे आणि ह्या धातूच्या बारचे आडव्या भागाचे क्षेत्रफळ (क्रॉस सेक्शनल एरिया) 'A' आहे. हा धातूचा बार स्थिर स्थितीत आहे. ह्या धातूच्या बारमध्ये 'C' आणि 'D' हे दोन प्रतले विचारात घ्या.



आकृती -: धातूच्या बारमधून वाहणारी उष्णता (Q)

समजा, Q = C ते D पर्यंत वाहणाऱ्या उष्णतेचे प्रमाण

d = C आणि D मधील अंतर

θ_1 = C प्रतलाचे तापमान

θ_2 =D प्रतलाचे तापमान

$\theta_1 > \theta_2$

औष्णिक वाहकता नियमाचे विधान -: हे असे नमूद करते की स्थिर स्थितीत असलेल्या पदार्थामधून किंवा धातूचा बारमधून वाहणाऱ्या उष्णतेचे प्रमाण (Q) हे,

1) धातूच्या बारचे आडव्या भागाचे क्षेत्रफळाच्या (क्रॉस सेक्शनल एरिया) 'A'

2) दोन प्रतलांच्या तापमानातील फरकाच्या (θ_1 - θ_2)

3) जितकी वेळ उष्णता वाहते त्या वेळेच्या (t), सम प्रमाणात असते आणि

4) दोन प्रतलांमधील अंतराच्या (d) व्यस्त प्रमाणात असते.

म्हणून,

$Q \alpha A$,

$$Q \alpha (\theta_1 - \theta_2),$$

$$Q \alpha t ,$$

$$\frac{Q \alpha 1}{d}$$

सर्व समीकरणे एकत्र केल्यास, आपल्याला मिळते,

$$Q \propto \frac{A(\theta_1 - \theta_2)t}{d}$$

$$Q = \frac{KA(\theta_1 - \theta_2)t}{d}$$

येथे K ला उष्णता वाहकतेचा गुणांक म्हणतात.

$$K = \frac{Qd}{A(\theta_1 - \theta_2)t}$$

समजा, $\mathrm{d} = 1,\quad \mathrm{A} = 1,\quad \mathrm{t} = 1,\quad (\theta_1 - \theta_2) = 1$

$$\therefore K = Q$$

उष्णता वाहकतेचा गुणांक (K) -: एका सेकंदात तापमानाच्या स्थिर स्थितीत असलेल्या एकक जाडीच्या बारच्या एकक आडव्या भागाच्या क्षेत्राफळाद्वारे त्याच्या विरुद्ध बाजूंमधील एकक तापमानाच्या फरकासह वाहणाऱ्या उष्णतेच्या प्रमाणाला उष्णता वाहकतेचा गुणांक (K) म्हणतात.

उष्णता वाहकतेच्या गुणांकाची (K) एकके -: S.I. एकक = Watt/m ^{o}K

C.G.S. एकक= cal / cm ^{0}C sec.

M.K.S. एकक = kcal / m ^{0}C sec.

तापमान ग्रेडियंट (T.G.) -: धातूच्या बारच्या प्रति एकक लांबीच्या तापमानात होणाऱ्या बदलाला तापमान ग्रेडियंट (T.G.) म्हणतात.

$$T.\ G. = \frac{(\theta_1 - \theta_2)}{d}$$

तापमान ग्रेडियंटची (T. G.) एकके ^{0}C/m किंवा ^{0}K/mआहे.

परिवर्तनीय स्थिती (Variable State) -: ज्या स्थितीत धातूच्या बारचे तापमान वाढत जाते त्या स्थितीला परिवर्तनीय स्थिती म्हणतात.

स्थिर स्थिती (Steady State) -: ज्या स्थितीत धातूच्या बारचे तापमान स्थिर राहते त्या स्थितीला स्थिर स्थिती म्हणतात.

न्यूटनच्या शीतकरणाचा नियम -: यात असे म्हटले आहे की जेव्हा गरम पदार्थ सभोवतालच्या परिसरात थंड केला जातो तेव्हा पदार्थातील उष्णता नष्ट होण्याचा दर, पदार्थ आणि त्याच्या सभोवतालच्या तापमानातील फरकाच्या सम प्रमाणात असतो. न्यूटनचा शीतकरणाचा नियम सभोवतालच्या तापमानातील लहान फरकासाठी लागू होतो.

उदाहरण -: गरम चहाचा कप किंवा उकळलेले पाणी हवेत ठेवल्यास ते हळूहळू थंड होते.

न्यूटनच्या शीतकरणाच्या नियमाच्या अटी किंवा गृहीतके -:

1) उष्णतेच्या वहनामुळे उष्णतेचे नुकसान नगण्य होते.

2) स्थिर हवेच्या प्रवाहात किंवा सक्तीच्या संवहनात पदार्थ थंड होतो.

3) संपूर्ण गरम पदार्थाचे तापमान एकसमान असते.

न्यूटनच्या शीतकरणाच्या नियमानुसार,

(गरम पदार्थाच्या उष्णतेच्या नुकसानाचा दर) $\propto$ (गरम पदार्थ आणि परिसर यांच्यातील तापमानाचा फरक)

$$-\frac{dQ}{dt} \propto (\theta - \theta_s)$$

θ = गरम पदार्थाचे तापमान

θ_s = सभोवतालचे तापमान

t = ज्या वेळेसाठी गरम पदार्थ थंड वातावरणात ठेवले जाते.

dQ = 'dt' इतक्या छोट्याशा वेळेत उष्णतेचे नुकसान

$d\theta$ = 'dt' इतक्या छोट्याशा वेळेत तापमानातील छोटीशी घसरण

m = गरम पदार्थाचे वस्तुमान

s = गरम पदार्थाची विशिष्ट उष्णता

$$-\frac{dQ}{dt} = K(\theta - \theta_s) \qquad \text{परंतु} \quad dQ = m \times s \times d\theta$$

हे न्यूटनच्या शीतकरणाच्या नियमाचे समीकरण आहे.

वायूचे (गॅसचे) नियम

1) बॉयलचा नियम -: बॉयलचा नियम सांगतो की वायूच्या स्थिर वस्तुमानासाठी, वायूचे तापमान स्थिर असतांना, वायूचा दाब हा त्याच्या घनफळाशी व्यस्त प्रमाणात असतो.

म्हणजेच, वायूचे तापमान स्थिर असतांना,

$$P \propto \frac{1}{V}$$

$$\therefore P = \text{स्थिरांक} \times \frac{1}{V}$$

$$\therefore PV = \text{स्थिरांक}$$

अशा प्रकारे, स्थिर तापमानात, P_1 आणि V_1 हे प्रारंभिक दाब आणि प्रारंभिक घनफळ आहेत, जे अनुक्रमे P_2 आणि V_2 ह्या अंतिम दाबात आणि अंतिम घनफळात बदलतात.

$$\therefore P_1V_1 = P_2V_2 = \text{स्थिरांक}$$

बॉयलच्या नियमाची उदाहरणे -: पाण्यातील मासे, सिरिंज (इंजक्शन), फुफ्फुसे, स्कूबा डायव्हिंग (पाण्याखालील डायव्हिंग), सायकलचा पंप, स्प्रे पेंट, सोडा कॅन इ.



Reference -: https://www.len.com.ng/csblogdetail/636/Examples-of-Boyle-s-law-in-real-life

2) चार्ल्सचा नियम -: चार्ल्सचा नियम सांगतो की वायूच्या स्थिर वस्तुमानासाठी, वायूचा दाब स्थिर असतांना, वायूचे घनफळ हे त्याच्या परिपूर्ण तापमानाशी सम प्रमाणात असते.

म्हणजेच, वायूचा दाब स्थिर असतांना, $V \propto T$

$$V = \text{स्थिरांक} \times T$$

$$\therefore \frac{V}{T} = \text{स्थिरांक}$$

अशा प्रकारे, स्थिर दाब असतांना, V_1 आणि T_1 हे प्रारंभिक घनफळ आणि प्रारंभिक तापमान आहेत, जे अनुक्रमे V_2 आणि T_2 ह्या अंतिम घनफळात आणि अंतिम तापमानत बदलतात.

$$\frac{V_1}{T_1} = \frac{V_2}{T_2} = \text{स्थिरांक}$$

चार्ल्सच्या नियमाची उदाहरणे -: फुफ्फुसे, गरम हवेचा फुगा, हेलियमचा फुगा, पाव (ब्रेड), पिंग पाँग बॉल, टायर प्रेशर हिवाळ्यात कमी असतो, दुर्गंधीनाशक फवारणीची बाटली इ.



Reference -: https://www.youtube.com/watch?v=OnUsGGUVNlw

3) गाय लुसाकचा नियम -: गाय लुसाकचा नियम असे सांगतो की वायूच्या स्थिर वस्तुमानासाठी, वायूचे घनफळ स्थिर असतांना, वायूचा दाब हा त्याच्या परिपूर्ण तापमानाशी सम प्रमाणात असतो.

म्हणजेच, वायूचे घनफळ स्थिर असतांना,

$$P \propto T$$

$$\therefore P = \text{स्थिरांक} \times T$$

$$\therefore \frac{P}{T} = \text{स्थिरांक}$$

अशा प्रकारे, वायूचे घनफळ स्थिर असतांना, P_1 आणि T_1 हे प्रारंभिक दाब आणि प्रारंभिक तापमान आहेत, जे अनुक्रमे P_2 आणि T_2 ह्या अंतिम दाबात आणि अंतिम तापमानात बदलतात.

$$\frac{P_1}{T_1} = \frac{P_2}{T_2} = \text{स्थिरांक}$$

गाय लुसाकच्या नियमाची उदाहरणे -: प्रेशर कुकर, हीटर, एरोसोल कॅन, टायर प्रेशर इ.



Reference -: https://kaiserscience.wordpress.com/2019/10/08/gay-lussacs-law-amontons-law/

सामान्य वायू समीकरण किंवा परिपूर्ण वायू समीकरण -:

गाय लुसाकच्या नियमानुसार,

$$P \propto T \qquad ....(1)$$

चार्ल्सच्या नियमानुसार,

$$V \propto T \qquad ....(2)$$

समीकरण (1) आणि समीकरण (2) एकत्र केल्याने आपल्याला खालील समीकरण मिळते,

$$PV \propto T$$

$$PV = RT$$

वरील समीकरण वेगवेगळ्या परिस्थितीत समान वस्तुमानाच्या वायूसाठी आहे म्हणजे R चे मूल्य NTP (सामान्य तापमान दाब) स्थितीतील सर्व वायूंसाठी सारखे असते. हे समीकरण सामान्य वायू समीकरण किंवा परिपूर्ण वायू समीकरण म्हणून ओळखले जाते आणि R ला वैश्विक वायू स्थिरांक म्हणतात. R चे मूल्य 8314.91 J/^{o}K Kg-mol आहे.

आदर्श वायू समीकरण -:

सामान्य वायू समीकरण किंवा परिपूर्ण वायू समीकरण विचारात घेऊ

$$PV = RT$$

जर मोलमध्ये वायूचे प्रमाण मोजायचे असेल, तर वरील समीकरणात R च्या जागी k असतो, म्हणजेच आपल्याला नवीन समीकरण मिळेल,

$$PV = kT,$$

वायूच्या वेगवेगळ्या वस्तुमानांसाठी k चे मूल्य भिन्न आहे. येथे k हा विशिष्ट वायू स्थिरांक आहे म्हणून समीकरण,

$$PV = kT,$$

हे आदर्श वायू समीकरण म्हणून ओळखले जाते.

परिपूर्ण शून्याची संकल्पना -:

परिपूर्ण शून्य तापमान: ज्या तापमानावर वायूचे दाब आणि घनफळ सैद्धांतिकदृष्ट्या शून्य होते त्याला परिपूर्ण शून्य तापमान म्हणतात. असे आढळून येते की -273^{0}C वर, वायूचा दाब आणि घनफळ सैद्धांतिकदृष्ट्या शून्य होते म्हणून, -273^{0}C हे परिपूर्ण शून्य तापमान आहे.

तापमानाची परिपूर्ण श्रेणी किंवा केल्विन स्केल -: वायूंसाठी, -273^{0}C हे किमान संभाव्य तापमान आहे. म्हणून, -273^{0}C पासून सुरू होणाऱ्या नवीन श्रेणीला (स्केलला) केल्विन स्केल किंवा तापमानाची परिपूर्ण श्रेणी म्हणतात. म्हणून, -273^{0}C = 0^{0}K.

NTP किंवा STP -: NTP किंवा STP म्हणजे सामान्य तापमान आणि दाब किंवा आदर्श तापमान आणि दाब. NTP किंवा STP वर, सामान्य तापमानाचे मूल्य 0^{0}C किंवा 273^{0}K असते आणि सामान्य दाबाचे मूल्य 1 ॲटमोस्पेअर किंवा 76 सेमी पारा असते.

वायूची विशिष्ट उष्णता (C) -: 1Kg वायूचे तापमान 1^{0}C किंवा 1^{0}K ने वाढवण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेला **वायूची विशिष्ट उष्णता (C)** असे म्हणतात.

वायूच्या विशिष्ट उष्णतेची एकके -: cal/gm^{0}K -: वायूच्या विशिष्ट उष्णतेचे CGS एकक.

Kcal/Kg^{0}K -: वायूच्या विशिष्ट उष्णतेचे MKS एकक.

J/kg^{0}K -: वायूच्या विशिष्ट उष्णतेचे SI एकक.

वायू त्यांच्या दाब, घनफळ आणि तापमानातील बदलांसाठी खूप संवेदनशील असतात. यांपैकी कोणताही एक पॅरामीटर बदलल्यास, इतर दोन पॅरामीटर्समध्ये लक्षणीय बदल होतात. त्यामुळे वायूंमध्ये दोन विशिष्ट उष्णता असतात म्हणजे स्थिर दाबाची विशिष्ट उष्णता आणि स्थिर घनफळाची विशिष्ट उष्णता. म्हणून वायूच्या विशिष्ट उष्णतेचे दोन प्रकार आहेत.

वायूच्या विशिष्ट उष्णतेचे प्रकार -:

1) वायूच्या स्थिर घनफळाची विशिष्ट उष्णता (C_V) -: वायूचे घनफळ स्थिर असतांना, 1Kg वायूचे तापमान 1^0C ने किंवा 1^0K ने वाढवण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेला वायूच्या स्थिर घनफळाची विशिष्ट उष्णता (C_V) म्हणतात.

2) वायूच्या स्थिर दाबाची विशिष्ट उष्णता (C_P) -: वायूचा दाब स्थिर असतांना,1Kg वायूचे तापमान 1^0C ने किंवा 1^0K ने वाढवण्यासाठी लागणाऱ्या उष्णतेला वायूच्या स्थिर दाबाची विशिष्ट उष्णता (C_P) म्हणतात.

C_P ही C_V पेक्षा मोठी का आहे? -:

- जर वायू स्थिर घनफळावर गरम केला असेल तर वायूच्या प्रसरणासाठी उष्णता वापरली जात नाही म्हणजेच तेथे कोणतेही बाह्य कार्य होत नाही. संपूर्ण उष्णता वायूचे तापमान वाढविण्यासाठी वापरली जाते.
- आता जर वायू स्थिर दाबावर गरम केला असेल तर तेथे उष्णता दोन प्रकारे वापरली जाते:
  1) वायूच्या प्रसरणासाठी म्हणजेच वायूचे प्रमाण वाढवून बाह्य कार्य करण्यासाठी आणि
  2) वायूचे तापमान वाढविण्यासाठी.
- म्हणून, जेव्हा वायू स्थिर दाबावर गरम केला जातो तेव्हा वायूच्या प्रसरणासाठी काही अतिरिक्त उष्णता आवश्यक असते म्हणजे,

  $C_P = C_V +$ वायूचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त उष्णता (H)
- म्हणून C_P ही C_V पेक्षा मोठी आहे.

C_P आणि C_V मधील परस्पर संबंध किंवा मेयरचे समीकरण -:

जेव्हा वायू स्थिर दाबावर गरम केला जातो तेव्हा वायूच्या प्रसरणासाठी काही अतिरिक्त उष्णता आवश्यक असते म्हणजे,

$C_P = C_V$ + वायूचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक असणारी अतिरिक्त उष्णता (H)

$$C_P = C_V + H$$

$$C_P - C_V = H$$

ज्यूलच्या नियमावरून, $H = \frac{W}{J}$

$$\therefore C_P - C_V = \frac{W}{J}$$

परंतु, दाब स्थिर असतांना झालेले कार्य खालील प्रमाणे आहे.

$$W = P(V_2 - V_1)$$

परिपूर्ण वायू समीकरणानुसार, $PV = RT$

दाब स्थिर असतांना, $PV_1 = RT_1$ & $PV_2 = RT_2$

$$P(V_2 - V_1) = R(T_2 - T_1)$$

$$\therefore W = R(T_2 - T_1)$$

$$\therefore C_P - C_V = \frac{R(T_2 - T_1)}{J}$$

परंतु,, $T_2 - T_1 = 1°C = 1°K$

$$\therefore C_P - C_V = \frac{R}{J}$$

हे मेयरचे समीकरण आहे.

R= वैश्विक वायू स्थिरांक जेव्हा वायूचे वस्तुमान 1 किलो मोल असते.

पण इथे 1 किलो गॅस मानला जातो.

$$C_P - C_V = \frac{R}{MJ} \ or \ C_P - C_V = \frac{R'}{J}$$

M = आण्विक वजन आणि $R' = \frac{R}{M}$

विशिष्ट उष्णतेंचे किंवा ॲडियाबॅटिक निर्देशांकाचे गुणोत्तर (γ) -:

C_P आणि C_V च्या गुणोत्तराला ॲडियाबॅटिक निर्देशांक (adiabatic index) म्हणतात. म्हणजे,

$$\frac{C_P}{C_V} = \gamma$$

$$\frac{C_P}{C_V} > 1 \text{ म्हणजे } \gamma > 1 \text{ कारण } C_P > C_V$$

γ = 1.66 (मोनोॲटोमिक वायूंसाठी)

γ = 1.41 (डायॲटोमिक वायूंसाठी)

γ = 1.31 (ट्रायॲटोमिक वायूंसाठी)

तंतू प्रकाश शास्त्र (Fiber Optics) -:

प्रकाशाचे परावर्तन (Reflection of Light) -: जेव्हा प्रकाशकिरण एका माध्यमात प्रवास करतांना समतल परावर्तित पृष्ठभागावर येतो आणि प्रकाश किरण पुन्हा त्याच माध्यमात ह्या पृष्ठभागावरून परावर्तित होतो तेव्हा त्याला प्रकाशाचे परावर्तन म्हणतात.

Incident Ray = आपाती प्रकाश किरण
Reflected Ray = परावर्तित प्रकाश किरण
Normal = लंब
Angle of Incidence = आपाती कोन
Angle of Reflection = परावर्तन कोन



आकृती -: प्रकाशाचे परावर्तन

Reference -: https://www.linkedin.com/pulse/laws-reflection-digitaleschool-bfcgf

लंब -: आरशासारख्या समतल परावर्तित पृष्ठभागावरील काटकोनात असलेल्या उभ्या रेषेला लंब म्हणतात.

आपाती प्रकाश किरण -: जो प्रकाश किरण समतल परावर्तित पृष्ठभागाकडे येतो त्याला आपाती प्रकाश किरण म्हणतात.

आपाती कोन (i) : परावर्तित पृष्ठभागावर पडणाऱ्या प्रकाश किरणाने लंब रेषेसोबत तयार केलेल्या कोनाला आपाती कोन (i) म्हणतात.

परावर्तित प्रकाश किरण: जो प्रकाश किरण समतल परावर्तित पृष्ठभागावरून त्याच माध्यमात परत येतो त्याला परावर्तित प्रकाश किरण म्हणतात.

परावर्तन कोन (r) -: परावर्तित प्रकाश किरणाने लंब रेषेसोबत तयार केलेल्या कोनाला परावर्तन कोन (r) म्हणतात.

प्रकाशाच्या परावर्तनाचे नियम -:

1) आपाती कोन हा परावर्तनाच्या कोनाइतका असतो म्हणजे $\angle i = \angle r$.

2) आपाती किरण, परावर्तित किरण आणि परावर्तित पृष्ठभागावरील लंब हे एकाच प्रतलात असतात.

कमी वेळेचे तत्त्व (Principle of Least Time) -: हे असे सांगते की सर्व संभाव्य मार्गांपैकी, प्रकाश एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूकडे जाऊ शकतो; प्रकाश सर्वात कमी वेळ घेणाऱ्या मार्गाने प्रवास करतो. पिरे फर्मेट (Pierre Fermat) या शास्त्रज्ञाने हे तत्व शोधून काढले आहे.

प्रकाशाचे अपवर्तन (Refraction of Light) -: प्रकाशकिरण त्याच्या मार्गाची दिशा बदलतो किंवा वाकतो, जेव्हा तो एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात प्रवेश करतो तेव्हा त्याला प्रकाशाचे अपवर्तन म्हणतात.

Incident Ray = आपाती प्रकाश किरण

Refracted Ray = अपवर्तित प्रकाश किरण

Normal = लंब

Angle of Incidence = आपाती कोन

Angle of Refraction = अपवर्तन कोन



आकृती -: प्रकाशाचे अपवर्तन

Reference -: https://www.studypug.com/physics-help/refraction-of-light-and-snells-law

लंब -: काचेसारख्या समतल पारदर्शक पृष्ठभागावरील काटकोनात असलेल्या उभ्या रेषेला **लंब** म्हणतात.

आपाती प्रकाश किरण -: पहिल्या माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाणाऱ्या प्रकाश किरणाला आपाती प्रकाश किरण म्हणतात.

आपाती कोन (i) -: पारदर्शक पृष्ठभागावर पडणाऱ्या प्रकाश किरणाने लंब रेषेसोबत तयार केलेल्या कोनाला आपाती कोन (i) म्हणतात.

अपवर्तित किरण -: जेव्हा प्रकाशकिरण दुसऱ्या माध्यमात गेल्यावर वाकतो तेव्हा त्याला अपवर्तित किरण म्हणतात.

अपवर्तन कोन (r) -: अपवर्तित प्रकाश किरणाने लंब रेषेसोबत तयार केलेल्या कोनाला अपवर्तन कोन (r) म्हणतात.

प्रकाशाच्या अपवर्तनाचे नियम -:

1) आपाती किरण, अपवर्तित किरण आणि पारदर्शक पृष्ठभागावरील लंब हे एकाच प्रतलात असतात.

2) स्नेलचा अपवर्तनाचा नियम **-:** स्नेलच्या नियमानुसार, कोणत्याही दोन माध्यमांसाठी, आपाती कोनाचा साइन आणि अपवर्तन कोनाचा साइन यांचे गुणोत्तर स्थिर असते. म्हणजे,

$$\frac{\sin i}{\sin r} = \text{स्थिरांक} = \mu$$

आपाती कोन (i) आणि अपवर्तन कोन (r)

μ या स्थिरांकास पहिल्या माध्यमाच्या संदर्भात दुसऱ्या माध्यमाचा अपवर्तनांक म्हणतात आणि हा स्थिरांक $_1\mu_2$ ह्या चिन्हाने दर्शवितात.

$$\therefore \frac{\sin i}{sinr} = \ _1\mu_2 = \frac{\mu_2}{\mu_1} = \text{स्थिरांक} = \mu = \frac{\text{दुसऱ्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_2)}{\text{पहिल्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_1)}$$

वेगाच्या संदर्भात अपवर्तनांकाची व्याख्या -: पहिल्या माध्यमातील प्रकाशाचा वेग आणि दुसऱ्या माध्यमातील प्रकाशाचा वेग यांच्या गुणोत्तराला अपवर्तनांक म्हणतात. म्हणजे,

$$\mu = \frac{\text{पहिल्या माध्यमातील प्रकाशाचा वेग } (\boldsymbol{v_1})}{\text{दुसऱ्या माध्यमातील प्रकाशाचा वेग}(\boldsymbol{v_2})} = \ _1\mu_2 = \frac{\mu_2}{\mu_1} = \frac{v_1}{v_2}$$

स्नेलच्या अपवर्तनाच्या नियमाचे महत्त्व -:

स्थिती 1 -: जेव्हा प्रकाश किरण हवेच्या माध्यमातून (विरळ माध्यम) काचेच्या माध्यमात (दाट मध्यम) प्रवेश करतो तेव्हा प्रकाश किरण लंबाच्या दिशेने वाकतो.



Reference -: https://www.schoolphysics.co.uk/age11-14/Light/text/Refraction_/index.html

अशा प्रकारे, $i > r$

$$\therefore \frac{sin\, i}{sin\, r} = \text{स्थिरांक} > 1$$

या स्थिरांकास हवेच्या माध्यमाच्या संदर्भात काचेच्या माध्यमाचा अपवर्तनांक म्हणतात आणि त्यास $_a\mu_g$ असे दर्शवतात. म्हणजे,

$$_a\mu_g = \frac{\text{हवेच्या माध्यमातील प्रकाशाचा वेग } (v_a)}{\text{काचेच्या माध्यमातील प्रकाशाचा वेग} (v_g)} = \frac{\text{काचेच्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_g)}{\text{हवेच्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_a)} = \frac{\sin i}{\sin r} > 1$$

स्थिती 2 -: जेव्हा प्रकाश किरण काचेच्या माध्यमातून (दाट मध्यम) हवेच्या माध्यमात (विरळ माध्यम) प्रवेश करतो तेव्हा प्रकाश किरण लंबापासून दूर वाकतो.



Reference -: https://www.schoolphysics.co.uk/age11-14/Light/text/Refraction_/index.html

$$\text{अशा प्रकारे,} \quad i < r, \quad \therefore \frac{\sin i}{\sin r} = \text{स्थिरांक} < 1$$

या स्थिरांकास काचेच्या माध्यमाच्या संदर्भात हवेच्या माध्यमाचा अपवर्तनांक म्हणतात आणि त्यास $_g\mu_a$ असे दर्शवतात. म्हणजे,

$$_g\mu_a = \frac{\text{काचेच्या माध्यमातील प्रकाशाचा वेग } (v_g)}{\text{हवेच्या माध्यमातील प्रकाशाचा वेग} (v_a)} = \frac{\text{हवेच्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_a)}{\text{काचेच्या माध्यमाचा अपवर्तनांक } (\mu_g)}$$

$$_g\mu_a = \frac{\sin i}{\sin r} < 1$$

$$\text{अशा प्रकारे,} \quad _a\mu_g = \frac{1}{_g\mu_a}$$

संपूर्ण अंतर्गत परावर्तन (TIR – Total Internal Reflection) किंवा ऑप्टिकल फायबरचे तत्त्व -: जर प्रकाश जास्त अपवर्तनांकाच्या माध्यमातून (दाट किंवा काचेचे माध्यम) कमी अपवर्तनांकाच्या माध्यमात (विरळ किंवा हवेचे माध्यम) प्रवेश करत असेल आणि जर आपाती कोन हा निर्णायक कोनापेक्षा जास्त असेल तर केवळ परावर्तन होते आणि कोणतेही अपवर्तन होत नाही याला प्रकाशाचे संपूर्ण अंतर्गत परावर्तन किंवा ऑप्टिकल फायबरचे तत्त्व म्हणतात.



आकृती -: संपूर्ण अंतर्गत परावर्तन

समजा प्रकाशाचा स्रोत काचेच्या माध्यमात आहे. वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे बिंदू स्रोत S पासून प्रकाश किरणे सुरु होऊन, दाट माध्यमातून (काच) विरळ माध्यमात (हवा) प्रवेश करत आहेत. येथे a, b, c या प्रकाश किरणांसाठी, काचेचे माध्यम आणि हवेचे माध्यम यांच्यामधील सीमेवर परावर्तन आणि अपवर्तन दोन्ही होते. प्रकाश किरण d साठी, अपवर्तनाचा कोन 90^0 आहे म्हणजे अपवर्तित किरण काचेचे माध्यम आणि हवेचे माध्यम यांच्यामधील सीमेवर प्रवास करत आहे आणि संबंधित कोन (i_3) याला निर्णायक कोन (θ_C) म्हणतात. e & f किरणांसाठी, आपाती कोन हा निर्णायक कोन (θ_C) पेक्षा जास्त आहे. त्यामुळे e & f किरणांसाठी, कोणतेही अपवर्तन होत नाही आणि फक्त परावर्तन होते म्हणजेच संपूर्ण अंतर्गत परावर्तन होते.

निर्णायक कोन (Critical Angle - θ_c) -: ज्या आपाती कोनावर अपवर्तनाचा कोन 90^0 असतो त्याला निर्णायक कोन (θ_c) म्हणतात.

संपूर्ण अंतर्गत परावर्तनासाठी आवश्यक अटी -:

1) आपाती कोन हा (i) निर्णायक कोन (θ_C) पेक्षा जास्त असावा म्हणजे $i > \theta_C$.

2) पहिल्या माध्यमाचा अपवर्तनांक (μ_1) दुसऱ्या माध्यमाच्या अपवर्तनांका पेक्षा जास्त असावा (μ_2) म्हणजेच $\mu_1 > \mu_2$.

ऑप्टिकल फायबर -: ऑप्टिकल फायबर हे काच किंवा सिलिका किंवा प्लास्टिकपासून बनविलेले लांब आणि पातळ डायलेक्ट्रिक सामग्री आहे. ऑप्टिकल फायबरमध्ये प्रकाश किरणांचे अनेक संपूर्ण अंतर्गत परावर्तन

झाल्यामुळे प्रकाश किरणे म्हणजेच इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी ऑप्टिकल फायबरच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाहून जातात.

ऑप्टिकल फायबरमधून प्रकाशाचा प्रसार करण्यासाठी आवश्यक अटी -:

1) कोरचा अपवर्तनांक क्लॅडिंगच्या अपवर्तनांका पेक्षा जास्त असावा म्हणजे ($\mu_{core} > \mu_{clad}$).

2) आपाती कोन (i) हा निर्णायक कोन (θ_C) पेक्षा जास्त असावा म्हणजे ($i > \theta_C$).

ऑप्टिकल फायबरची रचना -:



आकृती -: ऑप्टिकल फायबरची रचना

ऑप्टिकल फायबरमध्ये कोर, क्लॅडिंग आणि प्रोटेक्टिव्ह जॅकेट किंवा स्किन असे तीन थर असतात

कोर -: कोर हा ऑप्टिकल फायबरचा सर्वात आतील थर असतो. संपूर्ण प्रकाश कोरमधून प्रसारित केला जातो कारण कोरचा अपवर्तनांक क्लॅडिंगपेक्षा जास्त असतो. कोरच्या अपवर्तनांकाचे विशिष्ट मूल्य 1.48 आहे.

क्लॅडिंग -: क्लॅडिंग हा ऑप्टिकल फायबरचा मधला थर असतो. क्लॅडिंगमुळे प्रकाश लहरी कोरमध्ये राहतात कारण क्लॅडिंगचा अपवर्तनांक कोरपेक्षा कमी असतो म्हणजेच क्लॅडिंग परावर्तकासारखे कार्य करते आणि संपूर्ण अंतर्गत अपवर्तन संकल्पनेनुसार प्रकाश किरणे कोरमधून वाहून जातात. क्लॅडिंगच्या अपवर्तनांकाचे विशिष्ट मूल्य 1.46 आहे. क्लॅडिंग देखील कोरला काही शक्ती प्रदान करते. जेव्हा ऑप्टिकल तंतूंचा समूह एका केबलमध्ये पॅक केला जातो, तेव्हा क्लॅडिंगमुळे शेजारील तंतूंमधील प्रकाश किरणे एकत्र होत नाही.

संरक्षणात्मक त्वचा किंवा जाकीट -: संरक्षणात्मक त्वचा हा सर्वात बाहेरचा थर आहे जो फायबरचे आर्द्रतेपासून संरक्षण करतो. ही संरक्षणात्मक त्वचा ऑप्टिकल फायबरला यांत्रिक शक्ती प्रदान करते.

ऑप्टिकल फायबरची परिमाणे -: ऑप्टिकल फायबरची लांबी 1 किमी असते आणि योग्य कनेक्टर (सांधक) वापरून ते जोडले जाऊ शकतात. ऑप्टिकल फायबर खूप पातळ असतो. फायबरचा बाह्य व्यास 0.1 मिमी ते

0.15 मिमी पर्यंत असतो. कोरच्या व्यासाचा आकार 5 μm ते 600 μm पर्यंतचा असतो (ठराविक मूल्य अंदाजे 50 μm असते). क्लॅडिंगचा व्यास 125 μm ते 750 μm पर्यंत असतो. संरक्षणात्मक त्वचेची जाडी 30 μm ते 50 μm पर्यंत असते. संरक्षणात्मक त्वचा 100 μm जाड असू शकते.

ऑप्टिकल फायबरमधून प्रकाशाचा मार्ग किंवा प्रसार -:



आकृती -: ऑप्टिकल फायबरमधून प्रकाशाचा मार्ग किंवा प्रसार

आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे केबलमधून प्रकाश किरणाचा प्रसार होतो. प्रकाश किरणाचा आपाती कोन निर्णायक कोनापेक्षा जास्त असतो, म्हणून संपूर्ण अंतर्गत परावर्तन होते आणि प्रकाश किरण फायबर केबलच्या पृष्ठभागावरून परावर्तित होते. प्रकाश किरण केबलच्या पृष्ठभागावरून परावर्तित होऊन केबलमधून जाते आणि ते दुसऱ्या टोकाला बाहेर पडते. अशा प्रकारे काचेच्या फायबरमध्ये एका टोकापासून प्रवेश करणारा प्रकाश किरण केबलमध्ये परावर्तित होतो आणि हा प्रकाश किरण दुसऱ्या टोकापासून बाहेर पडतो. हा प्रकाश किरण जो एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जातो त्याला फायबरद्वारे 'प्रकाश मार्गदर्शित' म्हणतात. संपूर्ण अंतर्गत परावर्तनामुळे, प्रकाश किरण अनेक वेळा वाकलेला असला तरीही प्रकाश किरण फायबरमधून प्रसार करत राहील. जर वाकणे जास्त असेल तरच अपवर्तनाचा कोन बदलतो आणि अपवर्तनामुळे प्रकाश किरणाची हानी होते. प्रकाश किरण थोडासा वाकला तरीही प्रकाश केबलमध्येच राहील.

ऑप्टिकल फायबरचे प्रकार (कोरच्या अपवर्तनांकाच्या भिन्नतेवर आधारित ऑप्टिकल फायबरचे प्रकार) -:

1) स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर (प्रसार पद्धतीवर आधारित ऑप्टिकल फायबरचे प्रकार)

a) सिंगल मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर
b) मल्टी मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर

2) श्रेणीबद्ध निर्देशांक ऑप्टिकल फायबर (ग्रेडेड इंडेक्स ऑप्टिकल फायबर)

1) स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर (प्रसार पद्धतीवर आधारित ऑप्टिकल फायबरचे प्रकार) -: ज्या ऑप्टिकल फायबरमध्ये कोरचा अपवर्तनांक संपूर्ण फायबरमध्ये एकसमान असतो त्याला स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर म्हणतात. अशाप्रकारे जर आपण कोरच्या अक्षाच्या दिशेने सरकलो तर असे आढळते कि कोर-क्लॅडिंगच्या सीमेवर अपवर्तनांकात अचानक बदल होतो. स्टेप इंडेक्स फायबरमध्ये, प्रकाशाचा मार्ग किंवा प्रसार नागमोडी (zig-zag) आकारात होतो. प्रसाराच्या पद्धतीवर आधारित स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबरचे दोन प्रकार आहेत.

a) **सिंगल मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर -:** ज्या ऑप्टिकल फायबरमध्ये प्रकाश किरणांच्या प्रसारासाठी एकच मार्ग असतो त्याला सिंगल मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर म्हणतात, म्हणजेच या प्रकारात फक्त एकच नागमोडी मार्ग असतो. या फायबरमध्ये कोरचा व्यास खूपच लहान आहे, तो सुमारे 10 μm असतो.



आकृती -: सिंगल मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर

b) **मल्टीमोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर -:** ज्या ऑप्टिकल फायबरमध्ये किरणांच्या प्रसारासाठी अनेक मार्ग असतात त्यांना मल्टीमोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर म्हणतात. म्हणजेच या प्रकारात अनेक नागमोडी मार्ग असतात. या फायबरमध्ये कोरचा व्यास सिंगल मोडपेक्षा जास्त असतो, तो सुमारे 50 μm ते 200 μm असतो.



आकृती -: मल्टीमोड मोड स्टेप इंडेक्स ऑप्टिकल फायबर

2) मल्टीमोड ग्रेडेड इंडेक्स ऑप्टिकल फायबर (श्रेणीबद्ध निर्देशांक ऑप्टिकल फायबर) -: ज्या ऑप्टिकल फायबरमध्ये किरणांच्या प्रसारासाठी अनेक मार्ग असतात आणि त्यांचा आकार वक्र, गुंडाळलेला आणि पेचदार (कर्ल्ड, कॉइल केलेले, हेलिकल) असतो त्यांना मल्टीमोड ग्रेडेड इंडेक्स ऑप्टिकल फायबर म्हणतात. या फायबरमध्ये कोरचा व्यास 50 μm ते 200 μm पर्यंत बदलतो. ह्या फायबर मध्ये कोरचे अपवर्तनांक सारखे नसतात. कोरचा अपवर्तनांक कोर अक्षावर जास्तीत जास्त असतो आणि जर आपण कोर अक्षातून मूलगामी बाह्य पहिले तर अपवर्तनांकात हळूहळू घट होते.



आकृती -: मल्टीमोड ग्रेडेड इंडेक्स ऑप्टिकल फायबर

ऑप्टिकल फायबरचे उपयोग (Applications of Optical Fiber) -:

1) संवादामध्ये ऑप्टिकल फायबर -: ऑप्टिकल फायबर संप्रेषणात वापरले जाते कारण मोठ्या पट्टरुंदीमुळे (बँडविड्थमुळे) ते अनेक चॅनेलची संख्या हाताळू शकतात.
2) इंटरनेट -: ऑप्टिकल फायबर इंटरनेट किंवा इंटरनेट केबल्समध्ये वापरले जाते कारण ऑप्टिकल फायबर केबल्स अतिशय वेगवान गतीने प्रचंड प्रमाणात डेटा (माहिती) वाहून नेऊ शकतात.
3) टेलिफोन -: ऑप्टिकल फायबर कम्युनिकेशन वापरून आपण वेगवान संपर्क साधू शकतो आणि स्पष्ट संभाषणे करू शकतो.
4) संगणक नेटवर्किंग -: संगणक नेटवर्किंगसाठी ऑप्टिकल फायबर केबलचा वापर केला जातो.
5) हे सैन्यात सिग्नलिंगसाठी वापरले जाते.
6) हे औद्योगिक ऑटोमेशन प्रणालीमध्ये वापरले जाते.
7) हे वैद्यकीय क्षेत्रात शरीराच्या अंतर्गत अवयवांचे निरीक्षण करण्यासाठी वापरले जाते.
8) हे गोपनीय संप्रेषणासाठी संरक्षणात वापरले जाते.

9) हे केबल टेलिव्हिजनमध्ये वापरले जाते.
10) याचा उपयोग डिजिटल डेटा ट्रान्समिशनसाठी केला जातो.
11) हे ऑप्टिकल सेन्सर म्हणून वापरले जाते.
12) हे फेज मॉड्युलेटेड सेन्सर्स, पोलरायझेशन मॉड्युलेटेड सेन्सर्स म्हणून वापरले जाते.

सोडवलेली उदाहरणे

1) एका काचेच्या खिडकीची मापे 100 cm × 50 cm × 5mm आहेत एका तासात Q एवढी उष्णता त्यातून प्रवाहित होते. जर काचेच्या बाहेरील व आतील तापमानातील फरक 50^0 C असेल तर Q किती?

उत्तर -: A = 100 cm × 50 cm = 1 m × 0.5 m = 0.5 m^2

d = 5 mm = 5 × 10^{-3} m

t = 1 hr = 60 sec × 60 sec = 3600 sec.

$\theta_1 - \theta_2 = 50^0$ C

K = 1 w / m/ ^{0}K

$$Q = \frac{KA\,(\theta_1 - \theta_2)t}{d}$$

$$Q = \frac{1 \times 0.5\,(50) \times 3600}{5 \times 10^{-3}}$$

$$Q = 18 \times 10^5\,J$$

2) 140 °F चे °C मध्ये रूपांतर करा

उत्तर -: F = 140 °F

C = ?°C

$$C = \frac{F - 32}{1.8} = \frac{140 - 32}{1.8} = \frac{108}{1.8} = 60\ °\mathrm{C}$$

$$140\ °\mathrm{F} = 60\ °\mathrm{C}$$

3) एका वायूचे 27°C वर 20cc इतके घनफळ आहे. तो स्थिर दाबाने 67°C वर गरम केल्यास अंतिम घनफळ शोधा.

उत्तर -: T_1 = 27°C = 27 + 273 = 300°K

V_1 = 20cc

T_2 = 67°C = 67 + 273 = 340°K

V_2 = ?

$$\frac{V_1}{T_1} = \frac{V_2}{T_2}$$

$$V_2 = \frac{V_1 \times T_2}{T_1} = \frac{20 \times 340}{300}$$

$$\boldsymbol{V_2 = 22.67cc}$$

4) 20°C तापमानाला वायूचे घनफळ 2.5 lit. आणि दाब 70 cm आहे. तर तापमान 30°C आणि दाब 85 cm असतांना घनफळ किती असेल?

उत्तर -: T_1 = 20°C = 20 + 273 = 293°K

V_1 = 2.5 lit.

P_1 = 70 cm

T_2 = 30°C = 30 + 273 = 303°K

P_2 = 85 cm

V_2 = ?

$$\frac{P_1V_1}{T_1} = \frac{P_2V_2}{T_2}$$

$$V_2 = \frac{P_1V_1T_2}{P_2T_1} = \frac{70 \times 2.5 \times 303}{85 \times 293} = \frac{53025}{24905}$$

$$V_2 = 2.12\ lit.$$

5) जर C_P आणि C_V चे गुणोत्तर 1.4 आणि त्यांच्यातील फरक 0.0808 आहे. तर C_P आणि C_V किती असेल?

उत्तर -:

$$\frac{C_P}{C_V} = 1.4 \quad \& \quad C_P - C_V = 0.0808$$

$$C_P = 1.4 \times C_V \qquad \text{------- (1)}$$

$$C_P - C_V = 0.0808$$

$$1.4C_V - C_V = 0.0808$$

$$0.4C_V = 0.0808$$

$$C_V = \frac{0.0808}{0.4} = 0.202\,unit$$

$$C_P = 1.4 \times 0.202 = 0.2828\,unit$$

6) जर काचेचा अपवर्तनांक 1.5 असेल तर प्रकाशकिरणाचा वेग काचेतून जातांना किती असेल?

उत्तर -:

$${}_a\mu_g = 1.5$$

$$v_a = 3 \times 10^8 \text{ m/s speed of light in air}$$

$$v_g = ?$$

$${}_a\mu_g = \frac{v_a}{v_g}$$

$$v_g = \frac{v_a}{{}_a\mu_g}$$

$$= \frac{3 \times 10^8}{1.5}$$

$$\mathbf{v_g = 2 \times 10^8\ m/s}$$

7) जर प्रकाशकिरणाचा वेग हिऱ्यातून जातांना 1.2×10^8 m/s असेल तर हिऱ्याचा अपवर्तनांक किती असेल?

उत्तर -:

$$v_d = 1.2 \times 10^8 \ m/s$$

$$v_a = 3 \times 10^8 \ m/s$$

$${}_a\mu_d = ?$$

$$v_g = \frac{v_a}{{}_a\mu_g} = \frac{3 \times 10^8}{1.2 \times 10^8}$$

$$\mathbf{{}_a\mu_d = 2.5}$$

8) पाण्यात प्रकाशकिरणाचा वेग 2.3 × 10^8m/s आहे. काचेत प्रकाशकिरणाचा वेग 2 × 10^8m/s आहे. a) पाण्याच्या माध्यमाच्या संदर्भात काचेच्या माध्यमाचा अपवर्तनांक किती?

b) काचेच्या माध्यमाच्या संदर्भात पाण्याच्या माध्यमाचा अपवर्तनांक किती?

उत्तर -:

$$v_w = 2.3 \times 10^8 \ m/s$$

$$v_g = 2 \times 10^8 \ m/s$$

$${}_w\mu_g = ? \ , \ {}_g\mu_w = ?$$

$$v_g = 2 \times 10^8 \ m/s$$

$${}_w\mu_g = ?, \ {}_g\mu_w = ?$$

$${}_w\mu_g = \frac{v_w}{v_g} = \frac{2.3 \times 10^8}{2 \times 10^8}$$

$${}_w\mu_g = 1.15$$

$${}_g\mu_w = \frac{v_g}{v_w} = \frac{2 \times 10^8}{2.3 \times 10^8}$$

$${}_g\mu_w = 0.87$$

9) सिलिकेट ग्लास ऑप्टिकल फायबरसाठी, कोरचे अपवर्तनांक 1.55 आणि क्लॅडिंगचे अपवर्तनांक 1.35 असल्यास निर्णायक कोन शोधा.

उत्तर -:

$$\mu_{core} = 1.55, \mu_{clad} = 1.35, \ c = ?$$

$$\theta_c = \sin^{-1} \frac{\mu_{clad}}{\mu_{core}}$$

$$= \sin^{-1} \left(\frac{1.35}{1.55}\right)$$

$$= \sin^{-1} (0.871)$$

$$= 60.57°$$

10) ठराविक ऑप्टिकल फायबरसाठी, कोरचे अपवर्तनांक 1.48 आणि क्लॅडिंगचे अपवर्तनांक 1.46 निर्णायक कोन शोधा.

उत्तर -:

$$\mu_{core} = 1.48, \ \mu_{clad} = 1.46, \ \theta_c = ?$$

$$\theta_c = \sin^{-1} \frac{\mu_{Clad}}{\mu_{core}}$$

$$\theta_c = \sin^{-1} (0.9864) = 80.57°$$

नमुना MCQ (Sample MCQ

1) ..... कारण आहे आणि ..... त्याचा परिणाम आहे.

अ) उष्णता, तापमान ब) तापमान, उष्णता क) वहन, संवहन ड) संवहन, वहन उत्तर (अ)

2) उष्णता वाहकतेच्या गुणांकाचे किमान मूल्य असलेला खालीलपैकी कोणता पदार्थ आहे?

अ) सिरॅमिक ब) अभ्रक क) ॲल्युमिनियम ड) प्लास्टिक उत्तर (क)

3) वायूच्या दिलेल्या वस्तुमानासाठी चार्लच्या नियमानुसार, खालीलपैकी ----------पॅरामीटर स्थिर राहतो.

अ) तापमान ब) घनफळ क) दाब ड) घनता उत्तर (क)

4) ऑप्टिकल फायबरमधून प्रकाशाचा मार्ग _____ आहे.

अ) सरळ ब) वक्र क) पेचदार ड) नागमोडी उत्तर (ड)

5) जेव्हा प्रकाश किरण हवेतून काचेच्या माध्यमात जातो,................

अ) तरंगलांबी वाढते ब) तरंगलांबी कमी होते क)तरंगलांबी स्थिर राहते ड) कोणतेही नाही उत्तर (ब)

Unit-4 : Chemical Bonding
युनिट .४ केमिकल बाँडिंग

तर्कसंगती :- (Rationale):-

रासानिक बंधाचा अभ्यास हा रासायनिक संयुगे तयार करण्यासाठी गरजेचा असतो. शास्त्रज्ञ, अभियंता, केमिस्ट, तंत्रज्ञ यांना रासायनिक बंधांचे ज्ञान असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मूलद्रव्यांच्या विविध भौतिक आणि रासायनिक गुणधर्मांचा अभ्यास हा तंत्रज्ञानाच्या अभियांत्रिकी उपयोगात अत्यंत महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ: धातु (METAL) धातूंचे मिश्रण (Alloy), पॉलीमर (POLYMER), एड्हेसीव्ह (ADHESIVES), वंगण.

"रासायनिक बंधांच्या प्रकारांवर आधारित रेणू आणि संयुगे यांच्या रचना, गुणधर्म आणि वर्तनाचा अंदाज लावा."

घटक निष्पती

4 अ भारतीय रसायनशास्त्र: - आचार्य कणाद यांचे अणूचे तत्त्वज्ञान.

4 ब व्हॅलेन्सीचा इलेक्ट्रॉनिक सिद्धांत: गृहीतके, रासायनिक बंध: इलेक्ट्रोव्हॅलेंट बाँड, सहसंयोजक बंध, समन्वय बंध, हायड्रोजन बाँड, धातूचे प्रकार आणि वैशिष्ट्ये

4 क घन, द्रव आणि वायूंमध्ये आण्विक व्यवस्था.

4 ड घन पदार्थांची रचना: स्फटिकासारखे आणि आकारहीन घन, धातू घनाचे गुणधर्म, युनिट सेल: साधे घन, बॉडी सेंटर क्यूबिक (BCC), फेस सेंटर क्यूबिक (FCC), षटकोनी बंद

महत्तव (Significance):-

मूलद्रव्यांच्या अणूंमध्ये, प्रोटॉन, न्यूट्रॉन आणि इलेक्ट्रॉन हे कण असतात. मूलद्रव्यांच्या अणूंच्या बाहयतम कक्षेतील इलेक्ट्रॉन रासायनिक बंधामध्ये भाग घेतात. रासायनिक बंध हे अणू, आयन किंवा रेणूमध्ये होतो व त्यामुळे रासायनिक संयुगे बनतात.

भारतीय रसायनशास्त्र: महर्षी कणाद यांचे अणूचे तत्वज्ञान.

अणु सिध्दांत 2500 वर्षांपूर्वी डाल्टनच्या आधी तयार केला गेला होता जो एका भारतीय ऋषी आणि तत्ववेत्याने दिला होता. अणुसिध्दांत देणारे भारतीय ऋषी आचार्य कणाद होते. त्यांचे खरे नाव कष्यप् होते असे म्हणतात की आचार्य कणाद यांचा जन्म इ.स.पूर्व 600 मध्ये गुजरातमधील व्दारकेजवळ असलेल्या प्रभास क्षेत्रात झाला होता.

महर्षि कनादांनी असे प्रतिपादन केले आहे की जर आपण विभाजक पदार्थावर गेलो तर आपल्याला पदार्थांचे लहान आणि लहान कण प्राप्त होतील. जर आपण पदार्थाचे विभाजन करत राहिलो तर शेवटी एक टप्पा येईल जेव्हा आपण पदार्थाच्या सर्वात लहान कणास भेटू शकातो ज्याला अधिक विभाजित करता येणार नाही.

महर्षि कनादांनी असे सुचवले की सर्व पदार्थ अतिशय लहान कणांनी बनलेले आहेत. त्या कणांसाठी त्याला 'परमानु' देण्यात आले.

अणू हा शब्द प्राचीन ग्रीक विशेषण atomos वरून आला आहे, ज्याचा अर्थ ''अविभाज्य'' आहे.

वैषेशिक दर्शन (ज्याला कन्नड सूत्र देखील म्हटले जाते) नावाच्या कानदाच्या पुस्तकाने त्यांचा अणु सिध्दांत कॅप्चर केला ज्यामध्ये पुढील गोष्टी सांगितल्या आहेत. सर्व काही विभाजित केले जाऊ शकते.

उपविभागामुळे काही काळानंतर परमानु (अणू) निर्माण होतो. परमानु हा अविभाज्य आहे. म्हणजेच तो पुढे विभागला जाऊ शकत नाही.

Atom (अणू)

''अणू हा एखादया वस्तूचा **/** पदार्थाचा सर्वात लहान कण असतो ज्याला आणखी विभागता येत नाही**.**''

अणूची आधुनिक अणु रचना**:-** मुख्य दोन भाग

अ**)** न्यूक्लियस **-** मध्य भाग (केंद्रक)

ब**)** एक्स्ट्रा-न्यूक्लियर पार्ट **–** हॅलो भाग

Atomicity / (परमाणू): -

1) मोनो ऍटोमिक	2) डाय ऍटोमिक	3) ट्राय ऍटोमिक
(रेणूमध्ये फक्त एक अणू)	(रेणूमध्ये दोन अणू)	(रेणूमध्ये तीन अणू)
उदा. He, Ne, Ar	उदा. O_2, N_2	उदा**.** H_2O, CO_2

Stable / Noble - स्थिर उदात्त जड घटक-

1 शेवटच्या कक्षेत पूर्ण ऑक्टेट स्थिती असलेल्या घटकांना स्थिर घटक /नोबल/ जड घटक / निष्क्रिय म्हणतात ते इतर घटकांसह प्रतिक्रिया देत नाहीत

2 शून्य गट घटक (Zero group element)

3 इलेकट्रॉनचा loss / gain / share (वाटणी**)** करण्याची गरज नाही

4 व्हॅलेंसी (संयुजा)-00

घटक	प्रतीक	इलेक्ट्रॉनिक कॉन्फीगुरेशन
Helium	$_{2}He$	2
Neon	$_{10}Ne$	2, 8,
Argon	$_{18}Ar$	2, 8, 8

4-1 सयुंजेचा इलेक्ट्रॉनिक्स सिध्दांत (Electronic Theory of Valency): -

Kossel आणि Lewis शास्त्रज्ञांनी1996 मध्ये हा सिध्दांत शोधला व Langmuri यांनी 1919 मध्ये उपयोगात आणला.

या सिध्दांतानुसार प्रत्येक मुलद्रव्याची इलेक्ट्रॉन्स्ची स्थिर इलेक्ट्रॉन्स् अणू संरचना मिळवण्याची क्षमता असते. सिध्दांत खालील मुदयावर अवलंबून आहे.

1.कुठल्याही मूलद्रव्यांची संयुजा ही त्या मूलद्रव्यांच्या बाहयतम कक्षेत असणा-या इलेक्ट्रॉन्सच्या संख्येवर अवलंबून असते. बाहयतम कक्षेत असणा-या इलेक्ट्रॉन्स्च्या संख्येला संयुजा इलेक्ट्रॉन्स् म्हणतात. अस्थिर अणू अष्टक पूर्ण करण्यासाठी आणि स्थिर होण्यासाठी म्हणजेच निष्क्रियवायू सारखी इलेक्ट्रॉन्स् संरचना मिळण्यासाठी इलेक्ट्रॉन्स् ची देवाण-घेवाण किंवा भागीदारी करतात. देवाण-घेवाण किंवा भागीदारी केलेल्या इलेक्ट्रॉन्स्च्या संख्येलाच संयुजा असे म्हणतात.

2.ज्या मूलद्रव्यांच्या बाहयतम कक्षेत आठ इलेक्ट्रॉन्स् असतात ती मूलद्रव्य रासायनिक दृश्ट्या स्थिर असतात**,** अशा मूलद्रव्यांना निष्क्रिय वायू म्हणतात**.** परंतु हेलियम**,** हया निष्क्रियवायू मध्ये दोन इलेक्ट्रॉन्स् असतात**.** निष्क्रियवायू कुठल्याही रासायनिक अभिक्रियेत भाग घेत नाही**.**

3.ज्या मूलद्रव्यांच्या बाहयतम कक्षेत आठ पेक्षा कमी इलेक्ट्रॉन्स् असतात असे मूलद्रव्य रासायनिक दृश्ट्या अस्थिर असतात आणि म्हणूनच रासायनिक अभिक्रियेत भाग घेतात**.** परंतु हायड्रोजनच्या पहिल्या कक्षेत एक इलेक्ट्रॉन्स् असतो**.**

4.प्रत्येक मूलद्रव्यांचे अणू स्थिर होण्यासाठी म्हणजेच निष्क्रियवायू ची इलेक्ट्रॉन्स् संरचना प्राप्त करण्यासाठी रासायनिक बंध बनवतात **/** निर्माण करतात**.**

'रासायनिक बंध म्हणजेच दोन किंवा अधिक अणू मधील रासायनिक बल'**.**

4.1.1 संयुजा (Valency)

अष्टक किंवा द्वितिक स्थिति पूर्ण करण्यासाठी मूलद्रव्याच्या अणूने देवाण-घेवाण किंवा भागीदारी केलेल्या इलेक्ट्रॉन्स्च्या संख्येलाच संयुजा म्हणतात

संयुजाचे प्रकार (Types of Valency)

1 **विदयुत संयुजा:** रासायनिक बंध तयार होताना देवाण-घेवाण झालेल्या इलेक्ट्रॉन्स्ची संख्या म्हणजेच विदयुत संयुजा

2 **सहसंयुजा:** रासायनिक बंध तयार होताना भागीदारी झालेल्या इलेक्ट्रॉन्स्ची संख्या म्हणजेच सहसंयुजा

1 विदयुत संयुजा

रासायनिक बंध तयार होताना देवाण-घेवाण झालेल्या इलेक्ट्रॉन्स्ची संख्या म्हणजेच विदयुत संयुजा. ज्या मूलद्रव्यांचे अणू इलेक्ट्रॉन्स् देऊन धन आयन तयार करतात त्यांना धन विदयुत संयुजा (Positive Electrovalency) असते तर जे मूलद्रव्य इलेक्ट्रॉन्स् घेऊन ऋण आयन तयार करतात त्यांना ऋण विदयुत संयुजा (Negative Electrovalency)असते

विदयुत संयुजा चे प्रकार (Types of Electrovalency)

अ धन विदयुत संयुजा (Positive Electrovalency) अष्टक पूर्ण करण्यासाठी धातु मूलद्रव्याचा अणूने गमावलेल्या दिलेल्या इलेक्ट्रॉन्स्ची संख्या म्हणजेच धन विदयुत संयुजा (Positive Electrovalency).

उदाहरणे

Table 4.1

अ.क्र	मूलद्रव्य	संज्ञा	अणूक्रमांक	इलेक्ट्रॉन्स् संरचना	(Positive Electrovalency)
1	Sodium	Na	11	2, 8, 1	+ 1
2	Maganesium	Mg	12	2, 8, 2	+ 2
3	Aluminium	Al	13	2, 8, 3	+ 3

Table 4.2

अ.क्र	मूलद्रव्य	संज्ञा	अणूक्रमांक	इलेक्ट्रॉन्स् संरचना	(Negative Electrovalency)
1	Nitrogen	N	7	2, 5	- 3
2	Oxygen	O	8	2, 6	- 2
3	Fluorine	F	9	2, 7	- 1

4.2 रासायनिक बंधाचे प्रकार: -

रासायनिक बंधाचे खालील प्रकार अभ्यासू:

1. आयनिक बंध (Ionic bond)
2. सहसंयुज बंध (Covalent bond)
3. समन्वय बंध (Coordinate bond)
4. धात्विय बंध (Metallic bond)
5. हायड्रोजन बंध (Hydrogen bond)

आयनिक बंध **(Ionic bond):-**

दोन अणू मधील विदयुत ऋणता फरक जेव्हा मोठा असतो त्यावेळी ते अणू अष्टक पूर्ण करण्यासाठी आपल्याकडील बाहयतम कक्षेतील इलेक्ट्रॉन्स्ची देवाण-घेवाण करून एकमेकांशी ज्या आकर्षण बलाने बांधले जातात त्याला आयनिक बंध किंवा विदयुत संयुजा बंध (Electrovalent/ionic bond) म्हणतात.धातु मूलद्रव्याचा अणू अष्टक पूर्ण करण्यासाठी शे वटच्या कक्षेतील इलेक्ट्रॉन्स् गमावतो म्हणजे देऊन टाकतो व जवळच्या निष्क्रियवायु प्रमाणे स्थिर होतो त्याला विदयुत धन अणू म्हणतात.अधातु मूलद्रव्याचा अणू अष्टक पूर्ण

करण्यासाठी धातु मूलद्रव्याच्या अणूकडून इलेक्ट्रॉन्स् घेतो व जवळच्या निष्क्रियवायु प्रमाणे स्थिर होतो त्याला विदयुत ऋण अणू म्हणतात.धन आयन व ऋण आयन त्यांच्यातील विदयुत स्थितिक आकर्षणामुळे एकत्र येऊन तयार होणा-या रासायनिक बंधांला आयनिक बंध म्हणतात.

आयनिक बंध निर्मिती ची उदाहरणे

(Formation of Sodium Chloride (NaCl) Molecule) :-

सोडियम चा अणूक्रमांक 11 असल्याने त्याची इलेक्ट्रॉन्स् संरचना (2 8 1) आहे व क्लोरीनचा अणूक्रमांक 17 असल्याने ची इलेक्ट्रॉन्स् संरचना (2 8 7) आहे. सोडियम अणूच्या बाहयतम कक्षेत एक इलेक्ट्रॉन्स् असल्याने तो देऊन टाकण्याची सोडियमची प्रवृत्ती असते. क्लोरीनच्या बाहयतम कक्षेत सात इलेक्ट्रॉन्स् असल्याने त्याची एक इलेक्ट्रॉन्स् इलेक्ट्रॉन्स् मिळवून घेऊन स्थिर होण्याची प्रवृत्ती असते. सहाजिकच सोडियम त्याच्या बाहयतम कक्षेतील एक इलेक्ट्रॉन्स् क्लोरीन ला देऊन जवळच्या निष्क्रियवायू ची Neon (2, 8) इलेक्ट्रॉन्स् अणूसंरचना मिळवतो व क्लोरिन ने एक इलेक्ट्रॉन्स् घेतल्यामुळे त्याला जवळच्या निष्क्रियवायू Argon (2, 8, 7) ची इलेक्ट्रॉन्स् अणू संरचना मिळते.

इलेक्ट्रॉन्स् दिल्याने सोडियम अणूचा Na^+ हा आयन तर क्लोरीनचा एक इलेक्ट्रॉन्स् घेण्याने Cl^- आयन तयार होतो. दोन्ही विजातीय परस्परविरोधी प्रभारित आयनांमध्ये विदयुतस्थीतीक आकर्षण बल असल्यामुळे हे परस्पर विरूध्द प्रभारी आयन एकमेकांकडे आकर्षिले जातात व त्यांच्यात तयार होणा-या रासायनिक बंधांला आयनिक बंध म्हणतात

एक किंवा अधिक आयनिक बंधांमुळे तयार होणा-या संयुगाला आयनिक संयुगे म्हणतात.

सोडियम क्लोराईड या आयनिक संयुगाची निर्मिती इलेक्ट्रॉन संरूपणाच्या खालील प्रमाणे रेखाटन करता येईल



सोडियम क्लोराइड ची निर्मिती

मॅग्नेशियम ऑक्सईड ची निर्मिती (**Formation of Magnesium Oxide (MgO) Molecule**) **:-**

मॅग्नेशियम चा अणूक्रमांक 12 असल्याने त्याची इलेक्ट्रॉन संरचना (2 8 2) आहे तर ऑक्सिजन अणूची इलेक्ट्रॉन अणू संरचना (2 6) आहे. मॅग्नेशियम अणूच्या संयुजा कवचात (Valence shell) दोन इलेक्ट्रॉन असल्याने ते दोन इलेक्ट्रॉन्स् तो ऑक्सिजन ला देऊन मॅग्नेशियम जवळच्या निष्क्रियवायू Neon (2, 8) अणूची

संरचना मिळवितो ऑक्सिजन ने दोन इलेक्ट्रॉन घेतल्याने ऑक्सिजन जवळच्या Neon (2,8) ची अणू संरचना मिळवितो.

मॅग्नेशियम ने दोन इलेक्ट्रॉन्स् दिल्याने मॅग्नेशियम अणूचा Mg^{2+} आयन तयार होतो तर ऑक्सिजन ने दोन इलेक्ट्रॉन घेतल्याने ऑक्सिजन चा O^{2-} आयन तयार होतो अशा Mg^{2+}व व् O^{2-} परस्परविरोधी प्रभारित आयन मध्ये असणा-या स्थीतीक विदयुत आकर्षण बलाला आयनिक बंध म्हणतात.



मॅग्नेशियम ऑक्सईड ची निर्मिती

आयनिक संयुगांचे गुणधर्म

1. या संयुगांमध्ये आयनिक बंध असतो त्यांना आयनिक किंवा विदयुत संयुज संयुगे म्हणतात ते कठीण स्फटीकी घनपदार्थ असतात.
2. हे पदार्थ पाण्यासारख्या ध्रुवीय द्रावकामध्ये विरघळतात तर सारख्या कार्बनी द्रावकामध्ये विरघळत नाही
3. हया पदार्थांचा द्रवणांक (Melting Point) व उत्कलनांक (Boiling Point) जास्त असतो.
4. घनस्थित (in solid state) हे पदार्थ विदयुत दुर्वाहक (bad conductor of electricity) व असतात. परंतु वितळल्यानंतर किंवा पाण्यात विरघळल्यानंतर हे पदार्थ विदयुत सुवाहक (good conductor of electricity) होतात कारण त्यांच्यातील आयन्स् मुक्त संचार करू शकतात.

4.2.2 सहसंयुज बंध (Covalent band)

दोन सारख्या किंवा वेगवेगळया अणूंमध्ये जेंव्हा इलेक्ट्रॉन्स् ची भागीदारी होऊन रासायनिक बंध तयार होतो त्या बंधाला सहसंयुज (Covalent band) बंध म्हणतात.

सहसंयुज बंधाचे प्रकार-

अ) एकेरी सहसंयुज बंध (Single Covalent band) दोन अणू जेव्हा इलेक्ट्रॉन्स् च्या एकाच जोडीची भागीदारी करतात तेव्हा त्या होणाऱ्या रासायनिक बंधाला एकेरी सहसंयुज बंध म्हणतात

उदा- क्लोरीन रेणूची निर्मिती (Formation of chlorine molecule)

1) 1 क्लोरिनच्या रेणू मध्ये क्लोरिन चे दोन अणू असतात.
2) 2 क्लोरिनच्या अणूचा अणूक्रमांक 17 असल्याने त्याची इलेक्ट्रॉन संरचना (Electronic configuration)

(2, 8, 7) आहे जवळच्या निष्क्रियवायू ची अणू संरचना प्राप्त करण्यासाठी त्याला एक इलेक्ट्रॉन्स् कमी पडतो.

3) क्लोरीन रेणूची निर्मिती होताना क्लोरीन चे दोन अणू एक-एक इलेक्ट्रॉन भागीदारी (Share) करून एकेरी सहसंयुज बंध तयार करतो



NH_3, H_2, H_2O

ब) दुहेरी सहसंयुज बंध (Double Covalent band) दोन समान किंवा वेगळया मुलद्रव्याचे अणू इलेक्ट्रॉनच्या दोन जोड्यांची भागीदारी करतात तेव्हा तयार होणा-या रासायनिक बंधाला दुहेरी सहसंयुज बंध म्हणतात.

उदा. ऑक्सिजन रेणूची निर्मिती (Formation of oxygen molecule) :

1 ऑक्सिजन च्या रेणूमध्ये ऑक्सिजन चे दोन अणू असतात

2 ऑक्सिजन चा अणू क्रमांक 8 असल्याने त्याची अणू संरचना (2, 6) असते जवळच्या निष्क्रियवायू Neon ची अणू संरचना प्राप्त करण्यासाठी दोन इलेक्ट्रॉनची कमतरता पडते



3 त्यामुळे ऑक्सिजन रेणू ची निर्मिती होताना ऑक्सिजन चे अणू दोन दोन इलेक्ट्रॉन ची भागीदारी करून दुहेरी सहसंयुज बंध बनवतात.

गृहपाठ-वरील प्रमाणे CO_2, C_2H_4 रेणूची निर्मिती दाखवा

क) **तिहेरी सहसंयुज बंध** दोन समान किंवा वेगळया मुलद्रव्यांचे अणू, इलेक्ट्रॉनच्या तीन जोडयांची भागीदारी करतात. तेव्हा तयार होणा-या सहसंयुज बंधाला तिहेरी सहसंयुज बंध म्हणतात.

उदा. नायट्रोजन रेणूची निर्मिती (Formation of Nitrogen molecule)

1) नायट्रोजनच्या रेणू मध्ये नायट्रोजनचे दोन अणू असतात.
2) नायट्रोजन चा अणू क्रमांक 7 असल्याने त्याची अणू संरचना (2,5) असते. जवळच्या निष्क्रियवायू (Neon) प्रमाणे अणू संरचना मिळवण्यासाठी त्याला तीन इलेक्ट्रॉन ची कमतरता पडते.
3) त्यामुळे नायट्रोजन रेणू ची निर्मिती होताना नायट्रोजनचे दोन अणू तीन-तीन इलेक्ट्रॉनची भागीदारी करून तिहेरी सहसंयुज बंध बनवतात, किंवा तयार होतो.



नायट्रोजन रेणू मध्ये दोन (2) एकल म्हणजे अबध्द जोडी असते तर तीन (3) बध्द इलेक्ट्रॉन जोडया असतात (Bond pairs of electrons) i.e. Three bond pair of electrons and two lone pair of electrons. सहसंयुज बंधाचे त्यांच्या ध्रुवीय गुणधर्मा नुसार दोन प्रकार पडतात.

अ)अध्रुवीय सहसंयुज बंध (Non-Polar covalent bonds) जेव्हा सहसंयुज बंध निर्माण करणारे दोनही अणूंची इलेक्ट्रॉन स्वतःकडे खेचण्याची क्षमता (Electronegativity) सारखीच असते तेव्हा भागीदारीतील इलेक्ट्रॉनची जोडी / जोडया दोन अणूंच्या केंद्रकांच्या बरोबर मध्यभागी असतात थोडक्यात सहसंयुज बंधातील इलेक्ट्रॉनचा समुच्यय (electrons cloud) दोन्ही अणूंभोवती सारख्या प्रमाणात वितरीत असतो (equally shared).

उदा H_2, Cl_2, N_2, O_2

ब)ध्रुवीय सहसंयुज बंध (Polar covalent bonds) सहसंयुज बंध जेव्हा दोन वेगवेगळया विदयुत ऋणतेच्या वेगळया दोन अणूमध्ये होतो तेव्हा भागीदारी झालेल्या इलेक्ट्रॉनची जोडी केंद्रकाच्या बरोबर मध्यभागी नसते तर जास्त विदयुत ऋणता असलेला अणू इलेक्ट्रॉन स्वतःकडे खेचतो. त्यामुळे भागीदारातील इलेक्ट्रॉन ची जोडी त्या अणूकडे सरकते व होणारा इलेक्ट्रॉन्सचा समुच्यय (Electrons cloud) दोन अणुभोवती सारखा वितरीत होत नाही. तो विचतील होतो हा समुच्यय / ढग जास्त विदयुत ऋणतेच्या अणूभोवती दाट असतो. (Not equally shared) जास्त विदयुत ऋणता असलेला अणू आंषिक ऋण भारीत

असतो व $'-\delta'$ दाखवतात. कमी विदयुत ऋणता असलेला अणूआंषिक धनप्रभारीत होतो व $'+\delta'$ 'दाखवतात

उदा. HCl, H_2O, NH_3

सहसंयुज बंध दोन अणूमध्ये रेषेने '-----' दाखवतात.

सहसंयुज बंध असलेल्या संयुगांचे गुणधर्म:-

1) हया पदार्थाचा द्रावणांक (Melting Point) व उत्कलन बिंदु (boiling Point) कमी असतो.
2) हे पदार्थ उष्णता व विद्‌युत दुर्वाहक (bad conductor of heat and electricity) असतात.
3) हे पदार्थ ध्रुवीय द्रावकामध्ये विरघळत नाही तर कार्बनी द्रावकामध्ये विरघळतात. उदा. Benzene, carbon tetra chloride इत्यादी द्रावकामध्ये विरघळतात.
4) हे पदार्थ मृदू, वितळणशिल आणि अस्थिर (Volatile)असतात.
5) हे जास्त करून द्रव व वायुरूप अवस्थेत असतात.

4.2.3 समन्वय बंध: Co-ordinate bond / dative bond:

हा बंध सहसंयुज बंधाप्रमाणेच आहे. हा असा सहसंयुज बंध आहे की ज्यामध्ये भागीदारी झालेली दोनही इलेक्ट्रॉनस एकाच अणू मधून येतात. तो अणू असा असतो की ज्या मध्ये कमीत कमी एक तरी अबदध जोडी असते म्हणजे lone pair of electrons असतात.
साध्या सहसंयुज बंधामध्ये प्रत्येक अणू रासायनिक बंधासाठी एक-एक इलेक्ट्रॉन पुरवतो. तसे इथे होत नाही. ज्या अणूने भागीदारी करण्यासाठी इलेक्ट्रॉनस ची जोडी दिलेली असते त्याला दाता अणू ; (Donar atom) म्हणतात आणि ज्या दुस-या अणूने इ इलेक्ट्रॉनसचे अष्टक पुर्ण करण्यासाठी जोडी स्विकारली आहे त्याला स्विकारणारा अणू (Accepter atom) म्हणतात.
समन्वय बंध →अशा बाणाने निर्देषित केला जातो, म्हणजेच दाखवला जातो. हया बाणाचे टोक स्विकारणा-या अणू कडे असते.

उदा. NH_4^+ आयनची निर्मिती (Formation of ammonium ion) अमोनियम आयन हा अमोनिया व हायड्रोजन आयन (H^+) मुळे होतो.



अमोनियाच्या रेणू मध्ये नायट्रोजन अणू प्रत्येकी तीन हायड्रोजन अणूंशी सहसंयूज बंधाने जोडलेला असतो तरीही नायट्रोजनकडे इलेक्ट्रॉनसची एक जोडी सहसंयुज बंधात नसते तीला अबद्ध जोडी (Lone pair of electron) म्हणतात. ही जोडी नायट्रोजनचा अणू हायड्रोजन आयन बंध भागीदारीसाठी देतो व अशा प्रकारे $N \rightarrow H$ समन्वय बंध अमोनिअम आयन मध्ये तयार होतो.

समन्वय बंध असणा-या संयुगाचे गुणधर्म:

1) हया पदार्थांचा द्रावणांक व उत्कल बिंदू हे आयनिक संयोगा पेक्षा कमी असतो तर सहसंयुज बंधापेक्षा जास्त असतो.
2) हा बंध असलेले संयुगे दिशात्मक (Directional) असतात.
3) ही संयुगे अल्पप्रमाणात विद्राव्य / विरघळतात असतात.
4) शक्यतो सर्व समन्वयक बंध असणारे संयुगे कार्बनी द्रावकामध्ये विरघळतात.

4.2.4 हायड्रोजन बंध (Hydrogen bond):

नायट्रोजन, ऑक्सिजन आणि फल्युओरिन ही उच्च विद्युत ऋणता असलेली मुलद्रव्ये आहेत. ही मुलद्रव्ये जेव्हा हायड्रोजन अणूषी जोडली जातात आणि सहसंयुज बंध निर्माण होतो तेव्हा सहसंयुज बंधाचे इलेक्ट्रॉन जास्त असलेल्या विद्युत ऋण अणूकडे खेचले जातात व त्या अंषिक धन प्रभारित हायड्रोजन अणू (H+ ·) इतर जास्त विद्युत ऋण प्रभार असलेल्या दुस-या रेणूमधील अणूषी बंध तयार करतो त्याला हायड्रोजन बंध म्हणतात.हा सहसंयुज बंधापेक्षा दुर्बल असतो. हा बंध '..........' अशा रेशेने दर्शवितात हायड्रोजन बंध दोन अणूमधील सेतुबंध म्हणून काम करतो.

व्याख्या:एका रेणूचा H अणू दुस-या रेणूच्या विद्युत ऋण (N, O, F) ज्या आकर्षण बलाने बांधला जातो त्याला हायड्रोजन बंध म्हणतात

हायड्रोजन बंधाचे प्रकार:-

1) आंतररेणू हायड्रोजन बंध (रेणू दरम्यान) : Inter-molecular H-bonding एकाच किंवा वेगवेगळया संयुगातील दोन वेगवेगळया संयुगातील दोन वेगवेगळया रेणू दरम्यान हा बंध तयार होतो.

उदा. पाण्यातील आंतर रेणू हायड्रोजन बंध



H- बंधामुळे पाण्याचा उत्कलन बिंदू (boling point) वाढतो.

उदा. हायड्रोजन बंध: फ्लोराईड मधील आंतर रेणू 'हायड्रोजन बंध'



2) अंतः रेणू हायड्रोजन बंध (रेणूच्या अंतर्भागात) एकाच रेणू मधील दोन तिव्र विद्युत ऋण अणूमध्ये असलेल्या हायड्रोजन अणूशी हा बंध तयार होतो.

उदा. Ortho nitro phenol मधील अंतःरेणू हायड्रोजन बंध



हायड्रोजन बंध असलेल्या संयुगाचे गुणधर्म:-

1) रेणू दरम्यान असलेल्या बंधापैकी एक मजबूत आहे परंतु आयनिक किंवा सहसंयुज बंधापेक्षा दुर्बल असतात.

2) आंरतरेणू Hydrogan बंधामुळे द्रावणांक, वितलन बिंदू (Melting point) द्रावनियता (solubility), पृष्ठीय ताण (Surface tension) इत्यादी गोष्टी वाढतात. तर आंतररेणू बंध विरूध्द परिणाम दाखवतात.

4.2.5 धात्वीय बंध: (MetallicBond)



धातूच्या स्पटिका मध्ये, धातुंचे अणू जेव्हा शेवटच्या कक्षेतील इलेक्ट्रॉन सोडतात तेव्हा धातूंचे धन प्रभारित आयन (kernel) तयार होतात आणि इलेक्ट्रॉन चा सागर electron sea तयार होतो. धातूंचे धन प्रभारित आयन म्हणजे स्थिर राहतात. स्थान सोडलेले भ्रष्ट इलेक्ट्रॉन (Delocalized electrons) फिरत (Mobile)असतात. स्थान भ्रश्ट इलेक्ट्रॉन (Delocalized electrons) आणि धन प्रभारित धातूचे आयन (kernel) यांच्यातील विदयुत आकर्षण बला म्हणतात धात्वीय बंध म्हणतात.

धात्वीय बंधांची ताकद ही धातुच्या शेवटच्या कक्षेत असलेल्या इलेक्ट्रॉन च्या संख्येनुसार वाढते तसेच धातूच्या अणुची साईज तेवढी त्याची ताकद जास्त असते.

धातूंचे गुणधर्म

1 धातूंना चमक (luster) असते.
2 धातूंना विदयुत वाहकता (Electrical conductivity) आणि औश्णिक वाहकता (Thermal conductivity) असते.
3 धातूंना वर्धनीयता (Thermal conductivity) व तन्यता (ductility) असते.
4 धातूंना ताणशक्ती (tensile strength) असते व कठिणता (hardness) असते.
5 धातूंना लवचिकता (elasticity) असते.

4.3घन, द्रव व वायू पदार्थाचे रेण्वीय व्यवस्थापन (Molecular arrangement of Solid, Liquid and Gas) :

अ) **घनपदार्थाचे रेण्विक व्यवस्थापन व संरचना:-**



घन पदार्थाचे घटक कण घट्ट पॅक केलेले असतात. त्यांच्यातील जागा (Intermolecular spaces कमी असतात .त्यांच्यातील आकर्षण (Intermolecular forces) मजबूत असतात. त्यामुळे त्याची मुक्त हालचाल शक्य होत नाही. त्यामुळे धनपदार्थ त्यांचा आकार टिकवून ठेवतात धनपदार्थ ताठर (rigid) असतात.

उदा. धातू

ब) द्रव पदार्थाचे रेण्विय व्यवस्थापन व संरचना

द्रव पदार्थाचे घटक कण सैल पॅक केलेले असतात. द्रव पदार्थाच्या मोठया प्रमाणात रेणूंच्या जागा मोकळया असतात रेणूमधील आकर्षण बले धनपदार्था पेक्षा कमी असते त्यामुळेच रेणूना गती शक्य होते. द्रवपदार्थ दृढ नसतो व त्यांना स्वतःचा आकार नसतो. ज्या आकारच्या भांडयात टाकले त्या भांडयाचा आकार घेतात.

उदा.पाणी

क) वायूपदार्थातील रेण्विय व्यवस्थापन व संरचना

वायू पदार्थातील रेणूंमध्ये आकर्षण बल कमीत कमी असते रेणूंना गतीचे जास्तीत जास्त स्वातंत्र्य असते. म्हणून वायूंना निश्चित आकार नसतो.

उदा. हवा

4.4 घनपदार्थ

हा घनपदार्थ हे कठोर असतात त्यांना निश्चित आकार असतो व त्याचे घटक कण व्यवस्थित पुनरावृत्तीच्या रीतीने तर कधी कधी अनियमितरित्या सुध्दा घट्ट पणे पॅक केले जातात हे घटककण अणू, आयन, रेणूंनी बनलेले असतात हे घटक कण एक निश्चित स्थानी असतात व ते जागा बदलू शकत नाही ते फक्त त्यांच्या जागी Vibrate किंवा Oscilate होतात.

घनपदार्थाचे मुख्य दोन प्रकार पडतात.

4.4.1 स्फटिकी घनपदार्थ (Crystalline Solid) :

हया प्रकारच्या घनपदार्थामध्ये, घटक कण - अणू, आयन किंवा रेणू (atom, ion, molecule) एका विशिष्ट आवर्ती आकृतीबंधात रचलेले असतात. हया घटक कणाची संरचना व्यवस्थित आणि शिस्तबध्द (orderly and regular arrangement) असते आणि ती तीनही दिषांना पुनरावर्तीत होऊन स्फटिकी घनपदार्थ निर्माण होतो. उदा.मीठ, साखर, हिरा, ग्राफाईट, सल्फर इ.

स्फटिकी घनपदार्थांचे गुणधर्म

1.स्फटिकी घनपदार्थाचे घटक कणाची संरचना व्यवस्थित व शिस्तबध्द (Regular) असते.

2. स्फटिकी घनपदार्थ, एकक कोष (unit cell) नावाच्या अनेक सूक्ष्म स्फटिकांचा समूह असतो.

3.हे घनपदार्थाचे long range order हे वैषिश्टये आहे.

4.शुध्द स्फटिकी घनपदार्थांना निश्चित द्रवणांक (melting point) असतो.

5.स्फटिकी घनपदार्थाचे अपवर्तनांक (Refarative Index), विदयुत प्रवहन (Electrical conductivity)), पराविदयुतांक (Dielectric emstant) असे काही गुणधर्म हे दिशा बदलल्याने बदलतात. दिशात मापन केल्यास भौतिक गुणधर्मांची निरनिराळी मुल्ये दाखविण्याच्या क्षमतेला स्फटिकी घनपदार्थांची विशम दैषिकता (anisotropy) म्हणतात.

6.धारधार चाकूने जर आपण स्फटिकी घनपदार्थ कापला तर त्याचा तुकडा योग्य दिशे ला कापला जातो. (Perfectly Cleaved)

4.4.2 अस्फटिकी घनपदार्थ (Amorphous Solid)

ज्या पदार्थांचे कण शीस्तबध्द संरचनेत नसूनही ते घन पदार्थासारखे दिसतात. त्यांना अस्फटिकी घनपदार्थ म्हणतात.

उदा.डांबर, काच, प्लॅस्टिक (Plastic), रबर, लोणी, कोळसा, स्टार्च, प्रोटिन इ.

अस्फटिकी घनपदार्थाचे गुणधर्म :

1. हया घनपदार्थांची आंतरिक संरचना शीस्तबध्द नसते.
2. त्यांना long range order नसते म्हणजेच short range order असते. याचा अर्थ थोडयाच अंतरावर त्याची संरचना शीस्तबध्द असते परत नियमित व आवर्ती आकृतीबंध नसतात. घटक कणांची संरचना कमी पल्ल्यापर्यंतच असते. घटक कणांची संरचना कमी पल्ल्या पर्यंतच असते.
3. त्यांना सुस्पष्ट द्रवणांक नसतो. तापमानाच्या एका टप्प्यावर ते isotropic विरघळतात.
4. हया पदार्थाचे भौतिक गुणधर्मात दिशेनुसार बदल होत नाही. याचा अर्थ ते असतात.
5. धारधार चाकूने जर अस्फटिकी पदार्थ कापला तर त्याचा तुकडा कशाही प्रकारे तुटतो.

4.4.1 स्फटिकी घनपदार्थाचे वर्गीकरण: (Classification of crystalline solid):

घन स्फटिकाच्या स्थायित्वाला जबाबदार असणा-या आकर्षण बलामुळे त्याचे वर्गीकरण करता येते.

1) रेण्वीय घनपदार्थ Molecular solid
2) आयनिकघनपदार्थ (Ionic Solid)
3) सहसंयुज घनपदार्थ (Covalent solid)
4) धात्वीय घनपदार्थ (Metallic solid)

1) रेण्वीय घनपदार्थ (Molecular solid) :

रेण्वीय घनपदार्थातील घटक कण त्याच संयुगाच्या रेणूंनी बनलेले असतात. स्फटिक निर्मितीत समाविष्ट रेणू व शेजारच्या रेणूंमधील आकर्षण बलानुसार त्यांचे 3 उपविभाग आहेत

अ) ध्रुवीय रेण्वीय घनपदार्थ (Polar molecular solid)

सहसंयुज बंध (Covalent bonding) असलेले HCl, SO_2, NH_3 असे पदार्थ तापमान व दाबाच्या सामान्य स्थितीत वायू रूप् असतात त्यांचे शीतन / थंड करून त्यांच्यावर उच्च दाब प्रयुक्त केल्यास त्यांचे द्रवीकरण व नंतर घनीकरण करता येते.ध्रुवीय रेण्वीय घनपदार्थातील, रेणू, व्दिध्रुव बंधाव्दारे (Dipole-dipole forces) एकत्र ठेवले जातात. हे घनपदार्थ मृदू असून विदयुत वाहक नसतात. बंध मजबूत नसल्याने त्याचा द्रवणांक (Melting Point) कमी असतो.

ब) अध्रुवीय रेण्वीय घनपदार्थ : (Non-Polar molecular solid)

सहसंयुज बंध असलेले CO_2, H_2, Cl_2, CH_4 रेणू कमी तापमानावर अध्रुवीय घनपदार्थ निर्माण करतात तर I_2 (Iodine/ आयोडीने) सामान्य तापमानावर घन असतो. हे घनपदार्थ मृदू असून विदयुतवाहक नसतात. यांचा द्रवणांक ध्रुवीय रेण्वीय घनपदार्थापेक्षा कमी असून ते लंडन बले किंवा सौम्य अपस्करण (Dispersion forces or London forces) बलाव्दारे एकत्र असतात.

क) हायड्रोजन बंधयुक्त घनपदार्थ (Hydrogen Bonded solid)

हायड्रोजन अणू आणि ऑक्सिजन (O) / नायट्रोजन (N) / फ्लोरिन (F) सारखे तीव्र ऋणप्रभारीत अणू यांच्यात सहसंयुज बंध असला तर हायड्रोजन वर अतिरिक्त धनप्रभार जमा झाल्याने जवळच्या दुस-या रेणू मधील तीव्र ऋणप्रभारीत अणूंबरोबर अतिरिक्त हायड्रोजन बंध निर्माण होतो.

उदा. पाण्याच्या एका रेणूतील हायड्रोजन अणूचा त्याच्या जवळच्या रेणूतील ऑक्सिजनबरोबर होणा-या हायड्रोजन बंधामुळे घन बर्फ तयार होतो हे घनपदार्थ विदयुत वहन करीत नाहीत. तापमान व दाब सामान्य असताना हे द्रव किंवा वायू असतात. शितनानंतर त्यांचे घनीकरण होते.

2)आयनिक घनपदार्थ : **(Ionic Solid)**

सर्व क्षार स्फटिकी असतात त्यांना आयनिक घनपदार्थ म्हणतात. ज्या रेणूत धनप्रभारित लहान कटायन cation व ऋणप्रभारीत मोठे अनायन असतात Anion त्यांच्यापासून आयनिक क्षार बनतात.

आयनांतील प्रभार व संरचना अशी असते की ते एकमेकांना संतुलित करतात व रेणू विदयुतदृष्ट्या उदासीन असतात. दोन विरूध्द प्रभार असलेल्या आयनांमधील विदयुत स्थिनिक (Electrostatic force of attaraction) आकर्षण बले अत्यंत शक्तीशाली असतात विरूध्द बले पूर्णपणे संतुलित होतील अशी cation व anion यांची त्रिमितीय संरचना असल्याने आयनिक घन कठिण, ठिसूळ व उच्च (High) द्रवणांकाचे (melting point) असतात. मुक्त इलेक्ट्रॉन नसल्याने ते विदयुतवाहक नसतात. यांच्या पाण्यातील द्रावणात किंवा वितळलेल्या स्थितीत विदयुत वाहनासाठी आयन उपलब्ध होतात.

उदा. स्फटिकी NaCl, KNO_3,

Structure of NaCl



सोडीयम क्लोराईडचे स्फटिकी जालक cubic clased packed / face contred cubic packed असते. ज्यामध्ये सोडियम (Na^+) आयन हा सहा क्लोराईड (Cl^-) आयन भोवती असतो तसेच क्लोराईडच्या (Cl^-) आयन भोवती सहा सोडीअमचे आयन (Na^+) असतात

3)सहसंयुज घनपदार्थ (Covalet Solids):

सहसंयुज घनपदार्थात घटक कण म्हणजे अधात्विय अणू (Non-metallic element) हे मजबूत सहसंयुबंधानी बांधलेले असतात. यांना महाविशाल घन म्हणतात (giant solid यांचा द्रवणांक (Melting Point) उच्च असतो त्यांच्यातील सहसंयुज बंधाच्या क्षमतेनुसार ते कठीण hard किंवा ठिसूळ brittle असतात. भ्रमणशील इलेक्ट्रॉन उपलब्धतेनुसार ते कमी अधिक विदयुतवाहक असतात.

उदा. ग्राफाईट, हिरा, कोळसा, फूलरीन (fullerene) ही कार्बनची अपरूपे सहसंयुज घनपदार्थ आहेत.

4) धात्वीय घनपदार्थ (Metallic solid) :

धात्वीय घनपदार्थ एकाच धातूंच्या अणूंपासून बनतात स्फटिकाच्या अंतरालात (space lattice) बंध निर्माण करणारे इलेक्ट्रॉन स्थानभ्रष्ट (delocalised) असतात ते स्फटिकाच्या अंतरभागात स्वैर (free) संचार करू शकतात. बंध निर्माण करणा-या इलेक्ट्रॉन यात जणू सागरच असतो(electron sea) धन आयनाच्या, स्वरूपात स्फटिकातील धातूचे अणू या इलेक्ट्रॉन सागरात बीजक (kernel) रूपाने असतात व त्यांची जागा स्थिर असते. ऋणप्रभारीत मुक्त इलेक्ट्रॉन सागर व धनप्रभारित धात्वीय आयन यांच्यातील आकर्षण बलाला धात्वीय बंध म्हणतात.

धात्वीय घनपदार्थाचे गुणधर्म (Properties of Metallic solid)

1) धातूची चमक ही स्थानभ्रश्ट इलेक्ट्रॉन्समुळे delocalized electrons असते.

प्रकाश जेव्हा धातुच्या पृश्ठभागावर पडतो तेव्हा delocalized electrons प्रकाश Photons of light शोषुन घेतात व दोलन oscillating सुरू होते. दोलन करणारे इलेक्ट्रॉन प्रकाषाच्या स्वरूपात विदयुत चुंबकीय ऊर्जा उत्सर्जित करतात. म्हणजे प्रकाश Incident light पृश्ठभागावरून प्रतिबिंबीत होतांना दिसतो व पृश्ठभाग चमकतो.

2) विदयुत वाहकता (Electrical conductivity धातुंना विदयुत वाहकता त्याच्यातील भ्रमण इलेक्ट्रॉन मुळे (delocalized electron / Mobile electrons) येते.

3) औश्णिक वाहकता Thermal conductivity: औश्णिक वाहकता ही धातुच्या

शेवटच्या कक्षेतील मुक्त इलेक्ट्रॉन मुळे असते. धातू उश्ण भागाकडून थंड भागाकडे उष्णतापाठवतात.

4) वर्धनीयता व तन्यता (Malleability & Ductility) वर्धनीयता म्हणजे धातुंचा पत्रा (sheet) बनवणे तर तन्यता म्हणजे धातूपासून तार (wire) बनवणे.

5) ताणशक्ती / ताणासंबंधीची शक्ती (Tensile strength) न तुटता, ओझे (load) वाहुन नेण्याची किंवा सहन करण्याची ताकद म्हणजेच धातूची ताणशक्ती होय.

6) लवचिकता (Elesticity): हया गुणधर्मामुळे स्ट्रेचिंग बल सोडताच धातू मूल आकार मिळवू षकतो.

7) कठोरता (hardness) - घर्षण किंवा झीज (wear or abrasion) ला धातू प्रतिकार करू शकतात हया प्रतिकार करण्याच्या गुणधर्माला कठोरता (hardness) म्हणतात.

एकक कोष व स्फटिक जालक : (Unit cell and Crystal Lattice)

स्फटिकी घनपदार्थाचे (Crystalline solid) घटक कण : (constituent particles) म्हणजेच अणू, आयन, रेणू (atom, ion, molecule) एका विषिश्ट आवर्ती बंधात रचलेले असतात.

हया घटक कणांची जागा समान बिंदू किंवा समान गोळा किंवा समान चेंडू ने दाखवतात. अशा अगणित बिंदूच्या संचाला अवकाश जालक (space lattice) म्हणतात. घटक कणांची जागा ज्या बिंदूने दर्शविली जाते त्यांना जालक बिंदू (Lattice point) म्हणतात.

1) **एक मितीय जालक बिंदू (One dimensional lattice points – along x-axis)**

2) **व्दिमितीय जालक बिंदू Two-dimensional lattice points – along x and y axis)**



3) **त्रिमितीय जालक बिंदू (Three-dimensional lattice points – along x, y and z axis)**



स्फटिक जालकामध्ये : (crystal lattice) मध्ये घटक कर्णाची मांडणी (Arrangement) तीनही दिषांना व्यवस्थित व प्रमाणबध्द (regular and ordered) असते.

जालक बिंदू (lattice point) हे जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे दाखविता येतात हे फ्रेंच गणिती ब्राव्हाईस (Bravais) यांनी सिध्द केले.

एकक कोष (Unit cell)-

''स्फटिकी घनपदार्थाचे लहानात लहान आवर्ती (Periodic) संरचनीय एकक म्हणजे एकक कोष''.

एकक कोष सर्व दिषांना पुनरावर्तीत होऊन स्फटिकी घनपदार्थ निर्माण होतो.एकक कोष हा पूर्ण स्फटिकाचा आकार दर्शवितो.एकक कोषाची आकृती सहज समजण्यासाठी कागदावर घटक कणांची केंद्रे सरळ रेशेत जोडली जातात. रेशांचा छेदनबिंदू हा घटककण असतो त्याला जालक बिंदू (Lattice Point) म्हणतात.

स्फटिकातील कणांची एका नियमित आवर्ती आकृतीबंधात संरचना असते. स्फटिकातील कोणताही जालक बिंदू स्फटिकातील दुस-या कोणत्याही तषाच परिसर वातावरणातील जालक बिंदू सारखाच असतो.समान जालक बिंदूच्या समूहाला अवकाश जालक (Space Lattice) म्हणतात. जालक ही एकमेकांना कर्णात ओलाडणा-या पट्टयाची संरचना असते. जालक बिंदू हे जास्तीत जास्त 14 वेगवेगळया प्रकारे दर्शविता येते हे फ्रेंच गणिती Bravais यांनी सिध्द केले आहे.

स्फटिकातील घटक कण हे बिंदूने दाखवून स्फटिकाचे जालक काढता येते. जालक बिंदू सरळ रेशेने जोडून जालकाचा भौमितीक आकर मिळतो हा आकार एकक कोषाच्या आकारावर अवलंबून असतो.

एकक कोषाचा आकार त्याच्या तीनही बाजूंची लांबी अनुक्रमे a, b, c व त्यांच्या ती बाजूंमधील कोन (α, β, γ) या घटकांवर अवलंबून असतो, हया घटकांना Unit parameters म्हणतात.α हा b व c बाजंूमधील 'β हा a व c बाजूंमधील तर γ हा a व c बाजूमधील असतो. बाजू व कोन बदलून सात निराळया प्रकारे घटक कणांची स्फटिकातील संरचना करता येते.

स्फटिकी जालकांच्या व्यवस्था सात पध्दती खालीलप्रमाणे आहे.

Sr. No.	स्फटिकी जालक **(Crystal Lattice)**	बाजू **(Edge length)**	बाजूंमधील कोन **(Axial Angle)**
1	घनाकृती (cubic)	$a=b=c$	$\alpha=\beta=\gamma=90^0$
2	चतुष्कोनीय (Tetragonal)	$a=b\neq c$	$\alpha=\beta=\gamma=90^0$
3	समचतुर्भुती (Orthorhombic)	$a\neq b\neq c$	$\alpha=\beta=\gamma=90^0$
4	षट्पृश्ठीय (Hexagonal)	$a=b\neq c$	$\alpha=\beta=90^0, \gamma=120^0$
5	समचतुर्भुज पृश्ठीय (Rhomohydral)	$a=b=c$	$\alpha=\beta=\gamma\neq 90^0$
6	एकनताक्ष (Monoclinic)	$a\neq b\neq c$	$\alpha=\beta=90^0, \gamma\neq 90^0$
7	त्रिनताक्ष (Triclinic)	$a\neq b\neq c$	$\alpha\neq\beta\neq\gamma\neq 90^0$

खालील दोन प्रकारचे एकक कोष वेगवेगळया (7 crystal system of 14 Bravais Lattice) तयार करतात.

1) सरल एकक कोष - हया मध्ये घटक कण फक्त आकृतीच्या कोप-यावर असतात (Primitive unit cell)
2) असरल एककोष (Non-Primitive or centerd unit cell) हयामध्ये घटक कण आकृतीच्या कोप-यावर तर असतातच परंतु केंद्रस्थानी पण असतात असरल एकक कोषाचे तीन प्रकार पडतात.
3) शरीर केंद्रित एकक कोष (Body centerd unit cell) हयामध्ये घटककण कोप-यावर तसेच आकृतीच्या मध्यावर असतो.
4) पृश्ठकेंद्रित एकक कोष (Face centerd unit cell) हयामध्ये घटक कण आकृतीच्या कोप-यावर तसेच प्रत्येक पृश्ठाच्या मध्यावर असतो.
5) अंतःकेंद्रीत एकक कोष (End centerd unit cell) हयामध्ये घटक कण आकृतीच्या कोप-यावर तसेच दोन समांतर / विरूध्द पृश्ठाच्या मध्यावर असतात.

घनाकृती चे जालके (Types of Cubic lattices)

घनाकृती स्फटिकामध्ये तीनही बाजू (a, b, c) सारख्याच लांबीच्या असतात. म्हणजे $a=b=c$ तसेच दोन बाजूमधील कोन हा काटकोन असतो म्हणजे सर्व कोन 90^0 अंशाचे असतात. $\alpha=\beta=\gamma=90^0$ हयाचा अर्थ ज्या स्फटिकाचे घनाकृती हे एकक कोष आहे असे तीन प्रकारचे एकक कोष असतात.

1) सरल / साधा / प्राथमिक घनाकृती एकक कोष (Simple Cubic Unit Cell / Primitive unit cell)
2) शरीर केंद्रित घनाकृती एकक कोष (Body centred cubic unit cell)
3) पृश्ठकेंद्रित घनाकृती एकक कोष (Face centred cubic unit cell)

1) सरल घनाकृती एकक कोषः-

हया एकक कोषात घटक कण म्हणजेच अणू / आयन / रेणू हे फक्त घनाकृतीच्या आठ कोप-यात असतात. त्यांना (घटक कणांना) तीनही दिषांना पुनरावर्तित (repeatation) करून स्फटिकाची संरचना केली जाते. या एकक कोषाच्या प्रत्येक कोप-यातील घटक कण लगतच्या आठ कोषामध्ये सामायिक असतो. त्यामुळे प्रत्येक

कोषात प्रत्येक कोप-यातील घटक कवाचा 1/8 भाग म्हणून प्रत्येक कोषात $8\,X\,\frac{1}{8}=1$ घटक कण असतो.

i.e. No of atoms per unit cell = $8\,X\,\frac{1}{8}=1$



2) शरीर केंद्रित घनाकृती एकक कोष (Body centred cubic unit cell) :-

हया एकक कोषात प्रत्येक कोप-यावर एक घटक कण असतोच परंतु घनाकृतीच्या मध्यात एक घटक कण असतो. सरल घनाकृतीच्या एकक कोषाप्रमाणे यातही आठ कोप-यातील प्रत्येक घटक कण लगतच्या आठ कोषांमध्ये सामायिक असतो. त्यामुळे प्रत्येक

कोप-यातील कणाचा 1/8 भाग म्हणून प्रत्येक कोषात $8 X \frac{1}{8} = 1$ घटक कण व मध्यातील एक कण मिळून दोन घटक कण होतात.

i.e. No of atoms per unit cell = $8 X \frac{1}{8} + (1) = 2$



3) पृश्ठकेंद्रित घनाकृती एकक कोष (Face centred cubic unit cell) :

हया एकक कोषात प्रत्येक कोप-यावर एक घटक कण असतोच तसेच प्रत्येक पृश्ठाच्या मध्यावर एक घटक कण असतो.

सरल घनाकृतीच्या एकक कोषाप्रमाणे यातही आठ कोप-यातील प्रत्येक घटक कण लगतच्या आठ कोषामध्ये सामायिक असतो व पृश्ठाच्या मध्यातील घटक कण शेजारच्या दोन कोषात सामायिक असतो.

त्यामुळे प्रत्येक कोप-यातील कणाचा 1/8 भाग म्हणून प्रत्येक कोषात $8 X \frac{1}{8} = 1$ घटक कण व सहा पृश्ठातील $6 X \frac{1}{2} = 3$ घटक कण मिळून प्रत्येक कोषातील एकंदर घटक कणांची संख्या चार होते.

i.e. No of atoms per unit cell = $\left(8 X \frac{1}{8}\right) + \left(6 X \frac{1}{2}\right) = 4$



3 Hexagonal Closed Pack षटकोनी धनसंकुल संरचना

गोळयाची प्रतलिय रचना करतांना एका ओळीतील शिखा व दुस-या ओळीतील दोणींना लागून मांडणी केल्याने संहत व पक्की संरचना होते.

पहिली ओळ A दुसरी B, तिसरी A चैथी B अशा मांडणीने ABAB प्रतलीय संरचना (आकृती दाखविल्या प्रमाणे) मिळते.

12 कोप-यातील कणाचा 2 अणू

2 पृश्ठातील 1 अणू

आतील बाजूस ३ अणू

एकूण 6 अणू

घनपदार्थाचे संकुलन (Packing of crystals) आणि को- ऑर्डिनेशन नंबर: (Co-ordination Number)

सरल घनाकृतीच्या एकक कोषात 52.4 % भाग घटक कणांनी व्यापलेला व उरलेला 47.6 %: मोकळा असतो त्याला पोकळी म्हणतात.शरीर केंद्रित घनाकृतीच्या एकक कोषात 68% भाग घटक कणांनी व्यापलेला असतो व उरलेला 32% पोकळी असते.समपृश्ठ केंद्रित घनाकृतीच्या एकक कोषात 74% भाग घटक कणांनी व्यापलेला असतो व उरलेला 26% पोकळी असते.अधिक घटक कण (गोळे) बसवून पोकळी कमी करणे ही स्फटिकी जालकाची सर्वांत कार्यक्षम संरचना असते. यांना घन संकुलन म्हणतात(Close packing) हया घटक कणांचे स्फटिकामध्ये संकुलन समजण्यासाठी सर्व घटक कणांचा आकार एकाच आकाराच्या चेंडूप्रमाणे) किंवा गोळयाप्रमाणे दाखवितात.

1)सरल घनाकृतीचे संकुलन : (Simple cubic packing crystal)

सरल घनाकृतीमध्ये सर्व बाजू सारख्या असतात व सर्व बाजूंमधील कोन 90^0 अंशाचे असतात.

i.e. Unit parameter $a = b = c, \text{and } \alpha = \beta = \gamma = 90^0$



एकमितीय गोळयांच्या संरचनेचे पुनरावर्तन करून पहिल्या रांगेतील प्रत्येक गोळा पुढच्या रांगेतील गोळयाला स्पर्श करेल अशी पुन्हा पुन्हा मांडणी करून बनवलेली व्दिमितीय संरचना बनते.



एकमितीय मांडणीत प्रत्येक गोळा षेजारच्या दोन गोळयांना तर व्दिमितीय मांडणीत प्रत्येक गोळा शेजारच्या चार गोळयांना स्पर्ष करतो व्दिमितीय मांडणी पुनरावर्तित करून त्रिमितीय मांडणी बनवली की सरल घनाकृती एकक कोष तयार होतो



त्रिमितीय मांडणीत प्रत्येक गोळा व्दिमितीय प्रतलातील चार, एक वरचा व एक खालचा अशा सहा गोळयांना स्पर्श करतो.

सहबध्दता अंक - Co-ordination Number





''एक गोळा जितक्या गोळयांच्या संपर्कात असेल म्हणजे किती गोळयांना स्पर्श करत असेल. त्या संख्येला त्या आकृतीचा सहबध्दता अंक म्हणतात.''

सरल घनाकृतीच्या किंवा त्याच्या एकक कोडयातील गोळयाचा सहबध्दता अंक सहा आहे.

उदाहरण Polonium (P_0)

2)शरीर केंद्रित आकृतीचे संकुलन (Body centred cubic (BCC) crystal) :-

Unit Parameter: $\alpha = b = c, \alpha = \beta = \gamma = 90^0$

हया प्रकारच्या घनाकृती मिळविण्यासाठी पहिल्या व तिस-या स्तराच्या मधल्या खळग्यात दुसरा स्तर बसवावा लागतो.

थोडक्यात पहिला स्तर सरल घनाकृती प्रमाणे करून दुसरा स्तर दोन गोळयाच्या पोकळी / खळग्यात बसवून तिसरा स्तर हा पहिल्या स्तरावर बसवावा लागतो. प्रत्येक गोळयाची भोवती वरच्या स्तरातील चार व खालच्या स्तरातील चार असे आठ गोळे असल्यामुळे हया संरचनेचा सहबध्दता अंक आठ असतो.

उदा Iron (Fe) Chornium (Cr) Tungsten (W)



4)समपृश्ठ केंद्रित घनाकृती संरचना:
(Face centred cubic crystal / Cubic Closed Packing Crystal (CCP)

Unit Parameter: $\alpha = b = c, \alpha = \beta = \gamma = 90^0$

गोळयाची प्रतलिय (Two dimensional)रचना करतांना एका ओळीतील शीखा (crests) व दुस-या ओळीतील खाच (gaps) लागून मांडणी केल्याने संहत व पक्की संरचना होते.

पहिली ओळ A दुसरी B, तिसरी A, चैथी B अशा मांडणीने ABAB प्रतलीय संरचना (आकृती दाखविल्या प्रमाणे) मिळते.



Hexagonal close packing in two dimensions

केंद्रिय गोळयांच्या शेजारच्या गोळयांची केंद्रे जोडून शटकोन तयार होतो. त्यामुळे याला शटकोनी घन संकुलन म्हणतात. शटकोनी संकुलनात पोकळीचा आकार गोळयापेक्षा फारच छोटा व प्रत्येक केंद्रिय गोळी भोवती सहा रिकाम्या जागा तसेच त्रिकोणी पोकळयांची षिकरे एका आड एक तसेच वर आणि खाली असतात

त्रिमितीय (Three dimensional) संरचना करतांना पहिल्या ABABप्रकारच्या स्तराला आपण सोयीसाठी A म्हणू व दुस-या IABAB प्रकारच्या स्तराला आपण B म्हणू. दुस-या स्तरातील सर्व अश्टपृश्ठकी पोकळया (Octahdral voids) तिस.या स्तरातील गोळयांनी आच्छादित केल्यास A व B स्तरापेक्षा तिसरा स्तर C वेगळा होईल स्तरांची अशी रचना केल्यास चैथा स्तर पहिल्या स्तराप्रमाणे म्हणजे ।ठब्।ठब् ABCABC याला घनाकृती घन संकुलन म्हणतात. Cubic closed packing Crystal (CCP)किंवा Face centred cubic crystal (FCC) म्हणतात.

हया संरचनेत प्रत्येक गोळयाच्या शेजारी स्वतःच्या स्तरातील सहा तसेच वरच्या व खालच्या स्तरात प्रत्येकी तीन असे एकंदर बारा गोळे असल्याने केंद्रिय गोळयांचा सहबध्दता अंक (Co-ordination Number) 12 असतो.
उदाहरण:- Aluminium (Al), Silver (Ag), Copper (Cu), Gold (Au)

4) षटकोनी धनसंकुलन संरचना (Hexagonal Closed Packing):

गोळयाची प्रतलिय रचना करतांना एका ओळीतील शिखा व दुस-या ओळीतील दोणींना लागून मांडणी केल्याने संहत व पक्की संरचना होते पहिली ओळ A, दुसरी B, तिसरी A, चैथी B अशा मांडणीने ABAB प्रतलीय संरचना (आकृती दाखविल्या प्रमाणे) मिळते.

केंद्रिय गोळयांच्या शेजारच्या गोळयांची केंद्रे जोडून षटकोन तयार होतो. त्यामुळे याला षटकोनी घन संकुलन म्हणतात. षटकोनी संकुलनात पोकळीचा आकार गोळयापेक्षा फारच छोटा व प्रत्येक केंद्रिय गोळी भोवती सहा रिकाम्या जागा तसेच त्रिकोणी पोकळयांची शिखरे एका आड एक तसेच वर आणि खाली असतात.

त्रिमितीय (Three dimensional) संरचना करतांना, पहिल्या ABAB प्रकारच्या स्तराला आपण सोयीसाठी A म्हणू व दुस-या ABAB प्रकारच्या स्तराला आपण B म्हणू.

दुस-या स्तरातील सर्व चतुःपृश्ठकी पोकळया तिस-या स्तरातील गोळयांनी आच्छादित केल्यास तिस-या स्तरातील सर्व गोळे पहिल्या स्तरातल्या गोळयांच्या बरोबर वर असतील. चौथा स्तर दुस-या स्तराप्रमाणेच ठेवून एकंदर संरचना ABABAB प्रकारची होईल. याला षटकोनी धन संकुलन संरचना म्हणतात.



Hexagonal close packing in two dimension

उदाहरण - Cobalt (Co), magnesium (Mg), Zinc (Zn)

Unit-5: Electrochemistry and metal Corrosion, Control Measures

युनिट -५ :इलेक्ट्रोकेमिस्ट्री आणि मेटल कोरोजन, कंट्रोल मेजर

विषय दर्जा विद्यार्जन निष्पत्ती (Course Lev.el Learning Outcome):

- उद्योगात गंज प्रतिबंध उपाय वापरा

सिद्धांत विद्यार्जन निष्पत्ती (Theory Learning Outcome):

- कोपर आणि प्लॅटिनम रोड वापरून कॉपर सल्फेट चे इलेक्ट्रॉलिसिस चे वर्णन करणे.
- फॅरेडेचा इलेक्ट्रॉलिसिस वर पहिला नियम आणि दुसरा नियम समजून घेणे आणि त्यावर उदाहरण सोडवणे
- दिलेल्या प्राथमिक आणि दुय्यम इलेक्ट्रो केमिकल सेल मध्ये फरक करा
- गंजच्या रेट वर परिणाम करणारे भिन्न घटक ओळखा.
- गंजच्या रेट वर परिणाम करणारे भिन्न घटक ओळखा
- गंज निर्मिती टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय निवडा

युक्तिवाद (Rational)

इलेक्ट्रोकेमिस्ट्री (Electrochemistry) म्हणजे रासायनिक प्रक्रियेचा (Chemical Process) अभ्यास ज्यामुळे इलेक्ट्रॉन आपली जागा सोडतात यात मोबाईल उपकरणे, वाहने इत्यादींसाठी ऊर्जा साठवण्यामध्ये महत्त्वपूर्ण असणारी सेल बॅटरी (battery) यासारख्या तंत्रज्ञानाची विस्तृत माहिती आहे यात इलेक्ट्रोरिफाइनिंग (electro refining), इलेक्ट्रोप्लेटिंग (electro plating), इलेक्ट्रोडिपॉझिट (electro deposit) द्वारे सामग्रीचे उत्पादन समाविष्ट आहे .

गंज म्हणजे सामग्रीवर तसेच पायाभूत सुविधा (Infrastructure) जशा की पूल (bridges) स्टील मशीनरी (Steel machinery) इलेक्ट्रिक टावर तेल पाईपलाईन जसे जहाजे इत्यादीवर वातावरणाचा विनाशकारी हल्ला (destructive attack) गंज प्रक्रियेचा गंभीर परिणाम म्हणजे मौल्यवान संसाधनाचा तोटा. (loss of valuable resources), प्लांट बंद होणे (plant shut down), उत्पादनास दूषित करणे, कार्यक्षमतेमध्ये कपात (reduction in efficiency) ,खर्चिक देखभाल इत्यादी अभ्यासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे गंज (corrosion) आणि त्याचे नियंत्रण (corrosion control) याबद्दल जनजागृती (public awareness) करणे.

इलेक्ट्रोकेमिस्ट्री

महत्त्व (Importance):

अनेक रासायनिक अभिक्रियांमध्ये विद्युत ऊर्जा (Electrical Energy) महत्त्वाची भूमिका बजावते.
इलेक्ट्रोकेमिस्ट्री म्हणजे एक विज्ञानाची शाखा (Branch of Science) जी रासायनिक अभिक्रिया दरम्यान सोडलेल्या ऊर्जेपासून वीज निर्मितीशी (Energy released during chemical reaction) संबंधित आहे.
उत्स्फूर्त रासायनिक अभिक्रिया (spontaneous Chemical reaction) आणि विद्युत ऊर्जेचा वापर उत्स्फूर्तपणे घडवून वीज निर्मितीशी संबंधित आहे. अशा बदलांना विद्युतीय बदल म्हणतात आणि उत्पादनात त्यांचा उपयोग होतो विविध उपकरणे (instruments) आणि उपकरणांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सेल/संच (cell) आणि बॅटरी (battery) ज्यामुळे वीज निर्माण होते .

मोठ्या प्रमाणात धातू , सोडियम हायड्रॉक्साईड (NaOH) , क्लोरीन वायू(Cl_2) आणि इतर अनेक रसायने आहेत

इलेक्ट्रोकेमिकल पद्धतींनी उत्पादित रासायनिक बदल घडवून आणतात .इलेक्ट्रोकेमिकली केलेल्या प्रतिक्रिया कमी आहेत प्रदूषणकारी असतात

विद्युत सुवाहक (conductor):

हा एक पदार्थ आहे जो त्यातून विद्युत प्रवाह वाहू शकतो . उदा:- सर्व धातू (metals), ग्रेफाइट (graphite), मिसळलेले (वितळलेले) क्षार (fused/ melted/ aqueous salts) , आम्लांचे जलीय द्रावण (acidic), आम्लारी (basic), क्षार (Salts)

इन्सुलेटर दुर्वाहक (Insulators) :

हा एक पदार्थ आहे जो त्यातून विद्युत प्रवाह वाहू देत नाही. उदा:-लाकूड (wood), कागद (paper) प्लास्टिक (plastic), अल्कोहोल (alcohol) इ.

कंडक्टरचे प्रकार:

कंडक्टरचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते:

मेटॅलिक कंडक्टर (metallic conductor):

कोणतेही रासायनिक बदल न करता धातूच्या पदार्थातुन विद्युत प्रवाह वाहू शकतो अश्या पदार्थाला मेटॅलिक कंडक्टर (metallic conductor) असे म्हणतात. धातू आणि त्यांचे मिश्र धातू विद्युत प्रवाह वाहून नेतात. धातूच्या अणूंमधील इलेक्ट्रॉनच्या प्रवाहामुळे पदार्थातुन विद्युत प्रवाह वाहू शकतो .

उदा:- तांबे (copper), ॲल्युमिनियम (Aluminium) आणि चांदी (Silver) यासारखे धातू इ.

इलेक्ट्रोलिटिक कंडक्टर किंवा इलेक्ट्रोलाइट (Electrolytic Conductor and electrolyte):

हे असे पदार्थ आहेत जे वितळलेले/ फ्यूज केलेल्या स्थितीत किंवा जलीय द्रावण (aqueous) आयनांना मुक्त करते (released ions) आणि त्यातून विद्युत प्रवाह वाहू शकतो (allow to flow current) परिणामी रासायनिक विघटन / बदल (chemical changes) घडवून येतो. या प्रकारच्या कंडक्टरमध्ये, चार्ज आयनद्वारे वाहून नेला जातो (charged ions carry current).या प्रकारच्या कंडक्टर मध्ये आयन्सच्या विस्थापनावर (displacement of ions) विद्युत ऊर्जेचे निर्माण अवलंबून आहे . स्थायू (solid) पदार्थांमध्ये मुक्त आयन नसल्यामुळे विद्युत धारा वाहू शकत नाही. जलीय द्रावण/ वितळलेले पदार्थ यात मुक्त आयन असल्यामुळे विद्युत धारा वाहू शकते.

उदाहरणार्थ: आम्ल आणि क्षार.

धातू आणि इलेक्ट्रोलाइटिक कंडक्टरमधील फरक

धातू कंडक्टर	इलेक्ट्रोलाइटिक कंडक्टर
इलेक्ट्रॉनच्या प्रवाहामुळे ज्या पदार्थांमधून विद्युत प्रवाह होतो त्यांना मेटालिक कंडक्टर असे म्हणतात	जे पदार्थ वितळलेल्या स्थितीत आणि जलीय स्थितीत आयन ची निर्मिती करतात आणि हेच आयन विद्युत प्रवाहाला कारणीभूत ठरतात त्या पदार्थांना इलेक्ट्रॉनिक कंडक्टर असे म्हणतात
मेटालिक कंडक्टर मध्ये पदार्थ हस्तांतरित (displacement)होत नाही	मेट्रो लिपिक कंडक्टर मध्ये पदार्थ हस्तांतरित होतो
तापमान आणि इलेक्ट्रिक कंडक्टर यामध्ये व्यस्त प्रमाणात (inversely proportion) आहे	तापमान आणि इलेक्ट्रिक कंडक्टर समप्रमाणात (directly proportion)आहे

इलेक्ट्रोलाईट (Electrolyte)

जो पदार्थ वितळलेल्या किंवा द्रव अवस्थेत आयन ची निर्मिती करतो आणि विद्युत प्रवाह वाहतो ,त्याच्यात रासायनिक बदल होतात त्या पदार्थाला इलेक्ट्रोलाईट असे म्हणतात .
इलेक्ट्रोलाईट हे दोन प्रकारचे असतात

१. स्ट्राँग इलेक्ट्रोलाईट (strong) आणि
२. विक इलेक्ट्रोलाईट (Weak)

स्ट्राँग लेक्ट्रोलाईट जास्तीत जास्त आयन ची निर्मिती करतो (strong electrolyte gives maximum number of ions) त्याच्या डिग्री ऑफ डिसोसिएशन (degree of dissociation) हा अधिक असतो उदाहरणार्थ

Strong acid (आम्ल) –HCl, HNO_3, H_2SO_4.
Strong base (आम्लारी) - NaOH,KOH
Salts (क्षार) -NaCl,KCl

वीक इलेक्ट्रोलाइट म्हणजेच कमकुवत इलेक्ट्रोलाईट हा कमीत कमी आयन ची निर्मिती करतो त्याचा डिग्री ऑफ डिसोसिएशन हा कमी असतो
उदाहरणार्थ

Weak acid (आम्ल) –Acetic acid (CH_3COOH), Boric Acid (H_3BO_3)
Weak base (आम्लारी) - Ammonium Hydroxide (NH_4OH)

डिग्री ऑफ डिसोसिएशन (Degree of Dissociation)

कोणत्याही द्रव मध्ये एकूण रेणूंच्या संख्येपैकी किती रेणूंचे आयन मध्ये विघटन झालेले आहे या प्रमाणात डिग्री ऑफ डिसोसिएशन असे संबोधतात.

$$\text{डिग्री ऑफ डिसोसिएशन} = \frac{\text{रेणूंचे आयन मध्ये विघटन झालेले आहे}}{\text{एकूण रेणुंनची संख्या}}$$

स्ट्राँग इलेक्ट्रोलाईट साठी डिग्री ऑफ डिसोसिएशन हा अधिकतम असतो तर वीक इलेक्ट्रोलाईट साठी डिग्री ऑफ डिसोसिएशन हा कमी असतो .

डिग्री ऑफ डिसोसिएशन खालील चार बाबींवर अवलंबून आहे

१. द्राव्यचे स्वरूप (Nature of solute)
२. द्रावकाचे स्वरूप (nature of solvent)
३. द्रावणाचे कॉन्सन्ट्रेशन /द्रावणाचे स्वरूप (Concentration of electrolyte)
४. तापमान (Temperature)

१) द्राव्यचे स्वरूप (Nature of solute : स्ट्राँग Strong acid आम्ल –HCl, HNO_3, $H2SO_4$. Strong base (आम्लारी) - NaOH, KOH, Salts (क्षार) -NaCl,KCl हे जास्तीत जास्त आयन ची निर्मिती करतात त्यामुळे त्यांचा डिग्री ऑफ डिसोसिएशन हा अधिक असतो तसेच वीक एसिड (Weak acid) आम्ल) (Acetic acid (CH_3COOH)), Boric Acid (H_3BO_3)Weak base (आम्लारी) - Ammonium Hydroxide (NH_4OH) हे कमीत कमी आयन ची निर्मिती करतात त्यामुळे त्यांचा डिग्री ऑफ आयनायझेशन हा कमी असतो .

२) द्रावकाचे स्वरूप (nature of solvent):
पोलर द्रावक म्हणजेच पोलर सॉल्व्हंट हा दोन आयनांच्या मधील इलेक्ट्रोस्टॅटीक बल ला कमकुवत बनवतो आणि त्या कारणांमुळे जास्तीत जास्त आयनाची निर्मिती होते परिणामी डिग्री ऑफ आयओनायझेशन वाढतो .

३ द्रावणाचे कॉन्सन्ट्रेशन (Concentration of solution) :
द्रावणाचे कॉन्सन्ट्रेशन आणि डिग्री ऑफ डिसोसिएशन हे एकमेकांच्या व्यस्त प्रमाणात(Inversly Proportion) असतात जर द्रावणाचे कॉन्सन्ट्रेशन वाढले तर डिग्री ऑफडिसोसिएशन कमी होते परिणामी आयन ची संख्या कमी होते याउलट द्रावणाचे कॉन्सन्ट्रेशन कमी झाले तर डिग्री ऑफ डिसोसिएशन जास्त होते परिणामी आयन ची संख्या वाढते

४ तापमान: तापमान आणि डिग्री ऑफ आयोनायझेशन समप्रमाणात असतात जस जसे तापमानात वृद्धी होते तस तसे आयनांची निर्मिती होत जाते परिणामी डिग्री ऑफ आयनायझेशन मध्ये वृद्धी होते

स्ट्राँग आणि वीक इलेक्ट्रोलाईट मधील फरक

स्ट्राँग इलेक्ट्रोलाईट	वीक इलेक्ट्रोलाईट
स्ट्राँग लेक्ट्रोलाईट वितळलेल्या आणि द्रव अवस्थेत पूर्णतः आयन मध्ये विघटित होतो	वीक इलेक्ट्रोलाईट वितळलेल्या किंवा द्रव्य अवस्थेत पूर्णतः विघटित होत नाही
स्ट्राँग लेक्ट्रोलाईट हा विद्युत सुवाहक आहे	विद्युत ची वाहकता कमी असते
डिग्री ऑफ आयओनायझेशन ची व्हॅल्यू अधिक असते	डिग्री ऑफ आयोनायझेशन कमी असते
Strong acid (आम्ल) –HCl, HNO_3, $H2SO_4$. Strong base (आम्लारी) - NaOH,KOH Salts (क्षार) -NaCl,KCl	Weak acid (आम्ल) –Acetic acid (CH_3COOH), Boric Acid (H_3BO_3) Weak base (आम्लारी) - Ammonium Hydroxide (NH_4OH)



इलेक्ट्रोकेमिकल सेल **इलेक्ट्रोलिटिक सेल**

वोल्टाइक /गॅलव्हानिक सेल:

इलेक्ट्रोकेमिकलसेल

जो सेल म्हणजे संच जो संच विद्युत ऊर्जेचा रासायनिक ऊर्जेत रूपांतरित करतो त्या संचाला इलेक्ट्रोलिटिक सेल/संच असे म्हणतात उदाहरणार्थ इलेक्ट्रोप्लेटिंग electroplating, इलेक्ट्रोटायपिंग electrotyping ,इलेक्ट्रोलिसिस electrolysis

इलेक्ट्रोलिटिक सेल

जो संच रासायनिक ऊर्जेचा विद्युत ऊर्जेत रूपांतरित करतो त्या संचाला इलेक्ट्रोकेमिकल संच असे म्हणतात ड्राय सेल म्हणजेच लॅकलान्च सेल ,लीड ऍसिड बॅटरी,निकेल कॅडमियम बॅटरी इत्यादी .

इलेक्ट्रोकेमिकल सेल आणि इलेक्ट्रोलिटिक सेल यामधील फरक

इलेक्ट्रोकेमिकल सेल	इलेक्ट्रोलिटिक सेल
जो संच रासायनिक उर्जेला रासायनिक ऊर्जेचा विद्युत ऊर्जेत रूपांतरित करतो त्या संचाला इलेक्ट्रोकेमिकल संच असे म्हणतात	जो संच विद्युत ऊर्जेचा रासायनिक ऊर्जेत रूपांतरित करतो त्या संचाला इलेक्ट्रो लिटिक सेल असे म्हणतात
इलेक्ट्रो केमिकल सेल मध्ये रासायनिक अभिक्रिया एकाच दिशेने प्रभावित होते आणि त्यातूनच विद्युत ऊर्जेचा निर्माण केला जातो	इलेक्ट्रो लिटीक सेल मध्ये रासायनिक अभिक्रिया दोन्ही दिशेने प्रभावित होते आणि त्यातूनच विद्युत ऊर्जेचा वापर केला जातो
यात कॅथोड वर धन आणि ॲनोड वर ऋण प्रभार असतो.	यात ॲनोड वर धन आणि कॅथोड वर ऋण प्रभार असतो .
डॅनियल सेल	इलेक्ट्रोप्लेटिंग, इलेक्ट्रोलिसीस

कॅथोड आणि ॲनोड cathode and Anode:
इलेक्ट्रोलाईट मधून विद्युत प्रवाह पास करण्यासाठी दोन रोड (rod) किंवा प्लेट ची आवश्यकता असते ह्या दोन्ही रोडचे एक टोक बॅटरीला(battery)जोडलेले असतात .या दोन रोडला इलेक्ट्रोड (electrodes) असे म्हणतात .ज्या इलेक्ट्रोड मधून विद्युत प्रवाह इलेक्ट्रोलाईट मध्ये प्रवेश करतो त्याला त्या इलेक्ट्रोडला अनोड किंवा पॉझिटिव्ह इलेक्ट्रोड असे म्हणतात आणि ज्या इलेक्ट्रोड मधून विद्युत प्रवाह हा इलेक्ट्रोलाईट मधून बाहेर पडतो त्या इलेक्ट्रोडला कॅथोड किंवा निगेटिव्ह इलेक्ट्रोड असे म्हणतात .

इलेक्ट्रोड च्या प्रभावावर आयनाची विस्थापन अवलंबून असते धन प्रभारीत इलेक्ट्रोडवर ऋण प्रभार असलेले आयन (Anion) आकर्षित होतात तसेच ऋणप्रभारित इलेक्ट्रोड कडे धनप्रभारित आयन (Cations)आकर्षित होतात इलेक्ट्रॉन च्या दान केल्यामुळे किंवा इलेक्ट्रॉन ग्रहण केल्यामुळे ऑक्सिडेशन आणि रिडक्शन अभिक्रिया इलेक्ट्रोडवर होतात

कॅथोड ह्या इलेक्ट्रोड वर रिडक्शन(reduction) अभिक्रिया होते जिथे इलेक्ट्रॉन स्वीकारले जातात(gain of electrons)अनोड या इलेक्ट्रोडवर ऑक्सिडेशन (oxidation)अभिक्रिया होते जिथे इलेक्ट्रॉन दान केले जातात(loose of electrons)

कॅथोड आणि ॲनोड यामध्ये फरक (difference between cathode and Anode):

कॅथोड	ॲनोड
हा ऋणप्रभारित इलेक्ट्रोड आहे जो बॅटरीच्या ऋण प्रभाराला जोडला जातो .	हा धनप्रभारित इलेक्ट्रोड असून बॅटरीच्या धनप्रभाराला जोडला जातो
इथे रिडक्शन अभिक्रिया होते	ह्या इलेक्ट्रोडवर ऑक्सिडेशन अभिक्रिया होते
इलेक्ट्रॉलिसिसच्या वेळी इलेक्ट्रॉनचा प्रवाह हा ऋणप्रभाराकडून कॅथोड कडे होतो	इलेक्ट्रॉलिसिसच्या वेळी इलेक्ट्रॉनचा प्रवाह ॲनोड कडून धनप्रभाराकडे असतो

इलेक्ट्रोड विभावंतर किंवा इलेक्ट्रोड पोटेन्शियल
जेव्हा मेटलरॉड त्याच्याच क्षारयुक्त द्रावणात बुडवला जातो तेव्हा दोन शक्यता उद्भवतात

- पहिली शक्यता मेटल इलेक्ट्रोड, इलेक्ट्रॉन दान करतो आणि मेटल आयन हा इलेक्ट्रोलाईट मध्ये विरघळतो आणि परिणामी मेटल रोडला ऋणप्रभार तसेच इलेक्ट्रोलाईट ला धनप्रभार येतो ही परिस्थिती ऑक्सिडेशन अभिक्रिया झाल्यामुळे उद्भवते म्हणून या शक्यतेला ऑक्सिडेशन इलेक्ट्रोड पोटेन्शियल असे म्हणतात .
- दुसरी शक्यता मेटल इलेक्ट्रोड इलेक्ट्रॉन ग्रहण करतो परिणामी मेटल रोडला धनप्रभार तसेच इलेक्ट्रोलाईटवर ऋण प्रभार येतो ही परिस्थिती रिडक्शन अभिक्रिया झाल्यामुळे उद्भवते म्हणून या शक्यतेला रिडक्शन इलेक्ट्रोड पोटेन्शियल असे म्हणतात.



(a) De - electronation (b) Electronation

आयोनेजेशन आणि डिसोसिएशन (Ionization and Dissociation)

आयनिक बंध (ionc bond) असलेले पदार्थ पाण्यात विरघळल्यामुळे आयन ची निर्मिती होते. त्या प्रक्रियेला डिसोसिएशन असे म्हणतात .सहसंयुज बंध (Covalent Bond) असलेले पदार्थ जेव्हा आयन ची निर्मिती करतात त्या प्रक्रियेला आयोनेजेशन असे म्हणतात .

प्राथमिक आणि सेकंडरी सेल(Primary & Secondary)

जे संच रासायनिक ऊर्जेचे इलेक्ट्रिक ऊर्जेत रूपांतरित करतात आणि कालांतराने निष्क्रिय होतात(used only once) अशा संचाला प्राथमिक संच किंवा प्रायमरी सेल असे म्हणतात .उदा .ड्राय सेल ,डॅनियल सेल जे संच रासायनिक ऊर्जेचे इलेक्ट्रिक ऊर्जेत रूपांतरित करतात आणि कालांतराने निष्क्रिय होत नाही (use for many times)त्या संचाला सेकंडरी(secondary) सेल असे म्हणतात सेकंडरी सेल ची चार्जिंग वारंवार . .करू शकतोउदा .लीड ऍसिड बॅटरी ,निकेल कॅडमियम बॅटरी

प्राथमिक सेल	**सेकंडरी सेल**
वारंवार चार्जिंग होत नाही	वारंवार चार्जिंग होते
रासायनिक अभिक्रिया ही एकाच दिशेने कार्यान्वित होते	रासायनिक अभिक्रिया दोन्ही दिशेने कार्यान्वित होते
कालांतराने निष्क्रिय होतो कमी वेळेसाठी उपयोगी	कालांतराने निष्क्रिय होत नाही म्हणूनच याला स्टोरेज सेल असे सुद्धा म्हणतात जास्त वेळेसाठी उपयोगी
किंमत कमी	जास्त किंमत
ड्राय सेल	निकेल कॅडमियम बॅटरी,लीड ऍसिड बॅटरी

डॅनियल(Daniel) सेलची संरचना

डॅनियल सेल हा इलेक्ट्रोकेमिकल सेलचा उत्तम उदाहरण आहे.यात झिंक इलेक्ट्रोड ,झिंक सल्फेट सोल्युशन मध्ये बुडवला जातो.तसेच कॉपर इलेक्ट्रोड कॉपर सल्फेट सोल्युशन मध्ये बुडवला जातो दोन्ही इलेक्ट्रोलाईट कॉपर सल्फेट आणि झिंक सल्फेट हे पोरस पार्टिशन च्या माध्यमाने वेगळे केले जातात झिंकचे .ऑक्सिडेशन पोटेन्शिअल अधिक असल्यामुळे ॲनोड म्हणून कार्यरत होतो तसेच कॉपर कॅथोड म्हणून कार्यरत होतो वरील रासायनिक अभिक्रियेमुळे सेल वर 1.1 वोल्ट तयार होतो .



डॅनियल सेल सॉल्ट ब्रिज सोबत

यामध्ये दोन हाफ सेल असतात पहिल्या हाफ सेलमध्ये जिंक रॉड झिंक सल्फेट मध्ये बुडवला जातो दुसऱ्या हाफ सेलमध्ये कॉपर प्लेट कॉपर सल्फेट मध्ये बुडवली जाते दोन्ही वेगवेगळे हाफ सेल सोल्ट ब्रिज च्या साह्याने जोडले जातात सॉल्ट ब्रिज विद्युत प्रवाह खंडित न होण्यासाठी वापरला जातो हाफ सेलवर ऑक्सिडेशन अभिक्रिया होते तसेच कॉपर हाफ सेलवर रेडक्शन अभिक्रिया होते नेट अभिक्रियेमुळे सेलवर 1.1 वोल्ट तयार होतो .



$Zn \rightarrow Zn^{+2} + 2e^-$ ....Oxidation Reaction

$Cu^{++} + 2e^- \rightarrow Cu$ ....Reduction Reaction

$Zn + Cu^{++} \rightarrow Zn^{+2} + Cu$ ....Net Reaction

इलेक्ट्रॉलिसिस चा फॅरेडे पहिला नियम:

इलेक्ट्रोड वर जमा झालेले किंवा उत्सर्जित झालेले पदार्थाचे वजन (W) हे क्वान्टिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी (Q) च्या समप्रमाणात (Directly Proportional) असतो.



$W \alpha Q$

$W \alpha Ct$ ....(Q= Ct)

जिथे

W= इलेक्ट्रोड वर जमा झालेले किंवा उत्सर्जित झालेले पदार्थाचे वजन(gm)

Q= क्वान्टिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी

C= करंट (ampere)

t = वेळ (second)

$W \alpha Ct$

$W = zCt$

परंतु वरील समीकरणात ही किंमत z स्थिर (E.C.E.) आहे. या स्थिरांकाला इलेक्ट्रोकेमिकल इक्विवॅलेंट असे म्हणतात .

एक एंपियर करंट एक सेकंद साठी प्रवाह केल्यामुळे जितका पदार्थ जमा किंवा उत्सर्जित होतो त्यालाच इलेक्ट्रो केमिकल इक्विवॅलेंट असे म्हणतात

इलेक्ट्रॉलिसिस चा फॅरेडे चा दुसरा नियम:

जेव्हा वेगवेगळे इलेक्ट्रोलाइट्स(different electrolyte) एकेरी जोडणी (series मध्ये जोडले असता आणि त्यात एकसमान क्वान्टिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी प्रवाह केले असता इलेक्ट्रोडवर जमा (deposited)होणारे व उत्सर्जित (liberated)होणारे पदार्थ चा वजन(W) हा केमिकल इक्विवॅलेंट समप्रमाणात (E) असतो.



जर एक समान कॉन्टिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी $CuSO_4$ आणि $AgNO_3$ या दोन इलेक्ट्रो लाईन मधून प्रवाह केले असता .

W_{Cu} = जमा झालेले कॉपर

W_{Ag} = जमा झालेले सिल्वर

E_{Cu} = केमिकल इक्विवॅलेंट कॉपर

E_{Zn} = केमिकल इक्विवॅलेंट सिल्वर

$$\frac{WCu}{WAg} = \frac{WCu}{Wag}$$

फॅरेडे:

एक ग्राम इक्विवॅलेंट वेट इतका पदार्थ डिपॉझिट किंवा उत्सर्जित करण्यासाठी जी ऊर्जा लागते त्याला एक फॅरेडे असे म्हणतात .

कुलोम्ब :

जेव्हा एक एंपियर करंट एका सेकंदासाठी सर्किट मधून पास केला जातो त्या क्वांटिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी ला कुलोम्ब असे म्हणतात.

महत्वाची सूत्रे (Important Formulae)

1) W = Z X C X t or W = ZQ

2) CE = 96500 × ECE (Z)
3) Equivalent weight =Atomic weight/Valency
4) $\frac{WA}{WB} = \frac{EA}{EB}$
5) Equivalent weight of base=Molecular weight of base/Acidity of base
6) Equivalent weight of acid =Molecular weight of acid/Basicity of acid

उदाहरण-१ :सिल्वर नाइट्रेट ($AgNO_3$) द्रावणातून 3 ampere करंट 20 मिनिटांसाठी प्रवाह केले असता 4.09 ग्रॅम सिल्वर जमा होते तर सिल्वर चे इलेक्ट्रोकेमिकल इक्विवॅलेंट आणि इक्विवॅलेंट वेट काढा .

W = ZCt

W=4.09gm
C=3amp
t=20min=20X60sec=1200sec
Z=?

4.09 = Z X 3 x 1200

Z= $\frac{4.09}{3\ X\ 1200}$ = 0.01136 gm/coulomb

CE = 96500 × 0.01136
= 109.21gm

उदाहरण-२ :कोपर सल्फेट ($CuSO_4$) द्रावणातून 5 ampere करंट 10 मिनिटांसाठी प्रवाह केले असता 0.99 ग्रॅम कोपर जमा होते तर सिल्वर चे इलेक्ट्रोकेमिकल इक्विवॅलेंट आणि इक्विवॅलेंट वेट काढा .

W = ZCt

W=0.99gm
C=5amp
t=10min=10X60sec=600sec
Z=?

0.99 = Z X 5 x 600

Z= $\frac{0.99}{5\ X\ 600}$ = 0.00033 gm/coulomb
CE = 96500 × 0.00033
= 31.84gm

उदाहरण-3: $CuSO_4$ आणि $AgNO_3$ द्रावणातून एकसमान क्वान्टिटी ऑफ इलेक्ट्रिसिटी 0.99 , gm सिल्वर 0.29gm कॉपर जमा (deposite) तर .होते कॉपरचे इक्विवॅलेंट वेट काढा .(सिल्वरचे इक्विवॅलेंट वेट31.6=)

W_{Cu} = 0.29
W_{Ag} = 0.99

$E_{Cu} = ?$

$E_{Zn} = 31.6$

$\frac{WCu}{WAg} = \frac{WCu}{Wag}$

$\frac{0.29}{0.99} = \frac{WCu}{31.6}$

$W_{Cu} = \frac{0.29 X 31.6}{0.99} = 107.87$

इलेक्ट्रोलिसिसचे मेकॅनिझम:

पदार्थातून विद्युत ऊर्जा प्रवाहित केल्यामुळे रासायनिक बदल घडवून आणून पदार्थाचे रासायनिक विघटन होते त्या प्रक्रियेला इलेक्ट्रॉलिसिस असे म्हणतात

इलेक्ट्रोकेमिकल सिरीज:

इलेक्ट्रोकेमिकल सिरीज मध्ये कटायन आणि अनायन ॲक्टिव्हिटीच्या उतरत्या क्रमाने मांडणी करण्यात आलेली आहे . जो मेटल ॲक्टिव्हिटी सिरीज मध्ये वरच्या स्थानकावर आहे तो तेवढा जास्त ॲक्टिव्ह आहे त्यामुळे त्या मेटल वर ऑक्सिडेशन ही अभिक्रिया सहज होणार तसेच .जो मेटल ॲक्टिव्हिटी सिरीज मध्ये खालच्या स्थानकावर आहे तो तेवढा कमी ॲक्टिव्ह असल्या कारणांमुळे तिथे रीडक्शन ही अभिक्रिया सहज होणार .



इलेक्ट्रॉलिसिस:

प्लॅटिनम इलेक्ट्रोड वापरून कॉपर सल्फेट चे इलेक्ट्रॉलिसिस(Electrolysis $CuSO_4$ of by using Platinum Electrode)

कॉपर सल्फेट च्या सोल्युशन मध्ये खालील चार आयन्स आहेत Cu^{++} , SO_4^{--},H^+ आणि OH^- . त्यापैकी Cu^{++} हा आयन जास्त ॲक्टिव्ह असल्याकारणाने इलेक्ट्रोड वर जमा होणार . कॉपर हा हायड्रोजन पेक्षा

जास्त ॲक्टिव्ह आहे इलेक्ट्रो केमिकल सिरीज नुसार कॉपरचे स्थान हायड्रोजनच्या स्थानाच्या वरती आहे त्यामुळे कॉपर इलेक्ट्रोड वर जमा होणार .

Diagram:



Fig. 5.9.1

Ionization: $CuSO_4$ solution is ionized to Cu^{++} + SO_4^{--}

$$CuSO_4 \rightleftharpoons Cu^{++} + So_4^{--}$$

$$H_2O \rightleftharpoons H^{+} + OH^{-}$$

इलेक्ट्रो केमिकल सिरीज च्या नियमानुसार हे आयन OH^- ॲनोड वर डिस्चार्ज होईल आणि ऑक्सिजन गॅस उत्सर्जित होणार परिणामी ऑक्सिजन गॅसची गॅसचे उत्सर्जन होते

Reaction at Cathode: (Reduction Reaction)

$$Cu^{++} + 2e^{-} \longrightarrow Cu \downarrow$$

Reaction at Anode: (Oxidation Reaction)

$$2OH^{-} \longrightarrow 2OH + 2e^{-} \text{ (Primary reaction)}$$

$$4(OH) \longrightarrow 2H_2O + O_2 \uparrow \text{ (Secondary reaction)}$$

निष्कर्ष:

कॅथोड वर कॉपर जमा होतो आणि ॲनोड ऑक्सिजन वायू उत्सर्जित होतो .

कॉपर इलेक्ट्रोड वापरून कॉपर सल्फेट चे इलेक्ट्रॉलिसीस(Electrolysis $CuSO_4$ of by using Platinum Electrode)



दोन कॉपर इलेक्ट्रोड कॉपर सल्फेट मध्ये बुडवणे एक कॉपर इलेक्ट्रोड बॅटरीच्या धनप्रभाराला जोडणे दुसरा कॉपर इलेक्ट्रोड बॅटरीच्या ऋणप्रभाराला जोडणे धनप्रभार असलेला कॉपर इलेक्ट्रोड म्हणून कार्य करतो ऋण प्रभार असलेला कॉपर इलेक्ट्रोड म्हणून कार्य करतो वापर सल्फेट चे द्रावण हे एक इलेक्ट्रो लाईट असून त्याचे विघटन खालील प्रमाणे होते सोल्युशन मध्ये चार प्रकारचे आयन्स आहे इलेक्ट्रिक प्रवाह सुरू झाल्यावर कॉपर इलेक्ट्रोडवर डिपॉझिट होतो तसेच कॉपर नोट चे क्षयहोते

Ionization: $CuSO_4$ solution is ionized to $Cu^{++} + SO_4^{--}$

$$CuSO_4 \rightleftharpoons Cu^{++} + So_4^{--}$$

$$H_2O \rightleftharpoons H^{+} + OH^{-}$$

इलेक्ट्रिक करंट प्रवाहित केल्यानंतर कॉपर2 इलेक्ट्रॉन दान करतो आणि कॉपर कॅथोडवर जमा होतो .

$Cu \rightarrow Cu^{+2} + 2e^{-}$ ....Oxidation Reaction

ॲनोड वर कॉपर दोन इलेक्ट्रॉन ग्रहण करतो आणि इलेक्ट्रोलाईट मध्ये विरघळतो .

$Cu^{++} + 2e^{-} \rightarrow Cu$ .... Reduction Reaction

निष्कर्ष:

कॉपर कॅथोडवर जमा झाल्यामुळे कॅथोडचा आकारमान वाढतो आणि ॲनोड वरील कॉपर विरघळल्यामुळे ॲनोडचा आकारमान कमी होतो .

इलेक्ट्रोप्लेटिंग(Electroplating)

इलेक्ट्रॉलिसिस द्वारे एका श्रेष्ठ धातू (Superior metal) च्या पातळ(Thin) थराने(Layer) दुसऱ्या धातूवर लेपआवरण (Coating) बनवण्याची प्रक्रिया म्हणजे इलेक्ट्रोप्लेटिंग उदा सिल्वर प्लेटिंग .

on.



१. ज्या धातूवर इलेक्ट्रोप्लेटिंग करावयाची आहे सर्वप्रथम त्या धातूला आम्ल, आम्लारी आणि पाण्यासहित स्वच्छ धुऊन घेणे.
२. स्वच्छ केलेले धातू ज्यावर कोटिंग बनावयाची आहे तो बॅटरीच्या ऋणप्रभाराला जोडणे त्यामुळे हा धातू कॅथोड म्हणून कार्य करणार.
३. शुद्ध सिल्वर रॉड बॅटरीच्या धनप्रभारावर सोडावा आणि तो म्हणूनकार्य करतो.
४. पोटॅशियम अर्जेंटो सायनाईड $K(Ag(CN)_2)$ हा द्रावण इलेक्ट्रो लाईट म्हणून वापरला जातो.
५. सिल्वर आयन कॅथोड वर स्थलांतरित होतात इलेक्ट्रॉन ग्रहण केल्यामुळे सिल्वर जमा होतो
६. सिल्वर सिल्वर आयन मध्ये विघटीत होऊन द्रावणात विरघळतो आणि इलेक्ट्रॉन दान करतो

इलेक्ट्रिक करंट प्रवाहित केल्यानंतर कॅथोड सिल्वर जमा होतो .

$Ag \rightarrow Ag^{+1} + e^-$ ....Oxidation Reaction

ॲनोड वर सिल्वर इलेक्ट्रॉन ग्रहण करतो आणि लेक्ट्रोलाईट मध्ये विरघळतो .

$Ag^+ + e^- \rightarrow Ag \downarrow$ .... Reduction Reaction

इलेक्ट्रोरिफायनिंग ऑफ कॉपर (electro-refining of copper):

या प्रक्रियेत द्रावणातून विद्युत प्रवाह केले असता अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू तयार करण्याच्या प्रक्रियेला लेक्ट्रोलाईट रिफायनिंग असे म्हणतात.

अशुद्ध कोपर मध्ये तीन ते पाच टक्के सक्रिय मूलद्रव्य (active elements) लोखंड, निकेल तसेच निष्क्रिय (passive) मूलद्रव्य प्लॅटिनम, सोने, सिल्वर असते.

१. एक मोठ्या टँक मध्ये दोन कॉपर इलेक्ट्रोड बुडवणे शुद्ध कॉपर बॅटरीच्या ऋणप्रभाराला जोडणे त्यामुळे शुद्ध कॉपर कॅथोड म्हणून कार्य करते .
२. अशुद्ध कॉपर बॅटरीच्या धन प्रभाराला जोडल्यामुळे अशुद्ध कॉपर ॲनोड म्हणून कार्य करते .
३. हे द्रावण 15 %$CuSO_4$ and 10% H_2SO_4 इलेक्ट्रोलाइट म्हणून वापरले जाते .

इलेक्ट्रिक करंट प्रवाहित केल्यानंतर कॅथोड कॉपर जमा होतो .

$Cu \rightarrow Cu^{+2} + 2e^-$ ....Oxidation Reaction

ॲनोड वर कॉपर इलेक्ट्रॉन ग्रहण करतो आणि लेक्ट्रोलाईट मध्ये विरघळतो .

$Cu^{++} + 2e^- \rightarrow Cu$ .... Reduction Reaction



Corrosion मेटलचे गंजणे

गंजण्याचा अभ्यास करण्याचे महत्व (significance of corrosion)

जेव्हा धातू वेगवेगळ्या स्वरूपात वापरले जातात तेव्हा ते कोरडे वायू(Dry gases) ओलावा(moisture)पातळ पदार्थ(liquid) इत्यादी वातावरणात सामोरे जातात तेव्हा उघडकीस आलेल्या धातूच्या पृष्ठभागाचा कमी जास्त वेगाने क्षय (destruction)होणे सुरू होते हा धातूचा क्षय गंज (corrosion)आहे जो थेट रासायनिक हल्ला (chemical attack) किंवा पर्यावरणाच्या इलेक्ट्रो रासायनिक हल्ल्यामुळे असू शकतो गंजण्यामुळे होणारे नुकसान प्रचंड आहे म्हणूनच अभियानास गंजांची यंत्रणा (corrosion process)समजून घेणे आवश्यक आहे जर त्याचे परिणाम कमी केले गेले तर शिवाय तो तीव्रगंज परिस्थिती (severe corrosion condition) टाळण्यास(avoid) सक्षम होईल आणि एकाच वेळी गंजविरुद्ध संरक्षण प्रदान करेल(protection against corrosion)

परिचय (introduction)

उद्योगात गंज हा एक गंभीर शब्द आहे ज्यामुळे आज पासच्या वातावरणाद्वारे धातूचा नाश होतो ज्यामध्ये वायू आद्रता किंवा द्रव पदार्थाचा समावेश असतो दैनंदिन जीवनात गंज येण्याचे बहुतेक सामान्य उदाहरण म्हणजे लोखंडाचे गंजणे . गंज ही एक धीमी प्रक्रिया आहे परंतु परिणामी होणारे नुकसान जबरदस्त आणि धोकेदायक आहे.

गंज व्याख्या

गंज ही धातूच्या पृष्ठभागापासून प्रारंभ होणाऱ्या रासायनिक किंवा इलेक्ट्रोकेमिकल प्रक्रियेद्वारे धातूचा नाश म्हणून परिभाषित केले जाते .

गंजण्याचे प्रकार (types of corrosion)

गंज अभिक्रिया मुख्यतः दोन प्रकारच्या असतात

1.वातावरणीय गंज /थेट रासायनिक गंज /कोरडे गंज (atmospheric /direct /dry corrosion)

2.विसर्जित गंज /इलेक्ट्रोकेमिकल गंज /ओले गंज(Immersed /Electrochemical /Wet Corrosion)

<u>थेट रासायनिक गंज(वतावरणीय गंज /direct chemical corrosion /atmospheric corrosion)</u>

गंज अभिक्रियेचा दर दमट वातावरणात आणि प्रदूषित वातावरणात जास्त असल्याचे दिसून आले आहे अशा प्रकारच्या गरजांचा वातावरणीय परिस्थिती जबाबदार असल्याने त्याला वातावरणीय गंज असे म्हणतात

वातावरणीय गंज चे प्रकार

१. ऑक्सिजनमुळे होणारा गंज (Corrosion due to oxygen)
२. इतर वायूमुळे होणारे गंज.(corrosion due to other gases)

ऑक्सिजनमुळे होणारा गंज (Corrosion due to oxygen)

जेव्हा धातूचा पृष्ठभाग वातावरणीय ऑक्सिजन वायूच्या संपर्कात येतो तेव्हा त्यामध्ये ऑक्सिडेशन अभिक्रिया होते आणि संबंधित धातूच्या ऑक्साईड ची पातळ फिल्म(thin film) धातूच्या पृष्ठभागावर (Metallic surface) तयार होते .गंजण्याचे दर ऑक्साईड फिल्मच्या स्वरूपावर (nature oxide film) अवलंबून आहे .

सामान्यत: आद्रता नसताना(absence of moisture)धातूवर ऑक्सिजनची थेट रासायनिक अभिक्रिया मुळे या प्रकाराचा गंज उद्भवतो .

१. जेव्हा धातूचे अनु वायुमंडलिय ऑक्सिजनच्या संपर्कात येतात तेव्हा ते धातूचा आयन तयार करण्यासाठी इलेक्ट्रॉन गमावतात ऑक्सिजनचे अनु ते इलेक्ट्रॉन स्वीकारतात (accept electrons)आणि ऑक्साईड आयन तयार करतात .
२. इलेक्ट्रोस्टॅटीक आकर्षणांच्या बळामुळे हे तयार झालेले मेटल आयन आणि ऑक्साईड एकत्र येतात व धातूचे ऑक्साईडचे (Metal Oxide)रेणू तयार करतात .
३. अशा प्रकारचे गंज उद्भवते (corrosion occurs)जेव्हा धातूचा पृष्ठभाग वायु मंडलातील इतर वायूच्या संपर्कात येतो जसे O_2 (Oxygen), Cl_2 (Chlorine), Br_2(Bromine), I_2(Iodine),H_2S(Hydrogen Sulphide), CO_2(Carbon Dioxide),SO_2(Sulphur Dioxide) इत्यादी म्हणजेच वातावरणीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गंजण्याला वातावरणीय गंज (atmospheric corrosion) lम्हणतात.

उदाहरणे (Examples):

1. लोखंडाचे गंजणे (Rusting of Iron)
2. तांब्याच्या (Copper) पृष्ठभागावर ग्रीन फिल्मची निर्मिती
3. रसायनशास्त्र प्रयोगशाळेमध्ये चांदीच्या (Silver) धातूच्या पृष्ठभागावर काय रंगाची चांदीच्या सल्फाईड (silver Sulfide) फिल्मची निर्मिती.

ऑक्साईड फिल्म चे प्रकार:

A. स्थिर ऑक्साईड फिल्म(Stable Oxide Film)

B. अस्थिर ऑक्साईड फिल्म (Unstable)

C. व्होलाटाईल ऑक्साईड फिल्म (Volatile)

A.स्थिर ऑक्साईड फिल्म:

या प्रकारची ऑक्साइड फिल्म स्थिर असते आणि ती धातूच्या पृष्ठभागावर कठोरपणे (tightly) चिटकते स्थिर ऑक्साईड फिल्म पुन्हा दोन प्रकार मध्ये विभागली जाते.

I) सच्छिद्र / पोरस ऑक्साईड फिल्म (porous)

2) सच्छिद्र नसलेले/ नॉन पोरस ऑक्साईड फिल्म. (non porous)

1) सच्छिद्र / पोरस ऑक्साईड फिल्म:

नॉन प्रोटेक्टिव्ह ऑक्साईड फिल्म ऑक्सिडेशन अभिक्रिया अल्कली आणि अल्कलाइन अर्थ मेटल धातूपेक्षा कमी प्रमाणात मेटल ऑक्साईड तयार करतात याचा परिणाम म्हणजे सचिद्र ऑक्साईड फिल्म तयार होते छिद्रयुक्त नेचर मुळे ऑक्सिजन चित्रांमधून आत प्रवेश करतो आणि मोठ्या प्रमाणात धातू नष्ट करतो. या प्रकारात गंजण्याची प्रक्रिया वेगवान आणि सतत होते.

उदाहरणार्थ अशा प्रकारची ऑक्साईड फिल्म अल्कली मेटल जसे की लिथियम (Li),पोटॅशियम(K), सोडियम (Na) आणि अल्कलाइन अर्थ मेटल जसे की कॅल्शियम (Ca), मॅग्नेशियम (Mg) तयार करतात.



Porous Metal Oxide Film

2) सच्छिद्र नसलेले / नॉन पोरस मेटल ऑक्साइड फिल्म:_प्रोटेक्टिव्ह ऑक्साईड फिल्म ॲल्युमिनियम सारख्या धातूशी संबंधित धातूपेक्षा जास्त ऑक्साईड फिल्म तयार होते या प्रकारची ऑक्साईड फिल्म गुळगुळीत (smooth) सतत (continuous) आणि नॉन सचिद्र (non-porous) आहे. ही नॉन सचिद्र ऑक्साईड फिल्म एक संरक्षण थर (protective layer) म्हणून कार्य करते आणि मोठ्या प्रमाणात धातूच्या गंजना प्रतिबंध करते .
उदाहरणार्थ अल्युमिनियम क्रोमियम आणि कॉपर



Non Porous Metal Oxide Film

<u>३) अस्थिर/ अनस्टेबल मेटल ऑक्साईड फिल्म</u>:
सोने(Au), चांदी(Ag), आणि प्लॅटिनम(Pt) सारखे धातू च्या पृष्ठभागावर अस्थिर मेटल ऑक्साईड फिल्म तयार होते. या प्रकारची ऑक्साइड फिल्म तयार होतात तिचे परत धातू आणि ऑक्सिजन मध्ये विघटन होते. म्हणूनच अशा परिस्थितीत ऑक्सिडेशन शक्य नसते किंवा शून्य करोजन असते.



Unstable Metal Oxide Film

उदाहरणार्थ अशा प्रकारचे ऑक्साईड फिल्म चांदी,सोने आणि प्लॅटिनम यासारख्या उदात्त (Noble)धातूंमध्ये तयार केले जाते.

<u>४)व्होलाटाईल ऑक्साईड फिल्म(Volatile)</u>
मोलीबडेनम (Mo)सारखा धातू जेव्हा वातावरणीय ऑक्सिजन वायूच्या संपर्कात येतो तेव्हा तो पृष्ठभागावर व्होलाटाईल ऑक्साईड फिल्म तयार करतो अशा प्रकारची ऑक्साइड फिल्म फ्रेश धातूच्या पृष्ठभागाच्या सतत त्वरित बाष्पीभवन (vaporized)करते म्हणून या प्रकारात गंजण्याची प्रक्रिया सतत आणि वेगवान आहे.



वातावरणातील गंजांची यंत्रणा(mechanism of Atmospheric Corrosion)

१. वातावरणातील ऑक्सिजन गॅस ऑक्सिडेशन करोजनला जबाबदार असत ऑक्साईड फिल्म तयार . करण्याच्या यंत्रणेमध्ये पुढील चरणांचा समावेश आहे (following steps)

२. वातावरणीय ऑक्सिजन वायूचा जेव्हा धातूच्या पृष्ठभागाशी संपर्क येतो तेव्हा तो त्याचे व्हॅलेंस इलेक्ट्रॉन/संयुजक इलेक्ट्रॉन (valence electron)गमावतो (loses)आणि ऑक्सिडेशन अभिक्रिया होते .

a) $M \rightarrow M^{+2} + 2e^{-}$ ....Oxidation Reaction

३. वातावरणीय ऑक्सिजन वायू हे इलेक्ट्रॉन स्वीकारतो आणि रीडक्शन अभिक्रिया होते

b) $\frac{1}{2}O_2 + 2e^{-} \rightarrow O^{-2}$ ....Reduction Reaction

a आणि b एकत्रित केल्याने असल्यास नेट अभिक्रिया मिळेल .

नेट सेल रिएक्शन :

$M + \frac{1}{2}O_2 \rightarrow M^{+2} + O^{-2} \rightarrow MO$ (मेटल ऑक्साइड फिल्म)

व्याख्या:
जेव्हा दोनभिन्न धातू (Disssimilar metals) कण्डक्टींग मेडीयम उपस्थितीत एकमेकांच्या संपर्कात असतात तेव्हा आयोनिक रिएक्शन मधून झालेल्या करो जनला इलेक्ट्रोकेमिकल किंवा इमर्स करोजन किंवा वेट करोजन असे म्हणतात

उदाहरणे:

1. जॉईंटच्या अंतर्गत (under joints) कुंपण (fencing) वायरचे रस्टिंग(corrosion)
2. तांबे प्लंबिंगला (copper plumbing) जोडलेल्या स्टील पाईपचे गंजणे.
3. तांब्याच्या वायरच्या (copper wire) भोवती शिसाच्या अँटीमनी (lead antimony) सोल्डर (solder) चे रस्टिंग.
4. ब्रास हार्डवेअर मध्ये स्टीलच्या स्क्रूचे गंजणे
5. तांब्याच्या शीट्स ला जोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडी नेल्सचे(iron nails) गंजणे.
6. कोरड्या आणि मातीमधून (dry & wet soil) जात असलेल्या भूमिगत पाईपलाईनचे रस्टिंग .

हे एक तर गॅलव्हानिक सेल असेल किंवा कॉन्सन्ट्रेशन सेलच्या निर्मितीद्वारे होते इमर्स करो जन खाली दोन प्रकारचे सेल तयार झाल्याने होते.

A) गॅलव्हानिक सेल (Galvanic Cell):

जेव्हा दोन भिन्न धातू लिक्विड कण्डक्टींग मेडीयम किंवा ओलसर हवेच्या (moist air) उपस्थित एकमेकांच्या संपर्कात असतात .

या गॅलव्हानिक सेलमध्ये अधिक सक्रिय धातू (active metal) ॲनोड म्हणून कार्य करतो आणि गंजतो तर कमी सक्रिय धातू (less active metal)कॅथोड म्हणून कार्य करतो आणि गंजण्यापासून संरक्षित होतो .

गॅलव्हानिक सेल ॲक्शन मुळे होणाऱ्या करोजनची उदाहरणे:

१. तांबे प्लंबिंगला जोडलेल्या स्टील पाईपचे गंजणे .
२. ब्रास हार्डवेअर मध्ये स्टीलच्या स्क्रूचे गंजणे .
३. तांब्याच्या शीट्स ला जोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या लोखंडी नेल्सचे गंजणे .
४. तांब्याच्या वायरच्या भोवती शिसाच्या अँटीमनी शोल्डरचे रेस्टिंग.

B कॉन्सन्ट्रेशन सेल concentration सेल :

जेव्हा एक धातू वेगवेगळ्या वातावरणाच्या संपर्कात येतो वि.भेदित वायू(differential aeration) विजन कॉन्सन्ट्रेशन सेल मध्ये कमी ऑक्सिजनयुक्त क्षेत्र (less oxygenated area)ॲनोड म्हणून कार्य करते आणि गंजते तर जास्त ऑक्सिजन युक्त क्षेत्र (high oxygenated area)कॅथोड म्हणून कार्य करते आणि अप्रभावित राहते .

मेटल आयन कॉन्सन्ट्रेशन सेलमध्ये धातूच्या आयनच्या उच्च कॉन्सन्ट्रेशन सेलच्या संपर्कात असलेल्या धातूचे क्षेत्र संरक्षित केले जाईल कारण तो कॅथोड म्हणून कार्य करतो आणि धातूच्या आयन च्या लो कॉन्सन्ट्रेशन सेलच्या संपर्कात असलेले असणाऱ्या धातूचे क्षेत्र सुरक्षित केले जाणार नाही कारण तो ॲनोड म्हणून कार्य करतो.

कन्सन्ट्रेशन सेल ॲक्शन मुळे होणाऱ्या करोजनची उदाहरणे (examples of corrosion due to concentration cell action)

१. मातीच्या पोरोसिटी (porosity) मध्ये असणारा फरक(difference)ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन सेल होण्यास कारणीभूत ठरू शकतो .
२. असमान(uneven) किंवा उग्र (rough) पृष्ठभाग(surface) ऑक्सिजन एकाग्रता असेल तयार करतात .
३. अंशतः पुरलेल्या भूमिगत पाईपचे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन सेल तयार झाल्याने गंजणे .
४. वॉटर लाईन(water line) करोजन
५. पीटिंग(pitting)करोजन



कॉन्सन्ट्रेशन सेल चे प्रकार :

१. **इलेक्ट्रोलाईट कॉन्सन्ट्रेशन सेल(electrolyte concentration cell:)**
इलेक्ट्रोड समान सामग्रीचे (material)असतात आणि इलेक्ट्रोलाईट समान पदार्थाचे बनलेले असतात परंतु भिन्न(different) कॉन्सन्ट्रेशन असते.

२. **इलेक्ट्रोड कॉन्सन्ट्रेशन सेल (electrode concentration cell)**
या प्रकारात इलेक्ट्रोड समान सामग्रीचे असतात परंतु भिन्न कॉन्सन्ट्रेशनचे असतात इलेक्ट्रोड एकाच इलेक्ट्रोलाईट(electrolyte) मध्ये बुडवलेले असतात .

वेट करो जन यंत्रणा mechanism of wet corrosion :

अ हायड्रोजन इवोल्युशन यंत्रणा गॅलव्हानिक सेल ॲक्शन

१. उदाहरणार्थ, ऍसिडिक औद्योगिक कचरा (acidic industrial waste)असलेल्या एका स्टीलच्या (Steel tank) टाकीमध्ये त्याच्या संपर्कात असलेला तांब्याचा छोटा तुकडा (small copper scrape)
२. ऍसिडिक कण्डक्टींग मेडीयम च्या उपस्थितीत तांब्याच्या छोटा तुकडा कॅथोड (cathode) आणि स्टीलची टाकी ॲनोड(anode)म्हणून कार्य करते .
३. लोह (Fe ॲनोड) दोन इलेक्ट्रॉन दान केल्यामुळे ऑक्सिडेशन होते आणि मुक्त झालेले दोन इलेक्ट्रॉन प्रवाहित होतात, इलेक्ट्रोलाईट(electrolyte) मधून हायड्रोजन आयन हे मुक्त केलेले इलेक्ट्रॉन स्वीकारतात आणि हायड्रोजन वायूच्या उत्सर्जनाने कॅथोड येथे रिडक्शन (reduction)ही अभिक्रिया होते .

$Fe \rightarrow Fe^{+2} + 2e^-$ ....Oxidation Reaction
$2H^+ + 2e^- \rightarrow H_2 \uparrow$ ....Reduction Reaction
नेट सेल रिएक्शन
$Fe + 2H^+ \rightarrow Fe^{+2} + H_2 \uparrow$



या प्रकारच्या करोजन मध्ये कॅथोडिक क्षेत्र(cathodic area) लहान असते आणि ॲनोडीक क्षेत्र (anodic area)मोठे असते.

ब ऑक्सीजन शोषण यंत्रणा कॉन्सन्ट्रेशन सेल अभिक्रिया:

Absorption of Oxygen Gas

१. उदाहरणार्थ जेव्हा पाण्याचा थेंब लोह किंवा स्टीलच्या पृष्ठभागावर (iron or steel surface) असतो तेव्हा वायुमंडली ऑक्सिजनच्या उपस्थितीत(in presence of)उदासीन जलीय द्रावण(neutral aqueous solution)मध्ये लोहाचे गंजणे .

२. सहसा लोखंड ऑक्साईडच्या पातळ फिल्म(thin film)सह कव्हर केले जाते फिल्ममध्ये क्रॅक विकसित झाल्यास पाण्याचे थेंब किंवा आद्रताच्या उपस्थितीत क्रॅक ॲनोड म्हणून कार्य करते आणि उर्वरित लोह ऑक्साईड फिल्म कॅथोड म्हणून कार्य करते ॲनोडच्या पृष्ठभागावरील धातूच्या अणूचे इलेक्ट्रॉनच्या मुक्तीसह ऑक्सीकरण (oxidation)होते.

$Fe \rightarrow Fe^{+2} + 2e^-$ ....Oxidation Reaction



मुक्त झालेल्या इलेक्ट्रॉन पाण्याचे थेंब स्वीकारतो आणि रिडक्शन ही रासायनिक अभिक्रिया होते.

$2H_2O + O_2 + 4e^- \rightarrow 4(OH)^-$ ......Reduction Reaction

Fe^{+2} आयन आणि $(OH)^-$ आयन एकत्र येतात आणि आणि फेरस हायड्रॉक्साइड तयार करतात .

$Fe^{+2} + 4(OH)^- \rightarrow Fe(OH)_2$

पुरेशा प्रमाणात ऑक्सिजनच्या उपस्थितीत फेरस हायड्रॉक्साइड चे ऑक्सिडेशन (oxidation) होते आणि फेरीक हायड्रॉक्साइड तयार होते त्यानंतर त्याचे विघटन होते आणि फेरी ऑक्साईड तयार होते तर ज्याला पिवळा रंगांचा गंज म्हणतात.

$Fe(OH)_2 + 2H_2O + O_2 \rightarrow Fe_2O_3 .2H_2O$ yellow rust

या प्रकारात कॅथोडीक क्षेत्र मोठे (large cathode)असते आणि ॲनोडीक क्षेत्र लहान (small anode)असते .

पीटिंग करोजन(Pitting Corrosion)

करोडिंग वातावरणाच्या (Corroding Environment)उपस्थितीत धातूच्या पृष्ठभागांमध्ये विषमतेमुळे पीटिंग गंज उद्भवते (occurs) एखाद्या पर्यावरणीय स्थितीच्या उपस्थितीत धातूवरील संरक्षण पृष्ठभागाच्या (protecting surface) फिल्मवर विकसित क्रॅकमुळे छिद्र किंवा खड्डे तयार होतात म्हणजेच फिटिंग गंज हा एक स्थानिक हल्ला (localized attack)आहे ज्याचा परिणामामुळे धातूच्या पृष्ठभागावर छिद्र बनतो . गुळगुळीत पृष्ठभाग असलेला शुद्ध(pure) आणि एकसंध/एकजीव (homogeneous metal) धातू दोष

(defects)आणि खडबडीत पृष्ठभागापेक्षा(rough surface) फिटिंगला अधिक प्रतिरोधक असतो . स्वच्छ (clean) पृष्ठभाग आणि योग्य सामग्रीचा निवड(selection of proper material) पिटिंग गंजला प्रतिकार करू शकते असे दिसून आले आहे की पॉलिश केलेला पृष्ठभाग असलेले नमुने पिटिंग करोजन अधिक प्रतिरोधक असतात सुमारे दोन टक्के मॉलिब्डेनम(molybdenum) सह स्टेनलेस स्टील(stainless steel) अलोईंग (alloying)पिटिंग करोजनच्या दिशेने प्रतिरोधकता वाढवते .



वॉटरलाईन करोजन (waterline corrosion)

विभेदित वायूविजनामुळे(differential aeration) ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन सेल तयार होतो ज्यामुळे जल लाईनगंज(waterline corrosion)वाढते . जेव्हा स्टीलच्या टाकीमध्ये पाणी बऱ्याच दिवसापासून स्थिर (stagnant) राहते तेव्हा असे दिसून येते की पाण्याच्या पातळीच्या अगदी खाली(just below the water level) गंज तयार होतो.



पृष्ठभागाच्या खाली असलेल्या पाण्याच्या (under water surface)तुलनेत पृष्ठभागाच्या पाण्यात (surface water)विसर्जित ऑक्सिजनचे कॉन्सन्ट्रेशन जास्त असते .यामुळे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन सेल तयार होतो ज्यामध्ये पृष्ठभागाचे पाणी कॅथोड म्हणून कार्यकरते आणि पृष्ठभागाच्या खाली असलेले पाणी ॲनोड म्हणून कार्यकरते म्हणूनच पाण्याच्या पातळीच्या खाली असलेल्या धातूचे करोजन होते .

<u>क्रिविस गंज</u> <u>(Crevice Corrosion)</u>:

क्रिविस गंज हे स्थानिक करोजनचे(local corrosion) उदाहरण आहे या प्रकारचे करोजन घाणीच्या साठ्यामुळे (dirt deposite)पेंट कोटिंग वर विकसित होणाऱ्या क्रॅकमुळे (crack developed on paint

coatings)होते जे सामान्यतः गॅस्केट(gaskets)बोल्टस् (bolts)आणि रिव्हेट(रिवेट्स) जवळ दिसून येते असलेला ऑक्सिजनचा अभाव यामुळे या प्रकारचे करोजन होते .



योग्य मटेरियलची निवड(selection of proper material) योग्य डिझाईन(proper design) आणि स्वच्छता (clean)क्रिविस गंजला नियंत्रण करण्यासाठी केल्या गेलेल्या उपाययोजना आहेत .

धातूचा संयुक्त (joints)वेल्डेड बोर्ड (welded)वापरून आणि नॉन अबोर्बिंग गॅसकिट(non absorbing gasket) वापरून देखील हे प्रतिबंधित केले जाऊ शकते.

<u>करोजन वर परिणाम करणारे घटक (factors affecting the corrosion)</u>

A) वातावरणीय गंजावर परिणाम करणारे घटक

१ .वातावरणातील अशुद्धी (impurities in the atmosphere)

सामान्य वातावरणामध्ये ऑक्सिजन(२० %), नायट्रोजन(७८ %), कमी प्रमाणात कार्बन डायऑक्साइड (CO_2), H_2O आणि दुर्मिळ वायु (rare gases)) परंतु औद्योगिकीकरनामुळे .असतात industrialization) वातावरणात CO_2 ,Cl_2 ,H_2S, CO_2 सारखे प्रदूषक असतात जे धातूवर सहज आक्रमण करतात आणि जे ऑक्साईड सह कार्बोनेट (carbonates), क्लोराइड (chlorides), सल्फाइड्स (sulphide), सल्फेट्स (sulphates) इत्यादी सारखी संयुगे तयार करतात औद्योगिक क्षेत्राजवळील वातावरणीय हवेमध्ये अशुद्धता जास्त असते औद्योगिक क्षेत्राजवळील वातावरणीय हवेमध्ये अशुद्धता जशी ती यांच्यासोबत हायड्रोक्लोरिक ऍसिड (HCl), आणि सल्फ्युरिक ऍसिड (H_2SO_4) यांच्या वेपर्स (VAPOURS) जास्त असतात त्यामुळे औद्योगिक क्षेत्राजवळ करोजनचा रेट जास्त असतो.

१. **आद्रता(humidity)** गंजाचे दर (rate of corrosion) दमट वातावरणात जास्त असल्याचे आढळते आद्र वातावरणात गंज दर वाढण्याचे मुख्य कारण हे आहे की वातावरणातील उपस्थित वायू आद्रतेत विरघळतात (dissolve)ज्यामुळे धातूच्या पृष्ठभागावरील रासायनिक आणि इलेक्ट्रो केमिकल अभिक्रिया chemical and electrochemical corrosio होतात त्यामुळे जास्त करोजन होते .हल्ल्याची व्याप्ती extend of attack गॅलव्हानिक मालिकेतील galvanic series धातूच्या नेचर गुणधर्म स्थितीवर अवलंबून असते .

२. **तापमान(temperature)** तापमानात वाढ झाल्याने गंजण्याचे प्रमाण वाढते तापमान जितके जास्त असेल तितके गंजन्याचे प्रमाण देखील जास्त आहे एक निष्क्रिय धातू (inert metal)उच्च तापमानात सक्रिय (active) होतो कॉस्टिक ईम्ब्रीटलमेंट (caustic embrittlement) सारख्या अंतर्गंजांचे (Intergranular Corrosion) प्रकार केवळ उच्च तापमानात हाय प्रेशर बॉयलर मध्ये होतात.

३. **पीएच चा प्रभाव (effect of pH):** सर्वसाधारणपणे ऍसिडिक(आम्ल) मिडीयम, अल्कलाइन(आम्लारी) मेडीयम आणि उदासीन (neutral) माध्यमांपेक्षा अधिक corrosive असतात.

४. **भिन्न वायू विजन(Differential aeration)** धातूचा एका भागामध्ये ऑक्सिजनच्या कॉन्सन्ट्रेशन मध्ये वाढ झाल्याने ऑक्सिजनचा कॉन्सन्ट्रेशन सेल तयार होतो ज्यामध्ये ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन कमी असेल तेथे करोजन होते .

B] ईमरस्ड वेट/करोजनवर परिणाम करणारे घटक

१. **धातूची शुद्धता (purity of metal)**शुद्ध धातू गंजण्याच्या प्रक्रियेस प्रतिकार करते म्हणूनच 100% शुद्ध धातूच्या बाबतीत गंजण्याचे प्रमाण कमी असल्याचे आढळले आहे. धातूमध्ये असणारी अशुद्धता लहान गॅलव्हानिक सेल(tiny galvanic cell)ची निर्मिती करते ज्याचा परिणाम म्हणून अनोडिक भाग खराब होतो अशुद्धीच्या(impure) वाढत्या प्रदर्शनासह गंजण्याचे प्रमाण वाढते अशाप्रकारे धातूची गंज प्रतिकार शुद्धता वाढवून प्रभावित होऊ शकते(thus corrosion resistance of metal can be impressed by increasing its purity)

२. **ऑक्साइड फिल्मचे स्वरूप (nature of oxide film)**ऑक्साइड फिल्मचे स्वरूप गांजन्याच्या दारावर खूप परिणाम करते. अस्थिर (unstable ऑक्साइड)फिल्मच्या बाबतीत जवळजवळ शून्य (zero corrosion).दिसून येते (व्होलाटाईल ऑक्साईड) फिल्मच्या बाबतीत गंज दर जास्त दिसून असल्याचे आढळले आहे नॉन सछिद्र .(non porousऑक्साईड फिल्म एक अडथळा म्हणून कार्य करते आणि मोठ्या प्रमाणात मेटलला पुढील गंजण्यापासून संरक्षण देते लोहसारखे धातू छिद्र युक्त ऑक्साइड .फिल्म(porous oxide film)जिथे गंजण्याचा दर अधिक दिसत ,तयार होतात form (high corrosion rate)

३. **गंज उत्पादनाची विद्रव्यता (Solublity of the corrosion product)**
जर गंज उत्पादन(corrosion product) करोडिंग मिडीयम मध्ये विरघळत नसेल तर ते अडथळा (barrier) म्हणून कार्यकरते आणि धातूच्या पुढील गंजण्यावर प्रतिबंध करते (resist further corrosion) परंतु गंज उत्पादन कोरोडिंग मिडीयम मध्ये विरघळणारा (soluble)असेल तर फ्रेश धातूच्या निरंतर प्रदर्शनामुळे गंज प्रक्रिया सतत आणि वेगवान असते.

४. **गॅलव्हानिक मालिकांमध्ये धातूची स्थिती/स्थान (Position of metal in galvanic series)**
गॅलव्हानिक मालिकांमध्ये उच्च स्थान (top position)असणाऱ्या धातूंची ऑक्सिडेशनची क्षमता उच्च असते आणि ते सहजपणे गंजतात गॅलव्हानिक मालिकांमध्ये कमी (bottom position)स्थान असलेल्या धातूंमध्ये रिडक्शन करण्याची क्षमता उच्च असते आणि ऑक्सिडेशनची क्षमता कमी असते ज्यामुळे त्यांची गंजण्याची प्रवृत्ती कमी असते

५. **पी एच चा प्रभाव(effect of pH)**
गंज अभिक्रिया सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे हायड्रोजन आयन चे कॉन्सन्ट्रेशन आम्ल (acid)आणि आम्लारी(basic) कंडक्टिंग मिडीयम मध्ये करोजनचा दर अधिक असतो तर उदासीन (neutral) माध्यमांमध्ये करोजनचा दर कमी असतो .

गंज नियंत्रक(corrosion control :

अ) वातावरणात बदल (modification of the environment :

खालील मार्गांनी वातावरणात बदल करून धातूची गंज कमी केला जाऊ शकते .
१. हानिकारक गंज उत्तेजक काढून टाकणे (Removal of harmful corrosion stimulants)
२. गंज प्रतिबंधकांचा वापर (use of corrosion inhibitors)

a. अल्पधर्मी उदासीनिकरण (Alkaline Neutralization)ऍसिडिक वातावरणामुळे होणाऱ्या गंजला रोखण्यासाठी(prevent corrosion)NH_3, चुनखडी (limestone), इत्यादी वाफेच्या(vapour) किंवा द्रव (liquid) स्वरूपात उदासीनीकरण (neutralizers) वापरुन केले जाते .
b. डीह्युमिडीफिकेशन (Dehumidification) वातावरणातील आद्रता किंवा आद्रता (moisture or humidity in atmosphere)हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे जो गंजण्यास कारणीभूत आहे . ओलाव्यामुळे होणाऱ्या गंजाला रोखण्यासाठी सिलिका जेल वापरून डीह्युमिडीफिकेशन केले जाते .

ब) संरक्षक कोटिंग चा वापर (Use of protective coating :

१ .कोटिंग साठी कमी सक्रिय धातूचा (less active metal)वापर या प्रक्रियेत टिन (tin) धातू कोटिंग साठी म्हणून वापरला जातो टिनिंग ही स्टीलच्या गंजण्यापासून रोखण्यासाठी पातळ(thin) आणि एकसमान (uniform)टिन कोट असलेली कोटींगचि प्रक्रिया आहे .



टिन हा कमी द्रवणांक असणारा धातू(low melting point 232-°C) आहे. लोहा पेक्षा कमी इलेक्ट्रोपॉझिटिव्ह नोबलर (nobler) आणि म्हणूनच ते रासायनिक हल्ल्याचा प्रतिरोधक आहे.

प्रक्रिया (process):

१. स्टील शीटच्या पृष्ठभागावर असणारी ऑक्साईड फिल्म आणि अशुद्धता (impurity) काढून टाकण्यासाठी ते सौम्य(dilute) सल्फ्युरिक ऍसिड (H_2SO_4) ने स्वच्छ वॉश केले जाते.
२. स्वच्छ केलेली शीट झिंक क्लोराइडच्या ($ZnCl_2$) वितळलेल्या फ्लक्स (flux)मधून पास केले जाते ज्यामुळे वितळलेला धातूची शीट चीटकण्यास मदत होते .
३. वितळलेल्या टिन टाकीमधून स्टीलची शीट पास केली जाते नंतर टीन लिपीत(tin coated) पृष्ठभागाचे ऑक्सीकरण रोखण्यासाठी पाल्म (palm oil) तेलाच्या टाकीमधून गरम टिन लिपीत शीट पास केले जाते जास्तीचे (excess) असलेले टीन काढून टाकण्यासाठी समान कोटिंग (uniform coating) मिळवण्यासाठी गरम रोलरच्या (hot rollers) मालिकेतून पास केली जाते.
४. टिनिंग प्रक्रियेचे ऑपरेटिंग तापमान 250 डिग्री सेल्सिअस ते 290 डिग्री सेल्सिअस आहे .

फायदे (advantages) :

१. टिन लिपीत कंटेनर्स खाद्यपदार्थ (food stuff) साठवण्यासाठी (store) वापरतात कारण टिन हा कमी सक्रीय धातू (less active metal) असल्यामुळे खाद्यपदार्थांवर ॲसिडिक वातावरणाच्या परिणाम होत नाही आणि खाद्यपदार्थ सुरक्षित राहतात .

२. बेस मेटलला गंजण्यापासून प्रतिबंधित (prevents rusting base metal) करते गंज प्रतिकारशक्ती (corrosion resistance) सुधारते.

तोटे (disadvantages) :

टिन कोटिंग अखंड असेपर्यंत टिनच्या धातूचे रक्षण करते ,कोटिंग मध्ये क्रॅक किंवा कोटिंग खराब झाल्यास मात्र गंजण्याचा रेट वाढतो .

उपयोग (applications):

एरोस्पेस, ऑटोमोटिव्ह, नाणी, खाद्यसेवा, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, दूरसंचार, वैद्यकीय, ऊर्जा आणि दागिने (Aerospace ,automotive ,Coin ,Food service ,Electrical ,Electronics ,Telecommunication , Medical,Energy and Jewellery) .

३. कोटींगसाठी अधिक सक्रिय धातूचा वापर (गॅलव्हानाईझिंग) use of more active metal for कोटींग (Galvanizing):

या प्रक्रियेत जस्त (zinc) धातू कोटिंग साठी म्हणून वापरला जातो गॅलव्हानाईझिंग ही स्टील स्टीलच्या गंजण्यापासून रोखण्यासाठी (prevent) पातळ (thin) आणि एक समान पोट असलेले कोटींग प्रक्रिया आहे.



प्रक्रिया (process) :

१. गॅलव्हानाईझिंग करण्यात येणारी लोखंड (iron) किंवा स्टील शीट (steel) प्रथम सल्फ्युरिक ॲसिड (H_2SO_4) मध्ये स्वच्छ केली जाते नंतर वॉशिंग बाथ मध्ये स्वच्छ करून ड्रॉइंग चेंबर मध्ये वळवली जाते

२. स्वच्छ लोखंड आणि स्टील शीट नंतर वितळलेल्या जस्त च्या बाथ (zinc bath) मध्ये बुडविले जाते

३. 425 ते 460 डिग्री सेल्सियस तापमानाला वितळलेल्या झिंक चे वातावरणीय ऑक्सिडेशन अभिक्रिया टाळण्यासाठी त्याला अमोनियम क्लोराईड या फ्लक्स (flux) ने कव्हर करतात .

४. जास्तीचे असलेले झिंक काढून टाकण्यासाठी आणि समान कोटिंग मिळवण्यासाठी झिंक लेपित (zinc coated) गरम रोलरच्या मालिकेतून (hot rollers series) पास केली जाते .

५. झिंक लिपिक शीट शेवटी 650 डिग्री सेल्सियस ला या तापमानाला केली जाते नंतर हळूहळू थंड केली जाते

फायदे (advantages) :
झिंक कोटिंग अबाधित (intact) असेपर्यंत झिंक धातूचे संरक्षण (protection) करते, कोटिंग मध्ये क्रॅक किंवा नुकसान बेस मेटलला गंज पासून संरक्षण देते कारण बेस धातूपेक्षा जास्त अधिक सक्रिय असतो.

तोटे (disadvantages) :
गॅलव्हनाईस्ड कंटेनर (galvanised container) खाद्यपदार्थ साठवण्यासाठी (store) वापरले जात नाहीत कारण जस्त डायल्युट ऍसिड मध्ये विरघळते आणि संयुगे बनवते ते आरोग्यासाठी हानिकारक असतात .

उपयोग (Application) :
१. गॅलव्हनाईस्ड स्टीलच्या प्रेम छतावरील उत्कृष्ट बांधकामासाठी (roof top construction) वापरल्या जातात.
२. दरवाजाच्या चौकटी, खिडकीच्या चौकटी, बार, घरगुती वस्तू, जसे की बांधल्या टॉप आणि इतर कंटेनर गॅलव्हनाईस्ड करतात .
३. मशीनचे भाग, साधने, जहाजे, टाक्या आणि तारा गॅलव्हनाईस्ड करतात .
४. मेटल पाईप्स आणि तारा सर्वात लोकप्रिय गॅलव्हनाईस्ड (popular galvanised item) वस्तू आहेत ज्या औद्योगिक वापरात तसेच घरगुती वापरासाठी बनवलेल्या वस्तूंमध्ये वापरतात .
५. संरक्षक गिअर, हायवे चिन्हे, हाय टेन्शन इलेक्ट्रिक टावर इत्यादी मध्ये वापरतात .

गॅलव्हानाईझिंग आणि टिनिंग मधील फरक :

क्र .	गॅलव्हानाईझिंग (galvanizing)	टिनिंग (tinning)
१	गंज टाळण्यासाठी लोखंड किंवा स्टीलची पातळ कोट देण्याची प्रक्रिया म्हणजे गॅलवनायझिंग	गंज टाळण्यासाठी लोखंड किंवा स्टीलची शीट तीनच्या पाताळ कोट देण्याची प्रक्रिया म्हणजे
२	खाद्य सामग्री ठेवण्यासाठी वापरले जात नाही	टिनींग केलेले कंटेनर खाद्य सामग्री साठवण्यासाठी वापरतात
३	झिंक गैलवानिक सेलेक्शनद्वारे बेस्ट मेटलचे सतत संरक्षण करते	कोटिंग अखंड असेपर्यंत तीन बेस मेटल रक्षण करते कोटिंग मध्ये क्रॅक किंवा खराब झाल्यास . .गंजाची क्रिया जलद गतीने होते
	गॅलव्हानाईझिंग मध्ये झिंक बेस मेटलचे रक्षण करते कारण ते लोहा पेक्षा अधिक इलेक्ट्रोपॉझिटिव असते.	तीन वेस्ट मेटलचे गंजा पासून संरक्षण करत नाही कारण ते लोहा पेक्षा कमी विद्युत प्रवाह इलेक्ट्रोपॉझिटिव्ह असते.

ॲनोडीक आणि कॅथोडीक संरक्षण (Anodic &Cathodic Protection) :

१. ॲनोडीक संरक्षण: प्रभावित ॲनोडीक करंट (impressed anodic current) पद्धतीचा वापर करून गंज रोखण्यासाठी ॲनोडीक संरक्षण म्हणतात .क्रोमियम, टिटॅनियम आणि स्टील सारख्या धातूंच्या नियंत्रित ॲनोडीक करंट सहाय्याने निष्क्रिय (inert) बनवतात कारण ते त्यांच्या पृष्ठभागावर संरक्षणात्मक ऑक्साईड फिल्म तयार करतात ज्याच्यामुळे गंज दर कमी होतो .

२. संरचनेचे ॲनोडीक संरक्षण करण्यासा पोटेंशिओस्टॅट (potentiostat) नावाचे साधन वापरले जाते.हे एक इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस (device) आहे जे संदर्भ (reference) इलेक्ट्रोडच्या संदर्भात स्थिर विभावंतर संभाव्यतेने (metal at constant potential) धातूची देखभाल करते .
३. पोटेंशिओस्टॅट (potentiostat) तीन टर्मिनल्स असतात ,एक संरक्षित करण्यासाठी टाकी किंवा सरचनेशी जोडलेले असते दुसरे टर्मिनल सहाय्यक (auxiliary cathode) जोडलेले असते आणि तिसरे टर्मिनल संदर्भ (reference) इलेक्ट्रोडला जोडलेले असते खरंतर पोटेंशिओस्टॅट अनेक संदर्भ इलेक्ट्रोड दरम्यान स्थिर क्षमता राखाते ,परिणामी करोजन रेट कमी होतो .



फायदे (advantages) :
१. कमी करण्याची गरज असते आणि अत्यंत संवेदनशील (extreme) वातावरणात लागू होते .
२. ऑपरेटिंग ची किंमत कमीत कमी असते .(operating cost is low)
तोटे (disadvantages) :
१. संदर्भ इलेक्ट्रोड, सहाय्यक इलेक्ट्रोड आणि पोटेंशिओस्टॅट साठी उच्चस्थापना किंमत (high installation cost) आवश्यक असते .
२. सक्रिय निष्क्रिय (active –passive) वर्तन (behaviour) दर्शविणाऱ्या केवळ मेटल कॅारोडेन्ट सिस्टीम साठी उपयुक्त असते.

कॅथोडीक संरक्षण (Cathodic Protection):
बलिदानात्मक संरक्षण (sacrificial anodic protection)
१. पद्धतीत संरक्षित केलेले आर्टिकल अधिक सक्रिय धातूशी (active metal) जोडले जाते, अधिक सक्रिय धातू ॲनोड म्हणून वर्तन करतो आणि आपल्या आर्टिकलचे संरक्षण करतो.
२. संरक्षित केलेला आर्टिकल इन्सुलटिंग वायरच्या वापर करून अधिक सक्रिय दातूशी कनेक्ट केला जातो त्याला सॅक्रिफिशियल ॲनोड असे म्हणतात. विद्युतिय संपर्क वाढवण्यासाठी सॅक्रिफिशियल ॲनोड बॅक फिल (mixture of coal +NaCl) मध्ये ठेवला जातो .
३. सामान्यतः Mg }magnesium) ,Al (Aluminium) आणि यांचे मिश्र धातू / संयुग साखरेविषयी म्हणून वापरले जातात .

४. जेव्हा क्रिफिशियल अॅनोड पूर्णपणे सेवन केले जाते तेव्हा ते फ्रेश मेटल पीस ने बदलले जाते .



अनुप्रायोग (Application):

१. पुरलेल्या पाईपलाईन (buried pipeline) गरम पाण्याची टाकी (hot water tank) आणि भूमिगत केबल यांचे सॉइल करोजन पासून संरक्षण करण्यासाठी ही मेथड वापरतात .
२. केबल ,शिप हल्स ,शिफ्ट पियर्स इत्यादींचे समुद्री गंजापासून संरक्षण करण्यासाठी ही मेथड वापरतात .
३. घरगुती वॉटर बॉयलर (domestic water boiler) मध्ये गंज रोखण्यासाठी मॅग्नेशियम शीट (magnesium sheet) चा वापर करतात .

फायदे (advantages):

१. ऑपरेटिंग (operating cost) आणि स्थापना किंमत (installation cost) कमीत कमी असते .
२. जटील संरचनांचे (complex structure) संरक्षण (protect) करण्याची क्षमता असते .

तोटे (disadvantages) :

१. उच्च प्रारंभिक प्रवाह आवश्यक असतो.(high starting current is required)
२. अनकोटेड भाग (uncoated part) संरक्षित केले जाऊ शकत नाही .

इम्प्रेस्ड करंट कॅथॉडिक संरक्षण (impressed current cathodic protection):

१. या पद्धतीत गंजाचा प्रवाह निरर्थक (nullify the corrosion) करण्यासाठी आणि संरक्षक धातूचे अनोड मधून कॅथोड मध्ये रूपांतर करण्यासाठी एक प्रभावी प्रभाह (impressed current) उलट दिशेने (opposite direction) पास केला जातो .
२. सामान्यतः प्रभावित प्रवाह डायरेक्ट करंट मधून (एसी लाईन वरील बॅटरी किंवा रेक्टिफायर सारखे) इनर्ट अॅनोड (जसे की ग्राफाईट, स्क्रॅप लोह, स्टेनलेस स्टील, प्लॅटिनम किंवा उच्च सिलिका लोह) पासून (current) प्राप्त होते.

३. एक जबरदस्त ॲनोड पुरेसा डीसी करंट लावला जातो जमिनीत पुरला जातो (किंवा करोडिंग माध्यमात बुडविला जातो) आणि संरक्षित करण्यासाठी धातूच्या संरचनेशी जोडला जातो (connected to the metallic structure to be protected) आज पासच्या मातीशी विद्युत संपर्क वाढविण्यासाठी (to increase electrical connection) अनोड सहसा बॅकफील मध्ये ठेवला जातो बॅकफील कोप ब्रिज किंवा जिप्समच्या बनलेला असतो .



उपयोग application :

१. ओपन वॉटर बॉक्स कुलर पाण्याच्या टाक्या, दफन केलेले तेल किंवा पाण्याचे पाइप (buried oil or water pipes) कंडेन्सर (condenser), ट्रान्समिशन लाईन टावर (transmission line towers) सागरी पीयर्स घातलेली जहाजे इत्यादींसाठी प्रभावित वर्तमान कॅथोडीक संरक्षण लागू केले गेले जाते .

२. दीर्घकालीन कामकाजासाठी (long term operation) मोठ्या संरचनेसाठी (large structure) या प्रकारचे संरक्षण तंत्र विशेषतः उपयुक्त असते .

सामग्रीची निवड:

शुद्ध धातू वापरणे आणि धातूंचे मिश्रण वापरणे (choice of material –using pure metal and using metal alloys) योग्य प्रकारच्या सामग्रीची निवड करणे हे गंज नियंत्रणासाठी (corrosion control) महत्त्वाचे असते .

शुद्ध धातूचा वापर करणे (using pure metal):

नोबल किंवा अक्रिय धातू गंजण्याकरिता सर्वाधिक प्रतिकारक (immune to corrosion) असतात परंतु ती अत्यंत महाग असल्याने सामान्य हेतूसाठी वापरली जाऊ शकत नाहीत .पुढील पर्याय म्हणजे शुद्ध शक्य धातूचा (pure metal) वापर करणे जे परीष्करण प्रक्रिया (refining process) द्वारे केले जाते .

शुद्ध धातू गंजण्याच्या प्रक्रियेत प्रतिकार करते अतिरिक्त शुद्ध धातू मिळवण्यासाठी आणि गंज कमी करण्यासाठी रिफायनिंग प्रोसेस वापरली जाते.

धातूंचे मिश्र धातू वापरणे (using metal alloys) :

उपयुक्त धातूंचे मिश्रण (alloying) करून त्यांना गंज प्रतिरोधक बनवता येते, क्रोमियम (chromium), निकेल (Nickel) इत्यादी घटक स्टीलला गंजण्यापासून प्रतिरोध करते .

१. करोजनच्या वेळी माध्यमातून हायड्रोजन वायू उत्सर्जित होतो..................
अ) आम्ल ब) आम्लारी क) उदासीन
ड) वरीलपैकी एकही नाही

२. वाटर लाईन .... चे उदाहरण आहे .
अ) स्ट्रेस करोजन ब) भिन्न वायुवीजन करोजन क) पीटिंग करोजन ड) भिन्न धातूवीजन करोजन

३. बुजलेल्या वॉटर पाइप लाइनचे करोजन पासून नियंत्रण करण्यासाठी ....पद्धत वापरली जाते
अ) ॲनोडीक मेटॅलिक कोटींग ब) ॲनोडीक प्रोटेक्शन क) कॅथोडीक प्रोटेक्शन ड) गंज प्रतिबंधकांचा वापर

४. इलेक्ट्रो प्लेटिंग मध्ये ....चा समावेश आहे .
अ) इलेक्ट्रोलिसिस ब) धातूचे इलेक्ट्रॉड वर जमा होणे
क) रेडॉक्स अभिक्रिया ड) वरीलपैकी सर्वे

५. गॅलव्हानाईझिंग प्रक्रिया ....तापमानवर होते .
अ) 425 ते 460 डिग्री सेल्सियस ब) 325 ते 860 डिग्री सेल्सियस
क) 155 ते 200 डिग्री सेल्सियस ड) 50 ते 200 डिग्री सेल्सियस

१	अ	२	ब	३	ब	४	अ	५	अ

युनिट .६ पेंट, वार्निश, इन्सुलेटर,पॉलिमर ,अढेसिव्हस, ल्युब्रिकंट आणि कॅटॅलीस्ट

विषय दर्जा विद्यार्जन निष्पत्ती Course Level Learning Outcome):

उदयोगात संबंधित अभियांत्रिकी मटेरियल आणि उतप्रेरक वापर.

सिद्धांत विद्यार्जन निष्पत्ती

- दिलेल्या पेंट्सचे घटक ओळखा.
- दिलेल्या पेंट आणि वार्निश चे ठळक गुणधर्म वेगळे करा.
- दिलेल्या अनुप्रयोगांसाठी इन्सुलेट सामग्रीच्या गूणधर्माचे वर्णन करा.
- दिलेल्या प्रकारच्या स्ट्रक्चरल पॉलिमर्समध्ये फरक करा.
- दिलेल्या पॉलिमरच्या पॉलिमरायझेशन प्रक्रियेचे वर्णन करा.
- दिलेल्या पॉलिमरए इलॅस्टोमर आणि अड्हेसिव गुणधर्म आणि उपयोग समजावून सांगा.
- दिलेल्या सामग्रीसाठी आवश्यक असलेल्या अड्हेसिव अनुप्रयोगाचे वर्णन करा.
- दिलेल्या प्रकारच्या वंगणांचे गुणधर्म समजावून सांगा.
- उतप्रेरकाच्या अनूप्रयोगा संबंधित स्वीकार करणे

युक्तिवाद (Rationale) :

पॉलिमर, प्लास्टिक, रेंझीन (resin) ही अशी सामग्री (material) आहे ज्यांना 19 व्या शतकात महत्त्व प्राप्त झाले. इलेक्ट्रॉनिक्स्, वाहन उदयोग (automobile sector)) रसायन उद्योग (chemical industries)) घरगुती वापरामध्ये पॉलिमर्सचा मोठया प्रमाणात वापर केला जातो.

पेंट आणि वार्निश, हे विविध पर्यावरणीय घटकांविरूध्द धातूचे संरक्षक कोट म्हणून संरक्षण करतात. धातू, लाकूड, प्लास्टिक, सिरेमिक वेअर, भिंत यासारख्या पदार्थांच्या पृष्ट भागावर हे वापरले जातात. तसेच पेंट आणि वार्निश चा वापर कलात्मक कारणांसाठी तसेच आकर्शक दिसण्यासाठी केला जातो.

वंगण हा एक पदार्थ आहे जो दोन फिरत्या पृश्ठभागांच्या दरम्यान घर्षण आणि उष्णता कमी करतो. योग्य वंगण वापरल्याने तेथील यंत्रणेचे आयुश्य जास्तीत जास्त टिकते व पैसा, वेळ आणि मनुश्यबळाची बचत होण्यास मदत होते.

उष्णता, वीज आणि मोठया ध्वनीच्या हल्ल्यापासून आपल्याला सुरक्षित ठेवण्यासाठी इन्सुलेटरचे ज्ञान आवश्यक आहे. इन्सुलेटर असे पदार्थ आहेत जे उष्णता, ध्वनी आणि वीज यांचे हस्तांतरण रोखतात म्हणजेच ते उष्णता, ध्वनी आणि वीज यांना ट्रान्स्फर होण्यापासून रोखतात.

1.1 रंग (Paints):

रंग (Paints) आणि वार्निश (Varnish)

सजावटीसाठी आणि संरक्षक हेतूसाठी म्हणजेच पृश्ठभाग कव्हर करण्यासाठी मोठया प्रमाणात वापरले जातात. रंग आणि वार्निश चे ज्ञान तंत्रज्ञास (technologist) अभियांत्रिकी अनुप्रयोगासाठी (engineering applications) ध्द्योग्य पेंटिंग सामग्री निवडण्यास मदत करते. वाढते शहरीकरण तसेच विकसित अर्थषास्त्र, पेंट आणि वार्निश बाजारावर सकारात्मक परिणाम करीत आहे.

जहाजांना दिल्या जाणा-या रंगांमध्ये गंजप्रतिरोधकता व खा-या पाण्याचा धातूवर होणा-या परिणामांपासून संरक्षण, हे महत्त्वाचं ठरतं. धूळ व पावसापासून इमारतीचं रक्षण करणं, हे महत्त्वाचं असतं. मोटारीसाठी वापरण्यात येणा-या रंगामध्ये वर्शांनुवर्शे चकचकीतपणा टिकणं, वातावरणाचा त्यावर कमीत कमी परिणाम होणं, हे आवश्यक आहे.

घरगुती वापरातील रंगामध्ये पापुद्रा न पडणारा तसेच पाण्याने स्वच्छ करता येणारा, हा विषेश गुणधर्म पाहिला जातो. लहान मुलांच्या रंगीत खडूंमध्ये विशारी द्रव्यांचा वापर न करणं आवश्यक असतं. त्या त्या व्यवसायातील आवश्यकतेचा विचार रंगनिर्मिती करताना आवश्यक असतो.

''पेंट हे वाहनातील (vehicle) एक किंवा अधिक रंगद्रव्यांचे यांत्रिक फैलाव (mechanical dispersion mixture) मिश्रण आहे.

रंग बनवताना घन स्वरूपातील रंगाला द्राव्य माध्यमामध्ये (vehicle, thinner) मिसळलं जातं**.**

जे कोरडे झाल्यावर विविध पृश्ठभागांवर संरक्षक किंवा सजावटीची फिल्म बनवते. पेंट ऑक्सिडेशन, पॉलिमरायझेशन(polymerization) किंवा त्याच्या घटकांच्या बाश्पीभवनाने (evaporation) कोरडी होते आणि एक पातळ**,** अपारदर्शक फिल्म देते ज्यामध्ये पृश्ठभाग लपण्याची शक्ती **(**hiding power) असते. पेंटचा वापर खासकरून लोखंडी वस्तू गंजू नयेत, वातावरणाचा परिणाम वस्तूवर होऊ नये व वस्तू ब-याच काळापर्यंत टिकून राहव्यात यासाठी मोठया प्रमाणावर होतो. पेंट फिल्म अपारदर्षक असते, त्यामुळे पृश्ठभाग पूणपणे झाकून ठेवणे आणि लपविणे खूप महत्त्वाचे असते. पेंट वेगवेगळया स्वरूपात उपलब्ध आहे: तेल आधारित (oil based), सिमेंट आधारित (cement based), पाणी आधारित (water based).

1.1 रंग लागू करण्याचे उद्दिष्टे (Purposes of applying paint):

पेंट्सचा वापर सामान्यपणे धातू आणि अधातूचा पृश्ठभाग कव्हर करण्यासाठी **/** झाकण्यासाठी आणि बांधकाम कामासाठी केला जातो**.** पेंट लावण्याचे मुख्य उददृषे खालीलप्रमाणे आहेत**:**

1) पेंट लोखंडाला गंजण्यापासून वाचवते**.**
2) पेंट लाकडी पृश्ठभागाचे कीटक आणि बुरषीपासून संरक्षण करते**.**
3) पेंट लाकडी पृश्ठभागाचे ओल्याव्यापासून संरक्षण करते**.**
4) पेंट उष्णता आणि प्रकाश प्रतिबिंबित (reflects) करते**.**
5) पेंट पृश्ठभाग आकर्शक दिसण्यासाठी लागू केले जाते**.**
6) पेंट पृश्ठभागांना गुळगूळीतपणा देतो**.**
7) पेंटचा वापर कलात्मक देखाव्यासाठी (aesthetic look) केला जातो**.**

1.2 चांगल्या रंगाची वैषिश्टय (Characteristics of good paint):

1) पेंट उप पृश्ठभाग पूर्णपणे संरक्षित करेल**.** पृष्टभागावर पेंट**,** ब्रश **,** रोलर किंवा वारणी उपकरणाने सहजपणे लागू करता यावे**.**
2) भिंतीवर सहजपणे पेंट लागू करता यावा व प्रसार किंवा आच्छादन करण्याची शक्ती जास्त असावी**.**
3) ज्यावर ते लागू केले आहे त्यावर एकसमान (uniformly) आणि एकसंधपणे(homogeneously) कव्हर झाले पाहिजे**.**
4) त्याचा रंग आणि गुळगुळीतपणा बराच काळ टिकवून राहिला पाहिजे**.**
5) रंग (Paint film) धुण्यायोग्य (Washable) असावा-

6) चकचकीत आणि आकर्षित असावा
7) पृष्टभाग रासायनिक आणि पर्यावरणीय प्रभावापासून (chemical and environmental effect) संरक्षण करणारा असावा.
8) रंग (Paint film) लवचिक असावा.
9) पृष्टभागावर चिकटण्याची क्षमता चांगली असणे आवश्यक आहे.
10) स्वस्त आणि वापरायला सोपा असावा.
11)रंग कोरडा झाल्यावर तडा किंवा आक्रसून जाऊ नये.
12)पेंट धातूवर लावल्यावर त्याने गंजण्यापासून धातूंचे संरक्षण केले पाहिजे.

1.2 रंगाचे घटक (Constituents of Paint) :

1) पिगमेंट (Pigment)
2) वाहन (Vehicle)
3) थीनर (Thinner)
4) ड्रायर (Drier)
5) पिगमेंट विस्तारक किंवा फिलर (Pigment extender / Filler)
6) प्लास्टीसायझर्स (Plasticizers)
7) ॲटीस्किनिंग एजंट्स (Anti-skinning agents)

1)पिगमेंट (Pigment):

हा पेंटचा एक अनिवार्य घटक (constituent) आहे. पिगमेंट हा पेंट तयार करताना मिसळला जाणारा एक घन पदार्थ आहे जो पेंटला रंग आणि अपारदर्षकता (opacity) प्रदान करतो. रंग बनवताना घन स्वरूपातील रंगाला द्राव्य माध्यमामध्ये मिसळले जाते.
उदाहरणे:

पांढरा-पांढरा शीसे (White lead), झिंक ऑक्साईड (ZnO) टायटॅनियम ऑक्साईड (TiO_2)

रंगीत पिगमेंट (Colored pigments)
लाल -लाल शीसे (red lead), फेरिक ऑक्साईड (ferric oxide: FeO_3), (chrome red)
हिरवा -क्रोमियम ऑक्साईड (chromium oxide)

निळा -पर्शियन निळा (prussion blue)

काळा -कार्बन ब्लॅक (carbon black)
तपकिरी-अंबर तपकिरी (umber brown)

रंगद्रव्याची कार्ये:
1) पिगमेंट पेंट फिल्मला आपरदर्शकता (opacity) प्रदान करते.
2) पेंटला इच्छित रंग प्रदान करते.
3) हानिकारक अल्ट्राव्हायोलेट किरणोत्सव (UV rays) प्रतिबंधित करून पेंट फिल्मला संरक्षण देते.
4) पेंट फिल्मला टिकाऊपणा (durability) आणि सामर्थ्य Z (strength) प्रदान करते.
5) पिगमेंट पेंट फिल्मची ओल्याव्यापासून अभेदयता (impermeability) सुधारते.

2) वाहन (Vehicle or Film Forming Constituents): -

पेंट फिल्म बनण्यासाठी या घटकाचे (vehicle) महत्त्व असते. पेंटच्या (non-volatile) घटकांसाठी (vehicles) वाहक (carrier) असतात.

उदाहरणे:

सामान्यत: तेलांच्या पेंट्ससाठी (Oil paints) वापरली जाणारी व्हेईक्लस (vehicles) अशी आहेत -
जवस तेल (linseed oil)) सोयाबीन तेल (soyabean oil) निर्जलीकरण एरंडेल तेल (dehydrated castor oil) माशाचे तेल (fish oil) इत्यादी. पाणी आधारित रंगासाठी (Water based paint) पाणी हे मुख्य वाहन (vehicles) आहे.

वाहनांची/ वेहिकल कामे (function of vehicle):

1) रंगला मजबूती, कडकपणा (toughness) आणि टिकाउपणा (duranility) प्रदान करते.
2) रंगाला चिटकण्यास मदत करते.
3)रंगाला पाण्यापासून संरक्षण (water proofness) प्रदान करते.
4) बाष्पीभवन (evaporation), ऑक्सीडेशन (oxidation) आणि पोलीमेरईझेशन (polymerization) पेंट फिल्म तयार करण्यास मदत करते.

3) थिनर : (Thinner):

हा एक रंगहीन, रंग पातळ करणारा पदार्थ आहे. रंग तयार करताना thinner कहा वापर केला जातो जेणेकरून पृष्टभागावर (surface) पेंट लागू करणे सोपे होईल . पेंट सुकताना थिणर चे बाष्पीभवन होते आणि कोरड्या रंगद्रव्याची पेंट फिल्म तयार होते

उदाहरणे :

tarpentine , खनिज (minerals) बेंजीन (benzene), naptha , Tolune , रॉकेल (kerosene).

थिनरची कार्ये :

1) यामुळे रंगाची तरलता (fluidity) कमी होते .
2) पेंट नितळ (smooth) बनवते.
3) पेंटला सच्छिद्र रचनामद्धे (porous) प्रवेश करण्यास मदत करते .
4) बाष्पीभवन करून पेंट फिल्म कोरडे होण्यास मदत करते .

ड्रायर (oxygen carrier catalyst):

ऑक्सिजन (oxygen) वाहक (carrier) उतप्रेरक catalyst **आहे**.
उदाहरणे : resinets , लीनोलेट्स (linolates), टंगस्टाट (tungstate). अँड नॅपथानेटस (napthanets) ऑफ cobalt , मॅगणीज (manganese) , शिसे **(**लिड**),** जस्त **(**जिंक**)**

ड्रायर ची कार्ये (Function of oxygen carrier catalyst):

1. ऑक्सीडेशन **,** पोलीमरायजेशन , condensation **(**कंडेनसेशन **)** रंग (paint film) कोरडे होण्यास प्रमाण वाढवते.

2) तेल पेंट फिल्म च्या (oil paint) कोरडेपणा सुधारते .

पिगमेंट विस्तारक / फिलर (pigment extender / filler):

पिगमेंट फिलर रंगावर परिणाम करत नाही परंतु ते काही गुणधर्म बदलतात. उदाहरणे क्वाट् र्ज (quartz), वाळू (sand) टाल्क (talk), barium सल्फेट (BaSO 4), कोओलीन .(kaoline) चिकानमाती (clay) $CaCO_3$,इत्यादि

फिलर किवा विस्तरारकांचे कार्य (Function of fillers or extenders):

पिगमेंट

1) रंगाचा (paint film) टिकाउपणा वाढवते .
2) पेंट कोरडा झाल्यावर तडा /भेग (crack) कमी करते .
3) रंगद्रव्याच्या कणांची यादरुचिक (randomness) वाढवतात .
4) रंगद्रव्याची वाहक पदार्थ म्हणून काम करतात .
5) त्यांचा उपयोग पेंटमद्धे छिद्र (void) भरण्यासाठी केला जातो.
6) रंगाला चिकटपणा, कठोरता आणि कडकपणा येतो.
7) रंगाला पणूयाचे प्रतिरोध प्रदान करते याचा अर्थ पेंटची पानी शोषून घेण्याची क्षमता प्रतिबंध करते.

प्लास्टीसाइझर्स (Plasticizers) :

प्लास्टीसाइझर्स पदार्थ रंगाला (paint film) लवचिकता प्रदान करतात आणि कोरडे झाल्या नंतर रंगाला (पेंट film) तडा / भेगा पडण्यास पतिबंधीत करतात.
उदाहरणे ,tricresyl phosphate, ट्राय फेनिल (Triphenyl phosphate)tributyl tartarate , .

Antiskinning एजेंट :

पोली हाइडरोक्सी , ट्राय फेनिल फिनोल्स सारख्या अँटीस्कीनिंग एजेंट कधीकधी पेंटमद्धे वापरले जातात ते पेंट ला जेलिंग आणि स्किनिंग पासून प्रतिबंधित करतात.

अनु.	रंगाचे घटक (Constituents of Paints)	कार्य (Functions)
१	रंगद्रव्याची कार्ये (Pigment)	पेंटला इच्छित रंग प्रदान करते.
२	वाहन (Vehicle or Film Forming Constituents)	रंगाला मजबुती, कडकपणा आणि टिकाऊपणा प्रदान करते.
३	थिनर (रंगाला पातळ करणारा पदार्थ)	बाष्पीभवन करून पेंट फिल्मला कोरडे होण्यास मदत करते.
४	ड्रायर्स	ऑक्सिडेशन, पॉलिमरायझेशन आणि कंडेन्सेषनव्दारे कोरडे होण्याचे प्रमाण वाढवते.
५	पिगमेंट विस्तारक किंवा फिलर (Pigment extender / filler)	पेंटचा टिकाऊपणा वाढवते. पेंटला किफायतषीर मूल्य देते.
६	प्लास्टीसाइझर्स	रंगाला तडा / भेगा पडण्यास प्रतिबंधित करतात.

७	अँटीस्किनिंग एजंट.	अँटीस्किनिंग एजंट पेंटला जेलिंग आणि स्किनिंग पासुन प्रतिबंधित करतात.

वार्निश:

वार्निश हे कोरडे तेल किंवा व्होलाटाइल सॉल्व्हेंटमध्ये (drying oil or in volatile solvent) किंवा कोरडे तेल आणि व्होलाटाइल सॉल्व्हेंट दोन्हींमध्ये नॅचरल किंवा सिंथेटिक रेझीनचे (natural or synthetic resins) मिश्रण आहे. जेव्हा ते पृष्टभागावर लागू होते तेव्हा ते पारदर्शक, कठिण, संरक्षणात्मक थर देते. वार्निश फिल्म त्यामधील घटकांचे बाश्पीभवन ऑक्सीकरण आणि पॉलिमरायझेशन होऊन सुकते आणि चमकदार, टिकाऊ फिल्म तयार होते.

वार्निशचे प्रकार

वार्निशचे दोन मुख्य प्रकार आहेत.

1) ऑइल वार्निश /ऑलिवोरेसिनस वार्निश (Oil varnish/ Olioresinous varnish)

हे नैसर्गिक किंवा कृत्रिम रेझीन आणि व्होलाटाइल सॉल्व्हेंटयांचे (natural or synthetic resin) मिश्रण आहे. ऑइल वार्निश व्होलाटाइल (volatile solvent) सॉल्व्हेंट चे बाश्पीभवन व कोरडया तेलाचे ऑक्सीकरण आणि पॉलिमरायझेशन होऊन सुकते. तेलामुळे वॉर्निश फिल्मचा ठिसूळपणा कमी होतो.
उदाहरण: कोपल वार्निश
